मूल्य ३० रु. / पृष्ठे १०४ । मार्च २०१९ । वर्ष १२ वे / अंक ३

# राष्ट्रवादी

स्वाभिमानी आचार! राष्ट्रवादी विचार!!



## अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| ■ सकारात्मक शहाणपण हाच दहशतवादावरचा उतारा | संपादकीय | ६ |
| ■ महाआघाडीची पहिली संयुक्त सभा, नांदेड, भाषणे... | | |
| १) राफेलचं भूत मोदी सरकारला गाडल्याशिवाय राहणार नाही | शरद पवार | १० |
| २) जाहिरातीसाठी उधळपट्टी, पण कर्जमाफीला पैसा नाही | अशोक चव्हाण | १६ |
| ३) तख्त उलटानेका हुनर भी हम रखते है | छगन भुजबळ | २० |
| ४) वाघाने शेपूट घातलं | धनंजय मुंडे | २६ |
| ५) देशाला लागलेले आरएसएसप्रणीत भाजपचे ग्रहण हटवा | जोगेंद्र कवाडे | २८ |
| ६) महाआघाडी भक्कम राहणार | भाई जयंत पाटील | ३० |
| ७) भाग जाओ मोदी सरकार | नसीम खान | ३१ |
| ८) महाआघाडीचे सरकार सत्तेवर येणारच | बसवराज पाटील | ३३ |
| ■ निर्धार परिवर्तन संपर्क यात्रा, समारोप सभा, परळी, भाषणे... | | |
| १) भाजपाला धडा शिकविण्याची वेळ | शरद पवार | ३४ |
| २) परिवर्तनाची लढाई जिंकायची आहे | छगन भुजबळ | ३८ |
| ३) राज्याच्या भल्यासाठी सत्ता परिवर्तन आवश्यक | अशोक चव्हाण | ४३ |
| ४) बोलघेवड्या पंतप्रधानापेक्षा काम करणारा पंतप्रधान करा | जयंत पाटील | ४६ |
| ५) राष्ट्रवादीचा समारोप हे चिक्की खाण्याएवढं सोप्प नाही | धनंजय मुंडे | ४९ |
| ६) हुतात्म्यांच्या चितेवर राजकीय पोळी भाजण्याचा भाजपचा डाव | नवाब मलिक | ५२ |
| ■ पुलवामा...बालाकोट... पुढे? जैसे थे? (नवी दिल्ली वार्तापत्र) | आकाश | ५४ |
| ■ चव्हाटा (हलके-फुलके राजकीय किस्से) | घंटाकर्ण | ६२ |
| ■ कै. शामराव कदम पुतळा अनावरण समारंभ, नांदेड, भाषणे... | | |
| १) देशात बदलती राजकीय हवा | शरद पवार | ७२ |
| २) सहकार क्षेत्राला पवार साहेबांमुळे संजीवनी | अशोक चव्हाण | ७९ |
| ■ विरोधी पक्षांच्या रणनीतीची फेरआखणी | अवलोकितेश्वर | ८२ |
| ■ युद्ध हवे की पाकिस्तानला एकाकी पाडायचे? | गहिनीनाथ | ९० |
| ■ विधीमंडळातील राष्ट्रवादीची कामगिरी | | ९७ |
| ■ शेवटचे पान (संवेदनाशून्य हुकुमशहा) | हेमन्त टकले | १०२ |





**संचालक**
हेमन्त टकले

**प्रबंध संपादक**
दिलीप वळसे पाटील

**संपादक**
डॉ. सुधीर भोंगळे

या अंकात प्रसिद्ध झालेल्या मतांशी प्रबंध संपादक, संपादक व संचालक सहमत असतीलच असे नाही.

**संपादकीय पत्रव्यवहार**
ठाकरसी हाऊस,
जे.एन.हेरेडिया मार्ग,
बॅलार्ड इस्टेट, मुंबई-४०० ०३८
०२२-३०२३५५३०/५५/५६

**कला निर्देशन**
धनंजय सस्तकर

**सजावट व मांडणी**
दिलीप रोडे

**वर्गणीचे दर-**
वार्षिक रु. ५००/-

**वर्गणीचा धनादेश**
'हेमन्त मल्टिमीडिया ओपीसी प्रा.लि.'
या नावाने काढावा.

www.ncp.org.in
यावर मासिक उपलब्ध

**मुद्रक, प्रकाशक**
हेमन्त प्रभाकर टकले यांनी
'हेमन्त मल्टीमीडिया ओपीसी प्रा.लि.'
च्या वतीने
मीडिया आर ॲण्ड डी.,
१३, अमृत मधुरा, प्लॉट नं. ३,
सेक्टर-३,आरएससी-२८, चारकोप,
कांदिवली (पश्चिम), मुंबई-४०००६७
येथे छापून ७८, रेशमभवन, ६ वा
मजला, वीर नरिमन रोड, चर्चगेट,
मुंबई-४०००२० येथून
अंक प्रकाशित केले.
**संपादक-**
डॉ. सुधीर जगन्नाथ भोंगळे

# अर्थसंकल्पातून जनतेला वाटाण्याच्या अक्षता

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर म्हणजे 27 फेब्रुवारीला अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी महाराष्ट्राचा जो अर्थसंकल्प सादर केला तो राज्यातील जनतेच्या हातात वाटाण्याच्या अक्षता देणारा आणि जनतेला निराशेच्या खोल गर्तेत ढकलणारा आहे. अर्थसंकल्पातून जनतेच्या पदरात काहीच न पडल्यामुळे ती पूर्ण निराश झाली आहे. अर्थसंकल्प सादर करताना अर्थमंत्री जणुकाही निवडणुकीचे भाषणच करीत होते. पण त्या भाषणावर संपूर्ण पराभवाची झाक असल्यामुळे आणि मागील पाच वर्षांत जनतेला सतत खोटं बोलून फसवित असल्यामुळे अर्थमंत्र्यांचे नाटक चांगलं वठलं नाही. खरं तर अर्थसंकल्पातून, आम्ही पुढील काळात काय करणार आहोत, कोणत्या योजना राबविणार आहोत, त्या कशा पद्धतीने पूर्ण करणार आहोत, त्यासाठी पैशाची तरतूद कसकशी करणार आहोत याचा आलेख जनतेसमोर सभागृहाच्या माध्यमातून ठेवायचा असतो. परंतु अर्थमंत्री मुनगंटीवार हे सरकारने मागील पाच वर्षात काय कामे केली याचाच खोटा पाढा वाचित बसले. वास्तविक मागील पाच वर्षातली केंद्र आणि राज्य या दोन्ही सरकारांची कामगिरी म्हणजे जनतेला कपाळी लावलेला बुक्का आहे आणि तोंडाला पुसलेली कडुनिंबाची पाने आहेत. प्रचंड खोटी आश्वासने देऊन सत्तेवर आलेल्या मोदी-फडणवीस सरकारने एकही आश्वासन पूर्ण केले नाही. शेतकरी, शेतमजूर आणि कामगार पूर्ण उध्वस्त केला. शेतकऱ्याला ना कर्जमाफी मिळाली, ना त्याचा सातबारा पूर्ण कोरा झाला, ना त्याच्या शेताला पाणी मिळाले. स्वामिनाथन समितीच्या शिफारशींची अंमलबजावणी होऊन मूळ उत्पादन खर्च व त्यावरती 50 टक्के नफा याप्रमाणे आधारभूत किंमतही नाही मिळाली. मग शेतकऱ्याचे उत्पन्न दुपटीने वाढविण्याचा प्रश्न तर कितीतरी दूर राहिला.

जलयुक्त शिवार योजनेचे ढोल मात्र सरकार सातत्याने बडवित राहिले.



सुरुवातीचे



16 हजार गावांचा पिण्याच्या व शेतीच्या पाण्याचा प्रश्न या योजनेने सोडविला व ही गावे पूर्णपणे टँकरमुक्त झाली असा खोटा प्रचार मुख्यमंत्र्यांसह संपूर्ण शासनाने सातत्याने केला. पण निसर्गाने यावर्षी तो उघडा पाडला. फडणवीस आणि त्यांचे सहकारी किती खोटारडे आहेत हे निसर्गानेच दाखवून दिले. जलयुक्त शिवाराची कामे चांगली व योग्य जागी झाली असती तर झालेला थोडा का होईना पण पाऊस जमिनीत मुरून विहिरी व बोअरवेल्स, कूपनलिका यांचे पाणी वाढले असते. पण चुकीच्या जागी नुसते खड्डे खोदून पाणी साठत नाही, भूगर्भात मुरत नाही आणि भूजल पातळी वाढत नाही हे झोपेचे सोंग घेतलेल्या मुख्यमंत्र्यांना कोण सांगणार? माझी अत्यंत आवडती योजना आहे म्हणून ते जलयुक्त शिवार कुरवाळीत बसले. भूजल विकास व सर्वेक्षण यंत्रणा आणि या विषयातील जाणकार, अनुभवी तज्ज्ञ सरकारला वारंवार सांगत होते सगळ्या ठिकाणी जलयुक्त शिवार योजना यशस्वी होणार नाही. नुसते जमिनीला खड्डे पाडू नका. पण पक्षाच्या कार्यकर्त्यांची पोटं भरायची होती. त्यांना कामाचे ठेके द्यायचे होते. त्यांच्या फॉकलंड, जेसीबीला काम द्यायचे होते. म्हणून हा वांझोटा धंदा करण्यात येऊन जनतेचा पैसा भाजप कार्यकर्त्यांची घरे भरण्यासाठी व जनतेला मातीत घालण्यासाठी वापरण्यात आला हे आता सिद्ध झाले आहे.

जलयुक्त शिवारच्या नावाखाली मोठ्या व छोट्या धरण बांधणीच्या कार्यक्रमाला सरकारने कुलूप लावले. सगळ्या प्रकल्पांची कामे बंद ठेवली. जलसंपदा विभागाचे कर्मचारी नुसते हातावर हात ठेवून बसले. पैशाची तरतूद नाही. सुधारित प्रशासकीय मान्यता नाही. सगळ्या प्रकल्पांची कामे सिंचन घोटाळ्याच्या नावाखाली चौकशीत अडकवून ठेवली. अधिकारी व कर्मचाऱ्यांचे मनोधैर्य खलास केले. काम करण्याची इच्छा मारुन टाकली. सुप्रमा देताना अधिकाऱ्यांनी (पान १०१ वर)

राष्ट्रवादी स्वाभिमानी आधार! राष्ट्रवादी विचार !!

# सिद्ध झाला भाजप-सेनेतला खोटा कलगीतुरा

शिवसेना आणि भाजप यांच्यातला कलगीतुरा मागील चार-साडेचार वर्षे आपण पाहात आलो, ऐकत आलो. दोघांनी एकमेकांना दिलेल्या उपमांमुळे जनतेची मोठी करमणूकही झाली. कुणी कुणाला शिव्या दिल्या नाहीत असा एकही दिवस गेला नाही. शिवसेनेचे कार्याध्यक्ष श्री. उद्धव ठाकरे यांनी तर मा. पंतप्रधान नरेंद्र मोदी, अमित शहा, मुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस यांची जेवढी म्हणून लक्तरे उतरविणे व



चव्हाट्यावर टांगणे शक्य होते तेवढे सगळे केले. अगदी ''देश का चौकीदार चोर है'' असे म्हणण्यापर्यंत त्यांची मजल गेली. राफेलपेक्षा पिक विमा घोटाळा किती मोठा आहे हे उद्धवजींनी पंढरपूरच्या सभेत मोठं रंगवून सांगितले. बोलण्यात उद्धवजींची हयगय नव्हती. वाघाच्या भाषेत डरकाळी फोडत होते. पण कृती करायची वेळ आली की त्यांचे सगळे अवसान गळून जाऊन ते भित्रा ससा व्हायचे. असे ते शेपूट का घालून घेत होते त्याचे खरे उत्तर त्यांनाच ठाऊक. परंतु सभोवतालचे लोक सांगतात त्यावरुन असे दिसते की उद्धवजींना शिवसेनेचे आमदार, खासदार फुटण्याची भिती वाटत होती. भाजपशी आपण युती केली नाही तर पूर्वीइतके खासदार, आमदार निवडून येण्याची शक्यता नाही. इतकेच काय पण आपल्या पक्षातले लोक आपल्याला सोडून भाजपत जातील आणि तिथून उमेदवार म्हणून उभे राहतील. शिवसेनेच्या खासदार, आमदारांना भाजप विकत घेऊन निवडणुकीच्या रणांगणात उतरवेल. हातचे तेलतूप सगळेच जाईल. आणि हो, यदाकदाचित उद्या देवेंद्राने मुंबई महानगरपालिकेच्या गैरकारभाराची चौकशी लावली आणि सध्या बंदिस्त ठेवलेल्या फाईली पुन्हा उघडल्या तर

## प्रबंध संपादकीय



त्याची धग आपल्यापर्यंत पोहचू शकते याची जाण उद्धवजींना असल्यामुळे त्यांनी पडती व नमती भूमिका घेऊन लाचारी स्वीकारली. स्वाभिमान व स्वत्व सोडले आणि सरसेनापती मा. बाळासाहेब ठाकरे यांनी जो ताठ कणा ठेवला होता तो उद्धवजींनी मोडून दिला. सत्तेसाठी जी प्रचंड लाचारी उद्धवजींनी स्वीकारली त्यामुळे कै. बाळासाहेबांचा आत्मा कळवळून म्हणाला असेल, ''उद्धवा काय तुझी ही करणी, दिला



नावलौकिकास काळीमा फासोनी.'' आजही सच्च्या, कडव्या शिवसैनिकांना भाजपाबरोबरची ही युती मनोमन पटलेली नाही. आपला स्वाभिमान गहाण ठेवून जी युती केली आहे त्यामुळे शिवसेनेची जी काही थोडीफार राहिली होती ती विश्वासार्हताही संपुष्टात आलेली आहे. भाजप शिवसेनेला गाडल्याशिवाय राहणार नाही. सत्तेत (पान १०० वर)

# सकारात्मक शहाणपण हाच दहशतवादावरचा उतारा

आधुनिक युगात नव्यानव्या तंत्रज्ञानाचे मनमुक्त स्वागत करताना आजही आपल्यासमोर दहशतवादाचे नवीन रूप पुढे येते आहे. आजच्या विश्वात्मक समानतेच्या काळात दोन भिन्न संस्कृतीतला वेगळा तुच्छतावादही आज उघड उघडपणे दिसतो आहे. हा कशाचा परिणाम आहे? याचे उत्तर शोधणे हे अत्यंत गरजेचे आहे. आज माणसाच्या अवनतीचे सुद्धा एक महत्त्वाचे कारण असे मानले जाते की, ज्या माणसाला कमी लेखायचे आहे त्याचा केवळ आभास निर्माण करणे याची रिती रूढ झाली आहे. त्यामुळे आपल्या सामाजिक स्विकाराला मर्यादा पडतात. पुलवामा हिंसाचाराच्या निमित्ताने पुन्हा एकदा फेरविचार करताना असे दिसते की, एखाद्या गोष्टीचा नवा शोध म्हणून आपण त्याची प्रचंड जाहिरात करतो. परंतु त्या वस्तूचे सामाजिक महत्त्व आपल्याला नीटपणे सांगता येत नाही. संस्कृतीचा सिद्धांत आजही अवाजवी वर्गिकरणात अडकलेला आहे. याचे कारण जगाची विभागणीच मुळी युद्धाच्या रेषा निर्माण करते की काय असे वाटते. धर्माच्या नावावर वेगवेगळ्या प्रकारचे जाहीर उच्छाद मांडले जातात. धार्मिक जाणिवांचे मूलभूत स्वरूप कुणीही लक्षात घेत नाही. त्यामुळे लहान मुलाची ओळख धर्माच्या कप्प्यातून होते. त्यातल्या त्यात जातींचे कप्पे आणि विशेषतः मूलतत्त्ववादी कप्पे तर आज अतिशय प्रभावी होत आहेत. यांच्याकडे कोणत्या स्वरुपात पाहायचे? या प्रश्नाचा विचार आज अनेक विचारवंत करताहेत. यामध्ये वेगवेगळ्या जाणीवा आणि निवड स्वातंत्र्य यांच्याकडे दुर्लक्ष होते आहे. त्यामुळे राष्ट्राची हानी होते. जगाकडे कोणत्या दृष्टीने पाहावे आणि कशा प्रकारे जगाची उंची वाढवावी, याचे भान आजच्या विचारवंतांना फार मोलाचे वाटते.

नोबेल पारितोषिक विजेते अर्थशास्त्रज्ञ डॉ. अमर्त्य सेन यांचे 'अस्मिता आणि हिंसाचार' हे पुस्तक प्रसिद्ध झाले. त्याचा मराठी अनुवाद डॉ. सुप्रिया सहस्रबुद्धे यांनी केला आहे. या पुस्तकात डॉ. सेन यांनी हिंसाचाराची प्रवृत्ती व्यक्तिगत जाणिवेवर आघात केल्यानंतर कशी जन्माला येते, याचे मौलिक विवेचन केले आहे. जगण्यासाठीचा प्रश्न भाकरीशी तीव्र झाल्यानंतर माणसाला सुसंगतीने जाण्यापेक्षा विसंगतीने जाणे फार आवडते, त्यांना नेहमी असे वाटते सातत्यपूर्ण कामातून आपल्या श्रमाला काहीसे मोल प्राप्त झाले तरच आपण व्यवहाराचा ताणाबाणा मिटवू शकतो. याचा परिणाम सामाजिक जीवनावर इतका झालेला आहे की, विज्ञानाचे शोधही फक्त राष्ट्रीय हित सांभाळूनच केले जातात. संपूर्ण मानवजातीच्या कल्याणाचे उद्दिष्ट बाजूला राहते. याचा परिणाम उदात्त विचार फक्त बोलण्यापुरते राहतात आणि प्रतिक्रियेच्या द्वंद्वात्मक जाणिवेतून माणूस एकमेकांवर कुरघोडी करतो. त्यातून निष्कारण 'मी' पणाबरोबर मी पणाचा अहंकार वाढतो आणि जगावर फक्त माझेच राज्य आहे, अशी एक संकुचित साधारणीकरणाची भूमिका वाढते. जे लोक धर्म पाळतात ते सर्वदृष्टींनी मूलतः सारखेच असतात. परंतु जेव्हा एकमेकांवर राज्य करण्याची ईर्षा जन्माला येते त्यावेळेला मानवी मनातला पशू जागा होतो आणि तो माणसाची गळचेपी करतो.

सांस्कृतिक विश्लेषणाच्या काही वर्तुळातील बौद्धिके जर आपण लक्षात घेतली तर हिंसाचारातून एकमेकांवर लादण्याच्या प्रवृत्ती जास्त जन्माला येतात. भारतातील धार्मिक बहुविधता हा सुद्धा विश्वात्मक जाणिवेचा पुरावा आहे. परंतु जेव्हा धर्मातल्या वर्चस्ववादी प्रवृत्ती वाढतात त्यातून आपल्याला वेगवेगळ्या प्रकारचे हिंसक मार्ग सुचत जातात. नव्या शब्द प्रयोगातून जुन्या पद्धतीचे जुलमी अत्याचार चालत असतात. लोकशाहीत बोलायचा अधिकार नक्कीच आहे. बोलणाऱ्याचे ऐकून घ्यावे लागते. परंतु जेव्हा तोंड दाबून मुस्कटदाबीचा प्रयोग सुरू होतो तोसुद्धा एक वेगळा हिंसाचाराच असतो.

## संपादकीय




पुलवामात हल्ला झाल्यानंतर फोडा आणि झोडा ही संस्कृती वाढली. याचा परिणाम आपल्याजवळ समर्थ बळ असूनही आपण एकाकी पडलो. विशिष्ट प्रकारच्या तात्त्विक जाणिवांमध्ये आपण अन्वयार्थ लावण्यात वेळ घालविला. परंतु त्यातून निर्माण होणाऱ्या विविध प्रकारच्या संघटना यांचे आपल्यावर काय परिणाम होतील, याची शहानिशा करण्याची शक्ती विसरलेली प्रजा कसे काय राष्ट्र चालविणार? याचा परिणाम संघटना एकीचे बळ लादताहेत आणि दुसऱ्या बाजूला सामान्य माणसाला व्यवहार करणे दुर्मिळ झाले आहे. पुलवामातील हिंसाचार हा केवळ हिंसाचार नाही. पाकिस्तान नावाची प्रवृत्ती ज्या पद्धतीने उसळ्या मारते आहे त्याची शहानिशा करण्याची वेळ आता आली आहे. सगळे काही शत्रूवर लादून आपण जर कसलाही विचार न करता बोलू लागलो तर एकूणच सामाजिक विचारशक्ती गुदमरते आहे असे वाटते. नागरिकत्व आणि वैचारिक अधिकार यांना टांगून ठेवणे हा पाकिस्तानचा कायमचा उद्योग आहे. त्यातून राष्ट्रवादाच्या नावाखाली वांशिक गटातील द्वेषाची भावना अधिक पसरत चालली आहे. त्याचा परिणाम एखाद्याची जातीय धार्मिक ओळख सांगितली की मग काहीही न सांगितले तरी चालेल, अशी संस्कृती आपण निर्माण करू पाहात आहोत. हल्ली तर असे झाले आहे की, गटात येणारा आपल्या गोटाशी कितपत इमान राखतो हेही पाहिले जाते. यातूनच एखाद्या समुहाला अपराधी ठरविले जाते आणि त्यांचा सामूहिक निःपात करण्याच्या नावाखाली विघटनाच्या प्रवृत्ती वाढतात.

वर्षानुवर्षे चाललेला भारत-पाकिस्तानमधील दुरावा याची आजही आपल्याला नक्की उकल करता येत नाही. त्यावर इलाज करणे तर सोडा पण सर्वात

महत्त्वाचा मुद्दा हा आहे की, सार्वजनिक जीवनातून राष्ट्रीय सभ्यता हीही आज लोपत चालली आहे. हे पुलवामा हल्ल्याने दाखवून दिले आहे. याचा अर्थ पाकिस्तानचा दबाव वाढतो आहे ही मानण्याची प्रवृत्ती बाकीच्या दबावात वाढून आणखीन तेढ वाढण्याची शक्यता निर्माण झाली आहे. यात सत्ताधीश जेव्हा वाट्टेल तसे बोलतात तेव्हा ते कितपत विचाराला धरून असते हे सांगता येत नाही. याचा अर्थ मुळात ही प्रवृत्ती शिरता कामा नये याची आपण दक्षता घ्यावी लागते. त्यात एक अत्यंत महत्त्वाची बातमी आली ती अशी की, 'Organisation of Islamic Co-operations' या इस्लाम बहुल देशांच्या वार्षिक अधिवेशनासाठी भारताला प्रथमच निमंत्रित करण्यात आले. ही घटना टाळ्या वाजविणारी नाही. यातून एक सूचक बोध असा आहे की, विश्वात्मक विचाराची आजही गरज असलेल्या या जगाला आम्ही स्थान देतो. या निमित्ताने काही सांस्कृतिक भाष्य करून मनामनांना आधार देण्याचा एकमेकांचा मुद्दा आपल्या मुत्सद्देगिरीच्या सर्व शक्तीनिशी कसा करायचा याचा विचार केला पाहिजे. शांतता पाळण्याचे नुसते आवाहन करण्यापेक्षा शांतता हा मानवी मनाचा निरोगी श्वास आहे. ही जाणीव देणे महत्त्वाचे आहे.

सौदी राजपुत्र मोहम्मद-बिन-सलमान याचा अनावश्यक पाहुणचार करण्यापेक्षा मुत्सद्देगिरीसकट आपला प्रभाव वाढविणे आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर मुत्सद्देगिरीच्या चिंतनातून नवे-नवे मित्र जोडून त्यांची संघटना उभारणे, त्याचे दडपण आणणे महत्त्वाचे ठरते. आपल्याला या दृष्टीने महाभारतीय युद्धाचे उदाहरण अत्यंत महत्त्वाचे आहे. कुरुक्षेत्रावरील युद्ध टाळण्यासाठी भगवान गोपालकृष्णांनी आपल्या परीने कसोशीने निकराचे प्रयत्न केले. परंतु दुर्योधनाची मूळ प्रवृत्ती कधीच पालटली नाही. म्हणून गीतेचे तत्त्वज्ञान कृष्णाने अर्जुनाला सांगितले आणि त्याला लढायला प्रवृत्त केले. यातले महत्त्वाचे कळीचे सूत्र हे आहे की, त्यांनी आधी आंतरिक युद्धाची मनोभूमी तयार केली आणि मग प्रत्यक्ष युद्ध झाले. आजच्या काळात अशी धर्मयुद्धे नाहीत हे आम्हांला माहिती आहे. प्रत्येक राष्ट्राने अणु बॉम्ब तयार केला आहे. याचेही भान



**शहीद जवानांना भावपूर्ण श्रद्धांजली**

आम्हांला आहे. परंतु आपल्यातल्या राष्ट्रनिष्ठा या सर्वप्रथम आपल्या संघटना बळकट करीत पुढे न्यायच्या असतात. लष्करी सैन्य संपविले किंवा दहशतवादी संपविले म्हणजे सारे काही साध्य होईल असे नाही. पाकिस्तानात सतत अत्याचार चालू असतात. उलट पाकिस्तानच्या राजकीय लष्करी सत्तेमुळे पाकिस्तानला नेमका रस्ता सापडत नाहीये. पाकिस्तानची अवस्था चुकलेल्या वाटसरू सारखी झालेली आहे. आपल्याला अशा वाटेने जाण्यापेक्षा काश्मीरमधल्या लोकांशी संवाद निर्माण करून त्यांना आधी आपण भारतीय आहोत, याची जाणीव करून देण्यासाठी सर्व राजकीय पक्षांनी मिळून संवाद प्रकल्प राबविले पाहिजेत.

संवाद म्हणजे केवळ भाषणबाजी नाही. स्टेजवर आले आणि दहा मिनिटे बडबडून गेले. हा संवाद नव्हे. संवादात आत्मियता असते, आपलुकी असते. आपलुकीतून विश्वास वाढतो. विश्वास सौहार्दतेची भावना जन्माला घालते. यातून जी सहृदयता जन्माला येते, ती किंवा तो मानवी मनाचा खरा रोजगार असतो. अशी मने जर एकत्र आली तर सामुहिक प्रकल्प घेऊन चांगली कामे उभी करता येतात. हातांना काम दिले म्हणजे आपले काम संपले असे होत नाही. दिलेल्या कामाचे हात पुढे जातायेत की नाही हे पाहणे महत्त्वाचे असते. वसुधैव कुटुंबकम् हे फक्त भिंतीवर लावण्यापेक्षा जोडणाऱ्या मनांनी आपणहून तसे म्हटले पाहिजे तर आपलाला वसुधैव कुटुंबकम् याचा प्रत्यय येतो. नाहीतर सामान्य गोष्टीही राष्ट्रीय भावनांचे ज्वालाग्नी बनतात. पुलवामा हल्ल्यानंतर क्रीडा क्षेत्रात संतापाची लाट उसळली. ती स्वाभाविक आहे. परंतु त्यासाठी पाकिस्तानवर बहिष्कार घालणे ही भावना अति टोकाची वाटते. आपण पाकिस्तानशी काही व्यवहार बंद केले याचा अर्थ पूर्ण व्यवहार बंद केले असा होत नाही. ऑलिम्पिक समितीने हा भेदाभेद केलेला दिसत नाही. कारण समितीच्या दृष्टीने भारत आणि पाकिस्तान हे ऑलिम्पिक संघटनेचे सदस्य आहेत. भारतातील स्पर्धेत ज्या पाकिस्तानी नेमबाजांना आपण रोखले ते ऑलिम्पिकमध्ये पात्र होण्यास लायक नव्हते. परंतु भावनिक निर्णय आपण घेतला आणि त्यातून वेगवेगळ्या प्रतिक्रिया निर्माण झाल्या. सुनील गावसकर बरोबर आहे की सचिन तेंडुलकर बरोबर आहे? हा प्रश्न नाही. त्यांच्या प्रतिक्रियांना वृत्तपत्रांनी ठळक प्रसिद्धी दिली. याबाबत दहशतवादाला सदैव खतपाणी घालणाऱ्या पाकिस्तानवर सर्वांनीच बहिष्कार घालावा ही मागणी उचित ठरते. एका दृष्टीने कधीकधी अतिरेकी टोकाची भूमिका घेऊन आपण निष्कारण गोत्यात कसे येतो याचाही विचार करण्याची आता वेळ आली आहे. सर्व बाजूंनी कोंडी करण्यात पाकिस्तानची भावना अधिक प्रबळ होण्यापेक्षा धार्मिक उन्मादाचे समूळ उच्चाटन सर्वांनी मिळून करणे गरजेचे आहे. याचा अर्थ बंदुका खाली ठेवून द्यायच्या असा नाही. आपला शस्त्रसंभार हा अद्ययावत असलाच पाहिजे. हे योग्य आहे. विशेषतः प्रसिद्धी माध्यमांची आणि वृत्तपत्रांची यात फार मोठी नैतिक जबाबदारी आहे. अराजकतेच्या बेधुंद आणि बेधडक बातम्या देण्याऐवजी किंवा माध्यमांवर त्या बातम्या दाखविण्याऐवजी विवेकाने व धीरोदात्तपणे शिस्तबद्ध पद्धतीने आपल्याला दहशतवादाला तोंड देता आला पाहिजे. लष्करी पोशाख घालून माणसे मारण्यापेक्षा लष्करी पोशाखाचा मान राखणारा आपल्या देशातला प्रत्येक भारतीय नागरिक हा सैनिकच आहे अशी भावना जर सर्वत्र निर्माण झाली तर बरेचसे प्रश्न मोकळे होतील. प्रांतांची नावेही सामाजिक सुशासनाच्या व्यवस्थेसाठी असतात. तो त्या राज्यव्यवस्थापनाचा एक भाग असतो. याचा अर्थ तो प्रदेश त्या राज्याचा स्वामी ठरत नाही. परंतु आज दुर्दैव असे झाले आहे की,

आम्ही प्रदेशालाच राष्ट्र मानून प्रदेशा प्रदेशातच माऱ्यामाऱ्या करीत बसलो आहोत. याचे प्रत्यक्ष लोन आता लष्करापर्यंत पोहोचले आहे हे फार वाईट आहे. मग एकतेच्या आणि अखंडतेच्या नावाने बोलण्यात काय अर्थ आहे?

मी महाराष्ट्रीय आहे किंवा मी बंगाली आहे, ही माझ्या व्यवहाराची प्रादेशिक मर्यादा आहे म्हणून इतरांना मी तुच्छ लेखायचे कारण नाही. विशेषतः भारताच्या पूर्वेच्या प्रांतात प्रादेशिक अस्मितेच्या नावाने जी काही प्रचंड घुसमट होते आहे ती ही दहशतवादाला आणि हिंसाचाराला खतपाणी घालणारी आहे. आजही आपण पाहतोच ना, आसामातील, अरुणाचल प्रदेशातील आंदोलने सुरूच आहेत. नेपाळ पेचात आहे. तिबेटींचे आंदोलन अर्धशतकाहून अधिक काळ चालूच आहे. या सगळ्या प्रदेशांना इतके एकाकी वाटण्याचे कारण कोणते ते बघा? त्याला कारणीभूत आपणच आहोत. आपण त्यांना कधीही आपले म्हटले नाही. आपल्यात सामावून घेतले नाही. याचा परिणाम स्वतंत्र खलिस्तान मागण्याइतपत झाला. अशा रीतीने जर मातृभूमीचे लचके तोडायला लागले तर आपले कसे व्हायचे? या सगळ्याचा परिणाम दहशतवादाला आणखीन अनुकूल वातावरण मिळण्यात होतो आहे. हे प्रश्न अश्रू ढाळून व मेणबत्त्या लावून सुटणारे नाहीत. फोटो काढण्यासाठी भावनांची आवाहने करण्याची ही वेळ नाही. कणव या नावाखाली कुठल्याही धर्माचा आणि प्रांताचा असला तरीही त्याला त्याची जागा दाखवून माणसात आणणे अशा प्रकारच्या विवेकाच्या शाळा जर गावोगावी जन्माला आल्या तरच आमच्या 'जनगणमन' या भावनेला काही अर्थ आहे. एकमेकांना शिव्या देण्यापेक्षा एकमेकांची गुणदोषांची शहानिशा करत विवेकाच्या बळाने या सगळ्या प्रवृत्तींशी मुकाबला करता आला पाहिजे. मानवी प्रवृत्तींमधल्या विकारांना चांगल्या वागणुकीचा जो लगाम आहे तो भक्कमपणे माणसाच्या हातामध्ये जपून ठेवणे हा मानवतावादातला राष्ट्रीय विवेक आहे. यातूनच धर्मनिरपेक्षतेच्या मूल्याला अर्थपूर्णता येते. ही खरी श्रद्धांजली हुतात्म्यांना ठरते. परंतु फक्त हुतात्मा होण्यासाठीच आपण माणसांना मारायचे का? हे पक्क्या मनगटांनी दहशतवाद्यांना समर्थपणे जाणून दिले पाहिजे. आततायी राजकारणाने या गोष्टी काहीही होणार नाहीत. दुसऱ्या देशात काय चालले आहे हे पाहण्यापेक्षा 'युद्धस्य: कथा रम्य:' म्हणून भूतकाळ चघळीत बसण्यापेक्षा सगळ्यांना बरोबर घेऊन आपण आपलाच वर्तमान स्वच्छ पुसत पुसत पुढे गेले पाहिजे. जगात सगळ्या प्रकारच्या आंतराष्ट्रीय संघटना आहेत. परंतु आपल्या राष्ट्रीय हिताला धक्का लावायला कोणीही तयार नाही. हे राष्ट्रीयत्व आहे का? आपल्याला आपले वर्चस्व फक्त राहू द्यायचे आणि बाकीच्यांना सांगायचे 'हम करे सो कायदा' हे करून आंतरराष्ट्रीय शांततेच्या गप्पा मारायच्या, ही केवढी विसंगती आहे! पाकिस्तान काय, चीन काय, अमेरिका काय किंवा रशिया, इंग्लंड काय यांच्या वागण्याचे खरे अंदाज आजही लक्षात येत नाही. हे लक्षात घ्या.

दोहा येथे झालेली परिषद किंवा पर्यावरणाच्या बाबतीत क्योटो व रिओ डी जानि रो करार हे केवळ आपल्या स्वार्थासाठी भारताला अडचणीत आणण्यासाठी अमेरिकेने केला ही जगजाहीर गोष्ट आहे आणि दुसऱ्या बाजूला तीच अमेरिका फक्त आपल्या आर्थिक हितसंबंधांसाठी पुन्हा हवे ते करणार! पाकिस्तानला सर्व मदत देणार आणि पुन्हा पाकिस्तानला भारताशी झुंजत ठेवणार आणि वर पुन्हा आशिया खंडाचे प्रश्न आम्हीच सोडवितो असा आव आणणार. या सगळ्या गोष्टी अनाकलनीय आहेत. या सगळ्याचा विचार नीट करूनच कोणाकडून किती मदत घ्यायची आणि कोणाचा विकास कितपत चालला आहे. याचा विचार करूनच आपल्याला पावले उचलावी लागतील.

सर्वसामान्य लोकमनाचा विचार करताना आपली भूमिका लोकांना स्पष्ट करून सांगता आली पाहिजे, ही लोकशिक्षणाची फार मोठी जाणीव आपण जितकी वापरली नाही तितकी ती दहशतवाद्यांनी वापरली. दहशतवादामुळे माणुसकीहीन मने जन्माला आली. आम्ही सांगू तसेच कपडे घातले पाहिजे. आम्ही सांगू बुरखे घातलेच गेले पाहिजे. हे दबावगट भयंकर दहशतवादी आहेत. कारण तिथे विवेकशून्यतेचा पूर्ण अभाव असतो. वृत्तपत्रे भडक करण्यासाठी अशा बातम्याही वापरल्या जातात. परंतु संपूर्ण जीवनाचा विचार केला तर कोणीही बेतालपणाचे समर्थन करणार नाही. सनसनाटी गोष्टीने हे निर्माण होत नाही. राजकीय पक्षांच्या प्रबोधन वर्गामधूनच हे निर्माण झाले पाहिजे. खऱ्या अर्थाने जर आपण जनाधाराचा आदर निर्माण करीत असू तर संघर्ष आणि कलहात वेळ घालविण्यापेक्षा आधी आपण 'एकमेकां साह्य करू, अवघे धरू सुपंथ' या मार्गानेच जाण्याची गरज आहे. याचा परिणाम आपले प्रशासन आपल्याला अधिक चोखपणे करता येईल. आज जगभर प्रशासकीय यंत्रणा आहे. विविध तऱ्हेच्या गुप्तहेर यंत्रणाही आहेत. परंतु दुर्दैव हे आहे त्या यंत्रणांमध्येही निष्कारण स्पर्धा आहे, चढाओढ आहे. एकमेकांवर कुरघोडी आहे. त्यामुळे योग्य ती माहिती पुढे जाण्यापेक्षा संघटनेच्या वर्चस्वापोटी अशा यंत्रणा राबविल्या जातात आणि या साऱ्यातून दहशतवादाची नवीनवी रूपे व्यक्त होतात. आम्हांला आमच्यातला शहाणपणा जागा करायचा आहे, त्यातून आम्हांला आमचा भारत घडवायचा आहे. या साऱ्यातून आमच्या वेदना आणि आमच्यातला संताप याला सुद्धा आम्हांला विचारपूर्वक उत्तरे देता आली पाहिजेत.

आज समाजातला सगळा शहाणपणा संपला आहे असे नाही. सुदैवाने आजही अत्यंत चांगला विचार करणारे विचारवंत आहे. उदाहरणच द्यायचे झाले तर निवृत्त लेफ्टनंट जनरल एस. ए. हासनैन यांनी एक अत्यंत महत्त्वाचे विधान काश्मीरच्या संदर्भात केले आहे... ''काश्मीरी लोकांचा आपण शारीरिक छळ करीत राहिलो, त्यांना समाजमाध्यमांवर सतत डागण्या देत राहिलो तर आपण आपला काश्मीर कधीच म्हणू शकणार नाही आणि काश्मीरचा प्रश्न कायद्याने सुटणार नाही. यातून फक्त काश्मीरवासियांची नाराजी आणखीन वाढत जाईल.''

निवृत्त लेफ्टनंट जनरल डी. एस. हुडा यांनी पुलवामाच्या संदर्भात एका मुलाखतीत म्हटले, ''आपण काश्मीरच्या प्रश्नाकडे डोळेझाक करतो आहोत. पुलवामातील हा महाभयंकर हल्ला हा स्थानिक दहशतवाद आहे. काश्मीरमधल्या अंतर्गत प्रश्नांमध्ये तो दडलेला आहे.'' या साऱ्याचा अर्थ एक आहे की, जो आम्ही संपादकीयातून वारंवार व वेळोवेळी व्यक्त केला आहे आणि तो म्हणजे


काश्मीर प्रश्नाचा विचार एकंदर भारतासह करावा लागेल. काश्मीर रोज लोकांचे आवाज ऐकतो आहे. सर्वात कडक सुरक्षिततेखाली त्यांना यातनांना सामोरे जावे लागते आहे. यामुळे त्यांचा आंतरिक संताप उफाळतो आहे. निवृत्त आयपीएस अधिकारी ज्युलियो रिबेरो यांनी म्हटले आहे की, ''दहशतवादी ज्या समुदायाचे आहेत त्या समुदायांची मने आपण जिंकली नाही तर त्यांना सतत त्यांच्या सहधर्मियांकडून रसद पुरवठा होत राहील. दहशतवाद्यांची मालिका तयार होत जाईल. भावनांच्या अतिरेकातून आणखीन जास्त दहशतवादी काम करू लागतील.''

लेफ्टनंट जनरल कवलजित सिंग धिल्लाँ हे सध्या चिनार कोअरचे कमांडर आहेत. त्यांनी जाहीरपणे सांगितले की, ''काश्मीरमध्ये जो कोणी बंदूक उचलेल त्याने शरणागती पत्करली नाही तर आम्ही त्याला ठार मारू.'' या साऱ्या प्रतिक्रिया मुद्दाम नोंदविल्या आहेत त्या अशासाठी की, केवळ आक्रमक उत्तराने हा प्रश्न संपणार नाही. सत्ताधारी भाजपाने व विशेषतः पंतप्रधान मोदी यांनी या हल्ल्याचे राजकीय भांडवल करून पक्षाच्या हितासाठी याचा वापर करू नये. ५६ इंच छाती नुसती फुगवून होत नाही. त्यासाठी कर्तृत्व लागते. मागील पाच वर्षांत जनतेने मोदी किती निष्क्रीय, बोलघेवडे व खोटारडे आहेत हे पाहिलेले आहेत. त्यामुळे त्यांच्याकडून आता फार अपेक्षा नाहीत. आपल्याला या सगळ्यांसाठी विविध क्षेत्रातील विचारांना एकत्र करून आपल्या विचारांची उंची आणि नैतिकतेचा दरवाजा अधिक स्वच्छ करीत आपण गेलो तर आपला एक वेगळा वचक निर्माण होऊ शकतो. केवळ धार्मिक वेड म्हणून बाजूला काढून या प्रश्नांकडे कानाडोळा करता येत नाही.

आपण इतिहासामधली उदाहरणे नीट बघू शकता. औरंगजेबाने आपल्यावर राज्य केले. त्याने हिंदूंवर जिझिया कर लावला. या गोष्टी आपल्याला माहिती आहेत. तरीही त्याचा मोठा भाऊ दारा शुकोह याने वेगळे वर्तन केले. तो शहाजनाचा मुलगा होता. त्याने हिंदू उपनिषदांचे संस्कृत पर्शियनमध्ये भाषांतर केले. याचा परिणाम म्हणजे एक शतकाहून अधिक काळ हिंदू धर्मविषयक तत्त्वज्ञानातही एक विशेष प्रकारची आस्था निर्माण झाली. त्याच घराण्यातला अकबर. परंतु त्याचे म्हणणे असे होते की, कोणत्याही व्यक्तीच्या धर्मामध्ये ढवळाढवळ होता कामा नये. ज्याला जो धर्म आवडेल त्या धर्माचा स्वीकार करण्याची त्याला परवानगी असली पाहिजे. हे त्याचे ध्येय होते. त्या काळात त्याने खुल्या संवादाच्या आणि मुक्त निवडीच्या आवश्यकतेवर भर दिला. आश्चर्य म्हणजे त्याच्या दरबारात धार्मिक चर्चासत्रे तर व्हायचीच, परंतु ख्रिश्चन, ज्यू, पारशी, जैन या नास्तिक विचारवंतांच्या चर्चा होत असत. ही उदाहरणे अपवादात्मक आहेत याबद्दल वाद नाही. परंतु विचारांची देवाण–घेवाण या साऱ्यातून होत असते आणि त्याचे राजकीय ध्रुवीकरण प्रत्येक राष्ट्रामध्ये आहे. या साऱ्यामध्ये मानवतावाद आणि दहशतवाद या द्वंद्वांचे सतत प्रत्येक राष्ट्राला भान असे. यातूनच नवा वसाहतवाद जन्माला आला. मानवी जीवन उद्ध्वस्त करणारी युद्धे जन्माला आली. गुलामांचा व्यापार वाढला. सामाजिक छळवाद वाढला. वर्णभेद जन्माला आले. या साऱ्यातून जेव्हा संस्कृती व समाज पुढे जात असतो. तरी त्याचे अवलोकन करणे आवश्यक ठरते. भारतीय संस्कृतीने अनेक चांगल्या गोष्टी जशा दिल्या तशी पाश्चात्य राष्ट्रातील विज्ञानवादी परंपराही कालांतराने भारताने स्वीकारली.

लोकशाही आणि व्यक्तिस्वातंत्र्य हा मुद्दा आजही मोठ्या प्रमाणात चर्चिला जातो. धार्मिक मूलतत्त्ववाद आणि आंतरराष्ट्रीय दहशतवाद याचीही चर्चा सर्वत्र होते. या साऱ्यातून भारताचे एक मोठेपण नक्कीच आहे आणि ते म्हणजे भारतातली आध्यात्मिक उन्नती अजूनही अत्यंत समर्थ आहे. विविध प्रकारच्या साम्राज्यवाद्यांनी आपली राज्ये निर्माण केली परंतु कोणालाही शांतता निर्माण करता आली नाही. सर्व प्रकारची आक्रमणे येऊनही भारत हा जगातील एकमेव देश असा आहे की, भारताने विश्वाला शांती मंत्र दिला. 'पूर्ण मदः पूर्ण मिंदम्' हे महत्त्वाचे जीवनाचे सूत्र दिले. बाह्य जगातले भौतिक विज्ञान आणि तंत्रज्ञान जगाने स्वीकारले. परंतु भारताने दिलेले हे आध्यात्मिक क्षेत्रातले आंतरिक योगदान आणि त्यावरील सांस्कृतिक व्यक्तीमत्त्वातून निर्माण केलेला विश्वमानव हा मानवतेचा गाभा आजही फक्त भारतच देऊ शकतो. ही जी सांस्कृतिक एकता भारताने दिली त्यामुळे आजही भारत सर्वांच्या प्रेमाचा विषय बनला आहे.

कुठल्याही राष्ट्रामध्ये आजही जशी विकासाला गती आवश्यक आहे, तशी सांस्कृतिक एकतेचा विकास होणेही गरजेचे आहे. सर्व धर्मांचे सार मनःशांती हेच आहे. आत्यंतिक प्रगतीने निर्माण होणाऱ्या अशांततेलाही आध्यात्मिक शांतीने जिंकले आहे. भारावलेल्या मनामनांचा आंतरराष्ट्रीय संवाद आजही जागतिक रामायण परिषदेने आणि जागतिक तत्त्वज्ञान परिषदेने होतो हे सकारात्मक शहाणपण हा हिंसाचारावर फार मोठा उतारा आहे. विज्ञानाचा समाज घडविणे ही आपल्यावर महत्त्वाची जबाबदारी नक्कीच आहे. त्याबरोबर विज्ञानातल्या विकृतींना पायबंद घालण्याचे काम आध्यात्मिक सकारात्मकता निर्माण करते. अशा प्रकारचा समाज हा राष्ट्रीय नागरिक होऊ शकतो. रयतेचे राज्य हा वाक्यप्रयोग छत्रपती शिवाजी महाराजांनी मुद्दाम केलेला आहे. राजधानीचा किल्ला निवडताना सुद्धा महाराजांनी कुठेही आपले नाव दिले नाही. त्यांनी राजधानी केली ती रायगडावर. रयत म्हणजे सामुहिक भान. सामुहिक भान जर सकारात्मक असेल तर त्याच्या विकासात्मक गरजा मोकळ्या होऊ शकतात. प्रजेला आत्मविश्वास येतो. मनातली द्वंद्वे नाहिशी होतात. मानवी हक्कांचा आदर्श प्रत्येक जण आपला मानतो. प्रादेशिक बहुविधतेतून राष्ट्रीय एकता समृद्ध होते. वस्तुस्थितीचा उत्तम अभ्यास करता येतो. बांधिलकीची जाणीव निर्माण होते. अजून आपली प्रगती होणे आवश्यक आहे याचीही जाणीव होते. वर्तनावर आणि विचारसरणीवर सांस्कृतिक प्रभाव उमटतो. आपल्या जगण्याला मूल्य मिळते. बहुसंस्कृतीवाद आणि सांस्कृतिक स्वातंत्र्यही समृद्ध होते. यामध्ये सकारात्मक भूमिकेचा प्रत्यक्ष वाटा असतो. त्यामुळे आपल्याला स्वातंत्र्यासाठी उदार अंगण मिळते. हिंसाचाराच्या निमित्ताने हे चिंतन आम्हाला पुन्हा करावेसे वाटले, याचे एकमेव कारण म्हणजे आपल्या जाणिवेची क्षितिजे विस्तारण्याची ही महत्त्वाची संधी आपण मानूया. यातून ज्ञानविज्ञानाने आपण समृद्ध होऊया.



# महाआघाडीची निवडणूकपूर्व पहिली संयुक्त सभा, नांदेड

**आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काँग्रेस–राष्ट्रवादी काँग्रेस, शेकाप आणि समविचारी व धर्मनिरपेक्षता मानणाऱ्या सर्व राजकीय पक्षांच्या महाआघाडीची संयुक्त सभा २० फेब्रुवारी २०१९ रोजी नांदेड येथे संपन्न झाली. या सभेला मार्गदर्शन करताना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांनी केलेले हे मार्गदर्शन...**



# राफेलचं भूत मोदी सरकारला गाडल्याशिवाय रहाणार नाही

**शरद पवार**



निवडणुका आल्यात, येतील, होतील. पण एक चिंतेची परिस्थिती आज देशामध्ये निर्माण झालेली आहे. कालच्या 14 तारखेला आपण बघितलं, काश्मिरच्या खोऱ्यामध्ये जवानांच्यावर हल्ला झाला. आणि 40पेक्षा अधिक जवान मृत्युमुखी पडले. एक संकट देशावर आलं आणि असं संकट ज्यावेळेला येते त्यावेळेला या देशाचा लौकिक हा आहे, की आम्ही सगळे मतभेद विसरतो आणि देशाला, जगाला एकीचं दर्शन घडवतो. पण इथं घडलं काय? हल्ला झाल्याच्यानंतर दुसऱ्या दिवशी देशाच्या गृहमंत्र्यांनी देशातल्या सगळ्या राजकीय पक्षांच्या प्रमुख लोकांना निमंत्रित केलं आणि एका विचारानं पावलं टाकण्याच्यासंबंधानं आवाहन त्याठिकाणी केलं. सगळ्या पक्षाचे लोक हजर होते. मी स्वत: हजर होतो. आम्हाला सांगितलं, की नॅशनल हायवेवरून रात्री अडीच वाजता ती वाहनं निघाली. 78 वाहनं. 2547 जवान. नॅशनल हायवेवरनं जातात आणि एके ठिकाणी एक गाडी येवून त्या गाडीवर आदळली जाते आणि 40 जवान जागच्या जागी ठार होतात. काही जवान बाहेर येतात. बाहेरून त्यांच्यावर गोळ्या घातल्या जातात.

कसं घडलं हे. हे घडलं त्याच्या पाठीमागं शेजारच्या देशाची साजीश होती. आखणी होती. साधनांची पूर्तता होती. त्यामधून हे घडलेलं होतं. संकट मोठं होतं. आम्ही सगळे विरोधी पक्षाचे लोक एकत्र आलो. गृहमंत्र्यांच्या बैठकीला हजर राहिलो. माझी सगळी कामं मी बंद केली आणि सरळ दिल्ली गाठली. आणि काय पहायला मिळालं. पहायला मिळालं, की एवढ्या मोठ्या संकटाच्यासाठी बोलवलेल्या बैठकीला प्रधानमंत्री हजर नव्हते. सगळ्या पक्षाचे लोक हजर होते. एका पक्षाचे लोक कुणीही हजर नव्हते आणि त्या पक्षाचं नाव भारतीय जनता पार्टी. ज्यांच्या हातामध्ये सत्ता आहे, ज्यांच्या हातामध्ये सरकार आहे. ज्यांच्या हातामध्ये निर्णय घ्यायचा अधिकार आहे. त्या पक्षाचा एकसुद्धा प्रतिनिधी त्या बैठकीला उपस्थित राहिला नाही. आम्ही काय त्याच्या खोलात गेलो नाही. कारण हा राजकारण करण्याचा प्रसंग नव्हता. आम्ही ठरवलं, की वाद करायचा नाही. एकमतानं आम्ही ठराव पास केला. लेखी ठराव केला, की असं संकट आल्याच्यानंतर सगळे मतभेद आम्ही विसरतो आणि आम्ही जवानांच्या आणि देशाच्या पाठीशी पडेल ती किंमत द्यायला तयार आहोत हा विश्वास या सरकारला आम्ही लोकांनी दिला. पण याची नोंद या सरकारने कितपत घेतली.

कारण आम्ही दिल्लीमध्ये बसलो. जवानांच्यासाठी काय करायचं याची चर्चा केली. निर्णय घेतले आणि प्रधानमंत्री धुळ्याला आणि यवतमाळला येवून अन्य प्रकारची भाषणं करण्यामध्ये दंग झाले होते. योग्य नाही हे. आणि म्हणून आज ज्यांच्या हातामध्ये सत्ता आहे, ते आज देशाचं रक्षण करण्याच्यासाठी कुठपर्यंत काबील आहेत, याचा विचार करण्याची ही वेळ आलेली आहे. शंकरराव चव्हाण या देशाचे संरक्षणमंत्री होती. मी या देशाचा संरक्षणमंत्री होतो. या देशाची ताकद काय आहे आम्हाला माहित होतं. आज ज्या पाकिस्ताननं ही चाल रचली, त्याच पाकिस्ताननी अशा प्रकारचा प्रयत्न करण्याचा डाव ज्यावेळी टाकला, लालबहादूर शास्त्रींच्यासारखा एक अत्यंत कर्तृत्ववान प्रधानमंत्री होते. यशवंतराव चव्हाण त्याठिकाणी संरक्षणमंत्री होते.



पाकिस्तानला धडा शिकवण्याचं काम त्यांनी त्यावेळेला केलं.

त्यानंतरच्या काळामध्ये पुन्हा एकदा पाकिस्ताननं मस्ती केली. इंदिरा गांधी प्रधानमंत्री होत्या. त्यांनी इतिहास नाही बदलला. त्यांनी जगाचा भूगोल बदलला होता. एका पाकिस्तानचे दोन भाग झाले. बांगलादेशसारखा नवीन देश जन्माला आला. पाकिस्तानचे दोन तुकडे केले, ही धमक इंदिरा गांधींनी या देशाच्या लोकांनाच नाही तर जगाला दाखविली, की हा देश हा दुबळ्यांचा देश नाही. आणि आज काय होतंय. हल्ला झाला आणि त्यानंतर दररोज कुठं दोन अधिकारी मारले जातायंत, कुठे चार अधिकारी मारले जातायंत. आम्ही माहिती घेतली सरकारकडनं की किती हल्ले झाले यांच्या काळामध्ये. 2014मध्ये 342 हल्ले झाले. 2015मध्ये 587 हल्ले झाले. त्याच्यानंतरच्या काळामध्ये साडे सहाशे हल्ले झाले. तीनशे, पाचशे, सहाशे, सातशे एवढे हल्ले देशामध्ये केले जातात शेजारच्या राष्ट्राच्या मदतीनं आणि हे सरकार म्हणून अशा दुबळ्यांच्या हातामध्ये ही सत्ता आहे.

गेल्या साडेचार वर्षात काय केलं या सरकारनं. नोटाबंदीचं सांगितलं. कोट्यवधी रूपयांचे नुकसान झालं. नोटबंदी जाहीर केली. दुसऱ्या दिवशी मोदी पुण्याला आले होते. वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटमध्ये एक उसाचं चर्चासत्र होतं. मी त्या संस्थेचा अध्यक्ष आहे. त्या संस्थेमध्ये प्रधानमंत्री आले. प्रधानमंत्र्यांनी सांगितलं, की नोटबंदी केल्यानंतर काळा पैसा संपेल, दहशतवाद संपेल आणि आज काय पाहिलं आपण. नोटबंदी झाली. गरीब माणसाला लाईनीमध्ये उभं राहावं लागलं. त्याला विचारलं, काय बाबा. तो म्हणाला, बरं झालं. मी त्याला विचारलं, की बरं कसं झालं. नाही म्हणाला, गावातला जो मोठा होता त्याच्याकडं जे घबाड होतं त्याचं घबाड गेलं. आम्हाला कौतुक वाटलं. पण थोड्याच दिवसामध्ये त्या बिचाऱ्याला कळलं संबंध शेती अर्थव्यवस्था उद्ध्वस्त झाली. आमची आई, बहीण. त्यांच्याकडं दुधाचे पैसे येतात. अंडी विकून पैसे येतात. भाजीपाल्याचे पैसे येतात. ती आमची शेतकरी कुटुंबातली माता त्यातले दोन पैसे कुठेतरी लपवून ठेवते. उद्या बरा वाईट काळ आला, पोरगं आजारी पडलं तर दवापाण्याची व्यवस्था करते. या सगळ्या नोटा साफ झाल्या. पैसा मोठ्याचा गेला नाही, पैसा गरीबाचा गेला. त्या नोटबंदीनं गरीबाचं जीवन उद्ध्वस्त केलं.


व्यासपीठावरील मान्यवरांनी व सभेला जमलेल्या समुदायाने मेणबत्त्या पाठवून पुलवामा हल्ल्यातील शहिदांना श्रद्धांजली वाहिली.

56 इंच छातीच्या गप्पा मारतात.

मला आठवतंय, असाच एक हल्ला कुठेतरी झाला. दोन सैनिकांची हत्या झाली. आजचे प्रधानमंत्री हे गुजरातचे मुख्यमंत्री होते. त्यांनी भाषण केलं, की मनमोहनसिंगजी पाकिस्तान को लव लेटर भेजना बंद करो. वो हमारा एक आदमी मारेंगे तो हमारे हात मे हुकुमत आयेगी तो हम उनके चार की हत्या करेंगे, ये ताकद हम दिखायेंगे. आणि आज आपण हेच बघतोय, शेकडो हल्ले होतायंत, शेकडो आमची माणसं दरवर्षी मरतायंत. या देशाचं रक्षण करणारा, या मातृभूमीचा मायेचा पूत त्याठिकाणी मृत्युमुखी पडतोय, तरीही हे सरकार त्यांचं संरक्षण करू शकत नाही. आणि

जीएसटी नावाचा कायदा केला. संबंध व्यापारी वर्ग, जो मोदींच्या पाठीशी होता, मोदी..मोदी....या घोषणा देत होता, एका जीएसटीनी लाखो व्यापाऱ्यांचं जीवन उद्ध्वस्त केलं आणि हा सगळा व्यापारी वर्ग मोदींच्या विरोधात गेल्याचं दिसतोय.

**शरद पवार आणि अशोक चव्हाण यांचा तलवार भेट देऊन सत्कार करण्यात आला. तेव्हा शेजारी छगन भुजबळ, डी.पी. सावंत, व सौ. अमिता चव्हाण व इतर मान्यवर.**



कर्जमाफीचा उल्लेख याठिकाणी केला. कशी कर्जमाफी केली. लोकांनी आत्महत्या केल्या. मला आठवतंय, मी शेती खात्याचा मंत्री होतो. यवतमाळच्या जवळ एक आत्महत्या झाली. बातमी आली. त्या रात्री मला झोप आली नाही. दुसऱ्या दिवशी सकाळी प्रधानमंत्री मनमोहनसिंग यांच्याकडं गेलो आणि त्यांना सांगितलं, की मनमोहनसिंग साहेब, आपल्याला यवतमाळला जायचंय. ज्या कुटुंबातल्या कर्त्या पुरूषाने आत्महत्या केली त्याच्या कुटुंबाला जावून भेटायचं आहे. तीन दिवसांत मी आणि मनमोहनसिंग नागपूरला गेलो, वर्ध्याला गेलो, यवतमाळला गेलो आणि त्या माऊलीला घरी जावून भेटलो. त्या माऊलीला विचारलं, की तुझ्या मालकानं का आत्महत्या केली. तिनं सांगितलं, की बँकेचं कर्ज होतं. बँकेनी नोटीस पाठवली. कर्जाचा हप्ता भरला नाही. हप्ते थकले आणि बँकेची नोटीस अशी होती, की तुझ्या घरादाराचा, भांडीकुंड्याचा लिलाव होणार आहे. पोरीचं लग्न ठरलं होतं. मुलीचं लग्न जवळ आलं आणि त्याचवेळी माझ्या संसाराचा, माझ्या भांड्याकुंड्यांचा लिलाव निघाला तर माझ्या मुलीचं लग्नसुद्धा मोडल्याशिवाय रहाणार नाही याची चिंता त्या शेतकऱ्याला होती आणि त्यामुळं त्यानं आत्महत्या केली. हे चित्र आम्ही पाहिलं. कशामुळं हे झालं. कर्जाच्या ओझ्यामुळं. दिल्लीमध्ये परत गेलो आणि आठ दिवसाच्या आत मनमोहनसिंगांच्या नेतृत्वाखालच्या सरकारमध्ये आम्ही ठराव केला, निर्णय केला, की 71 हजार कोटींचं कर्ज एका रकमेनं माफ केलं. काही त्याठिकाणी बघितलं नाही. सरसकट कर्जमाफी.

आज सरकारनं सरसकट कर्ज माफ केलं? हा उतारा द्या, तो उतारा द्या. ऑनलाईनवर द्या. रात्ररात्रभर माणसं बसली. निम्म्या अर्ध्या लोकांनासुद्धा कर्जमाफी मिळाली नाही आणि सांगतात की आम्ही कर्जमाफी केली. शेतकऱ्यांच्यासाठी काही केलेलं नाही. याच शेतकऱ्यांनी, मला आठवतंय, मी शेतीमंत्री असताना सुरूवातीला आम्ही बघितलं, अन्नधान्याची अडचण होती. अधिक किंमत द्यायचा आम्ही निकाल घेतला. या बळिराजानं परदेशातनं धान्य आणण्याची परिस्थिती बंद केली. आणि त्याचं कारण पूर्वीच्या सरकारनं उत्तम किंमत दिली, ती किंमत आज हे सरकार त्याठिकाणी देत नाही. चांगली किंमत दिली, त्याचा परिणाम काय झाला. हा देश जगातला एक नंबरचा तांदूळ निर्यात करणारा देश झाला. हे आमच्या शेतकऱ्यांनी केलं. काळ्या आईशी इमान राखणाऱ्यांनी केलं. हा देश जगातला दोन नंबरचा गहू निर्यात करणारा देश बनला. हा देश जगातला दोन नंबरचा कापूस निर्यात करणारा देश झाला. हा देश साखर निर्यातीत जगात दुसऱ्या स्थानी पोहोचला. केवळ या बळिराजाला त्याच्या घामाची किंमत दिली तर या बळिराजानी एक नवीन इतिहास निर्माण केला. आज आत्महत्यांची संख्या वाढली, शेतीमालाला किंमत नाही. कपाशीला किंमत नाहीये, कांद्याला किंमत नाहीये. ऊसाला योग्य किंमत नाहीये आणि ठिकठिकाणी आपल्याला हे चित्र बघायला मिळतंय, की बळिराजा हा अस्वस्थ झालेला आहे. ज्या देशामध्ये 70 टक्क्याच्यापेक्षा अधिक लोक शेतीच्या धंद्यामध्ये आहेत. तो जर उद्‌ध्वस्त झाला, तर देश उद्‌ध्वस्त झाल्याशिवाय राहणार नाही आणि हे पाप आज भाजपच्या राज्यामध्ये ठिकठिकाणी घडतंय.

कसलं राज्य हे चालवतायंत. ज्याचा उल्लेख याठिकाणी केला, अहो, सुप्रीम कोर्टाचे चार न्यायाधीश वर्तमानपत्राच्या प्रतिनिधींना बोलवतात आणि सांगतात, की न्यायदानामध्ये हस्तक्षेप वाढलेला आहे. न्यायसंस्था उद्‌ध्वस्त झाली. रिझर्व्ह बँक, सगळ्या हिंदुस्थानची मोठी बँक, त्याचा गव्हर्नर मोदींनी

आणला, गुजरातमधनं आणला, सहा महिन्यात त्याला राजीनामा द्यावा लागला आणि त्यानं सांगितलं, की इथं काम करणं शक्य नाही. रिझर्व्ह बँकेवर हल्ला, कोर्टावर हल्ला, सीबीआयसारख्या संस्थेवर हल्ला, ज्या महत्त्वाच्या संस्था आहेत, त्या सगळ्या संस्थांवर हल्ला. सगळ्या संस्था उद्‌ध्वस्त करायला हे सरकार निघालंय.

आश्वासनं खूप दिली. सांगितलं, धनगरांचं आरक्षण आम्ही देवू. माझ्याच गावी निवडणुकीच्या आधी एक महिना महाराष्ट्राचे मुख्यमंत्री जे आहेत, देवेंद्र फडणवीस धनगरांच्या संमेलनासाठी आले, आणि त्याठिकाणी त्यांनी शब्द दिला, की आमचं सरकार निवडून द्या, धनगरांना सगळ्या सवलती आदिवासींप्रमाणं देतो. पावणेपाच वर्षे झाली, सवलतींचा पत्ता नाही. मराठा समाजाला सांगितलं, सोळा टक्के तुम्हाला आरक्षण. आता सांगतायंत, मामला कोर्टात गेलेला आहे. आश्वासनं खूप आणि सगळी खोटी आश्वासनं. आमच्या गावाच्या शेजारच्या गावामध्ये एक असाच लबाड माणूस होता. एक दिवस त्यानं गावाला दवंडी पिटली आणि सांगितलं, की उद्याच्याला कुठल्याही घरामध्ये चूल पेटवायची नाही. मी सगळ्या गावाला लाडू-जिलेबीचं जेवण देणार. नुसतं लाडू-जिलेबीचंच नाही तर जे खरं खातात त्यांना दुसरंही देणार. फक्त सकाळी 11 वाजता ताट वाट्या घेवून यावं. संबंध गाव आलं. पंगती टाकल्या. ताटं घेवून लोकं बसली. आत्ता लाडू येईल, मग जिलेबी येईल. मग त्याठिकाणी बोकडं कापतील, त्याचं काही येईल. बारा वाजले, साडे बारा वाजले. कुठलं काय. चौकशी केली, की ज्यानी बोलवलं तो कुठांय. त्याचा पत्ताच नाही. आणि म्हणून मग आमच्याकडं एक म्हण बसली, ती म्हण अशी आहे, की लबाडाच्या घरचं आवतान जेवल्याशिवाय खरं नाही. मोदीच्या घरचं आवतान जेवल्याशिवाय खरं नाही. मोदीच्या घरचं आश्वासन पदरात पडल्याशिवाय खरं नाही. खोटी आश्वासनं देवून लोकांना भुलभुलैय्या बनवण्याचं काम आज या राज्यकर्त्यांनी केलेलं आहे.

सातत्यानं एक गोष्ट सांगितली. ना खाऊंगा ना खाने दूंगा. ज्याचा उल्लेख याठिकाणी केला राफेल. संरक्षण खात्याचं काम आम्ही लोकांनी बघितलेलं आहे. कंपनी आम्हाला माहिती आहे. पण हे कधीही पाहिलेलं नाही, की पाचशे कोटीच्या विमानाची किंमत मनमोहनसिंग प्रधानमंत्री असताना जी पक्की झाली, केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत आम्हाला सांगण्यात आलं, की 550 कोटीची किंमत मोदी साहेबांच्या राजवटीमध्ये 1600 कोटी झाली. ना खाऊंगा ना खाने दूंगा. अरे, पाचशेचे सोळाशे गेले कुठं. कुणाच्या खिशामध्ये गेले. आणि सांगतायंत, की इकडून निकाल आला. कोर्टानं असं सांगितलं. त्यांनी तिकडं असं सांगितलं. या सगळ्या गोष्टी लपवण्याच्यासंबंधीचा प्रयत्न आहे. पण मी सांगतो, की हे राफेलचं भूत या सरकारला गाडल्याशिवाय रहाणार नाही. या देशाच्या संरक्षणासाठी घेतलेली हत्यारं आणि त्याच्यामध्ये झालेला भ्रष्टाचार हा ज्या दिवशी सिद्ध होईल त्यादिवशी या सरकारला आणि या सरकारचं नेतृत्व करणाऱ्यांना या देशामध्ये थोबाडसुद्धा दाखवायची स्थिती रहाणार नाही आणि लोक त्यांना धडा शिकवल्याशिवाय रहाणार नाहीत, याची मला पूर्णपणानं खात्री आहे. आणि म्हणून अशा लोकांच्या हातामध्ये सत्ता द्यायची नाही हा निकाल घेतला पाहिजे. आणि त्यासाठी ही आजची पहिली बैठक आहे. ही पहिली सभा आहे.

संबंध महाराष्ट्राचं लक्ष आज नांदेडच्या सभेकडं होतं. संबंध महाराष्ट्राला जाणून घ्यायचं होतं, की सगळी व्यासपीठावरची मंडळी एका सुरामध्ये, एका दिलानं रहातात की नाही, बोलतात की नाही. आणि मी आमच्या सगळ्या सहकाऱ्यांच्यावतीनं नांदेडकरांनाच नव्हे तर महाराष्ट्रातल्या सर्व जनतेला आमच्या सगळ्या सहकाऱ्यांच्यावतीनं हे सांगू इच्छितो, या देशाच्या भल्याच्यासाठी, या देशाच्या ऐक्याच्यासाठी, या देशातल्या बळिराजाच्या भल्याच्यासाठी, या देशातल्या बेरोजगार तरूणांच्यासाठी, या देशातल्या आई-बहिणींच्या सन्मानासाठी आणि या देशातला दलित, शोषीत, आदिवासी, अल्पसंख्याक या सगळ्यांच्यामध्ये समानतेचं चित्र आणण्याच्यासाठी जे जे करावं लागेल ते या ठिकाणी बसलेला प्रत्येक घटक, पक्षाचा सहकारी ताकदीनं या सगळ्या घटकांच्याबरोबर राहील आणि या देशामध्ये जे परिवर्तन करायचं आहे, ते परिवर्तन केल्याशिवाय आम्ही स्वस्थ बसणार नाही, हाच विश्वास याठिकाणी देतो आणि आपल्या सगळ्यांची रजा घेतो. जयहिंद! जय महाराष्ट्र!! जय भीम!!!



मित्रहो, आजही ही सभा ऐतिहसिक होणार आहे. देशामध्ये निवडणुकीचं बिगुल वाजलेलं आहे आणि आम्ही सर्वांनी भाजप-सेना विरोधामध्ये, धर्मांध आणि जातीय शक्तींच्या विरोधामध्ये एकजुटीनं उभं ठाकण्याचा निर्धार आम्ही सर्वांनी केलेला आहे आणि म्हणून या सभेची सुरूवात आज याठिकाणी पवार साहेबांच्या उपस्थितीमध्ये जोरदारपणे मराठवाड्याचा आवाज बुलंद करून प्रतिउत्तर देण्याकरता मित्रहो आम्ही तयार झालेलो आहोत. एवढंच यानिमित्तानं तुम्हाला सांगायचंय.

देशामध्ये घडलेल्या विविध घटना, पुलवामाच्या घटनेनिमित्त आपण सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रद्धांजली अर्पण केलेली आहे. परंतु, एकीकडे आमचे सैनिक, आमचं लष्कर पाकिस्तानशी मुकाबला करतंय, आणि दुसरीकडं आज जे देशांतर्गत नवीन नवीन प्रश्न उभे ठाकलेले आहेत, त्याचाही कुठेतरी सखोल अभ्यास झाला पाहिजे. त्याच्यावरही कुठे चर्चा झाली पाहिजे, आणि आगामी येणाऱ्या काळामध्ये या देशामध्ये आणि महाराष्ट्रामध्ये सत्ताबदल झाला पाहिजे आणि म्हणून सर्वांनी एकत्र मिळून मित्रहो कामाला लागले पाहिजे. या अनुषंगानं आजही ही सभा अतिशय महत्त्वपूर्ण आहे.

मागच्या निवडणुकीच्या वेळेस भाजपचे नेतेमंडळी व्यासपीठावरून आवाज द्यायचे, अब की बार...समोरून आवाज निघायचा मोदी सरकार...मित्रहो, आज ही परिस्थिती आपण पहातोय, लोकं म्हणतात, बहुत हो गयी जुमलो की मार...आओ बदले मोदी सरकार. ही आज भूमिका आणि भावना आज सर्वसामान्य माणसाच्या मनामध्ये आहे. लोकं होरपळून निघालेली आहेत. लोकांना पाच वर्षामध्ये जीवंतपणे मरण्याची वेळ आलेली आहे अशा प्रकारची अवस्था आज सर्व थरातील लोकांच्या मनामध्ये एक निश्चितच राग आहे. निश्चितच पाच वर्षामध्ये आम्हाला फसवलं गेलेलं आहे, अशा प्रकारची भावना आहे. देशामध्ये अशा प्रकारचं भाजप-सेनेचं सरकार राहिलं, तर देशाचं भवितव्य आणि देशाबरोबर



या सामान्य माणसाचं भवितव्य मित्रहो अंधकारमय आहे. आपल्याला या अंधाराकडून प्रकाशाकडं जायचं आहे. आपण दिवे त्याठिकाणी पेटवले, याकरता की या सरकारच्या विरोधातली प्रत्येक माणसाच्या मनामध्ये असलेला प्रक्षोभ व्यक्त करणारी ही मेणबत्ती आपण याठिकाणी पेटवली. या मेणबत्तीचं मशालीमध्ये रूपांतर होईल आणि ही मशाल देशाच्या सर्व कानाकोपऱ्यामध्ये गेल्याशिवाय रहाणार नाही एवढा प्रचंड प्रक्षोभ आज सामान्य माणसाच्या मनामध्ये मित्रहो निर्माण झालेला आहे.

आपण विचाराल, की आम्ही एवढे सगळे पक्ष एकत्र कशाला आणलेले आहेत. पण मित्रहो याच्यामागची भावना आपण समजून घ्या. मागच्या निवडणुकीमध्ये भाजपला फक्त 30 टक्के मतं मिळाली. 70 टक्के मतदान भाजपच्या विरोधात होतं. पण हे सत्तर टक्के मतदान विखुरलं गेलं. काही काँग्रेसनं घेतलं, काही राष्ट्रवादी काँग्रेसनं घेतलं, काही शेकाप पक्षानी घेतलं, काही पीआपीनं घेतलं. काही आंबेडकरांनी घेतलं. सगळ्यांच्या वाटण्या झाल्या, आणि 30 टक्केवाले सत्तेवर येवून बसले. ही शोकांतिका या देशाच्या आणि महाराष्ट्राच्या मित्रहो राहिलेली आहे. त्यामुळे



# जाहिरातीसाठी सरकारी पैशाची उधळपट्टी, पण कर्जमाफीला पैसा नाही

**अशोक चव्हाण**

आम्ही सर्वांनी विचार केला, सत्ता महत्त्वाची आहे यामध्ये वादच नाही, पण सत्तेवर बसलेल्या या विद्यमान भाजप-सेना सरकारला खाली खेचलं पाहिजे आणि खाली खेचायचं असेल तर 70 टक्के लोकांनी एकत्र आलं पाहिजे मित्रहो त्याकरता ही महाआघाडी या राज्यामध्ये आणि देशामध्ये निर्माण करण्याकरिता राहुल गांधी पुढाकार घेत आहेत, पवार साहेब पुढाकार घेत आहेत आणि दोघांच्या संयुक्त प्रयत्नांतून जे जे सहकारी पक्ष देशातले आहेत, सीपीआय आहे, सीपीएम आहे, तृणमूल काँग्रेस आहे, महाराष्ट्रातले जयंत पाटील हे आमचे शेकापचे नेते आलेले आहेत. पीआरपीचे कवाडे साहेब आलेले आहेत. सगळ्या लोकांशी आम्ही बोलत आहोत. आपल्याला सर्वांना एकत्र आणायचंय. हे 70 टक्के मतदान एकगठ्ठा जर पडलं, तर भाजपचा पराभव अटळ आहे, मित्रहो.

कितीही जरी म्हणलात, भाईयो-बहनों, अरे भाईभी परेशान है और बहनभी परेशान है आणि तुम्हाला मात्र भाईयो-बहनों करत सत्तेची लालसा जी तुम्हाला लागलेली आहे, या साडेचार वर्षामध्ये लोकांनी तुमचे चुनावी जुमले पाहिले, खोटं बोलण्याची हद्द झाली. आपण लोकांना फसवण्याचं काम केलं आणि पुन्हा आता त्याच गोष्टी घेवून लोकांसमोर मागणी करायला जात आहात, की आम्हाला निवडून द्या. तुम्हाला रोजगार देवू, तुम्हाला शेती मालाला किंमत देवू, तुमचं भलं करू. एक नाही तर शंभर गोष्टी. आता तर एवढ्या मोठ्या प्रमाणावर घोषणा सुरू आहेत. घोषणांचा पाऊस सुरू झालाय. सरकारी पैशांवर घोषणांचा पाऊस सुरू झालेला आहे. टीव्हीवर, वृत्तपत्रांत जाहिरातीच जाहिराती आहेत. पैसा कुणाचा तर तुमचा पैसा. या तुमच्या पैशातून मोठ्या मोठ्या जाहीराती वृत्तपत्रांमध्ये आणि टेलिव्हिजनवर येतायंत, सरकारी पैशाची उधळपट्टी होतेय पण तुमचं मात्र कर्ज माफ होत नाही. दुर्दैव आहे मित्रहो.

आम्ही मोर्चे काढले. नागपूरमध्ये आम्ही काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस,सर्व विरोधी पक्षांनी एकत्र येवून मोर्चे काढले, लाखोंच्या संख्येने लोक एकत्र झाले, या सरकारला आम्ही सांगितलं, की महाराष्ट्रामध्ये शेतकरी मरतायंत, आत्महत्या करतायंत, कर्जमाफी झालीच पाहिजे. ही मागणी आम्ही केली. सरकारला नमतं घ्यावं लागलं, घोषणा केली. 34 हजार कोटीची कर्जमाफी 89 हजार लोकांना. प्रत्यक्षात कर्जमाफी लोकांपर्यंत पोहोचलीच नाही. कोणालाही मिळाली नाही. ग्रामीण भागामध्ये लोकांना ऑनलाईन लाईनीमध्ये उभं करून टाकलं. पैसे मिळाले नाहीत. कर्जमाफी झाली नाही आणि आपण पाहतोय सर्वत्र, आज जो थैमान माजलेला आहे, लोकं मरतायंत, जीव देतायंत, आत्महत्या करतायंत, विष प्राशन करतायंत, लहान लहान मुली त्याठिकाणी अन्नत्याग करतायंत, ही परिस्थिती आज महाराष्ट्रामधल्या सर्व भागांमध्ये शहरामध्ये सुद्धा पाहायला मिळतेय. लोकांची आता सहनशीलता संपलेली आहे.

दुष्काळ घोषीत झाला. काय मिळालं. काहीच मिळालं नाही. दुष्काळाच्या कुठल्या सवलती मिळाल्या नाहीत. पण जाहीरात मात्र मोठी. नांदेड जिल्ह्यामध्ये मोजक्या ठिकाणी दुष्काळ जाहीर होतो. बाकी ठिकाणी होत नाही. पण सगळीकडे सारखीच परिस्थिती आहे. दुष्काळाचा फायदा अद्याप कुठेही मिळालेला नाही. आणि एवढं झालं. शिवसेना भाजपला शिव्या देत होती. भाजप शिवसेनेला शिव्या देत होतं. तिकडे अमित शहा म्हणाले, उखाड देंगे. फेक देंगे. आणि त्याठिकाणी उद्धव ठाकरे म्हणतात, युती गेली चुलीत. आपण आठ दिवसांपूर्वीच ऐकलं असेल. पण आपण पाहतोय, हे युती गेली चुलीत राहिलं बाजूला, आता शिवसेनेचा स्वाभिमान गेला चुलीत. अशा प्रकारची अवस्था झालेली आहे शिवसेनेची. अभी टायगर लाचार है दोस्तो, ही अवस्था झालेली आहे. टायगर जिंदा नही, टायगर लाचार है.

शिवसेना सगळी टीका विसरली आहे. समृद्धी महामार्ग विसरून गेली आहे, नाणार प्रकल्प विसरून गेलेले आहेत. सत्तेसाठी लाचार झालेले हे दोघेही, आपण दोघं भाऊ भाऊ आणि दोघं मिळून वाटून खाऊ एवढा कार्यक्रम मात्र देशामध्ये आजवर केला, आणि पुढच्या पाच वर्षामध्ये पैशातून सत्ता आणि सत्तेतून पैसा पुढे आणण्याकरता हे समीकरण यांनी आज हाती घेतलेलं आहे. याला चोख उत्तर द्यायचं असेल तर आठवा तुम्हाला दिलेली वचनं. दरवर्षी दोन कोटी लोकांना रोजगार देण्याचं स्वप्न दाखवलं. आठवा ते दिवस. ज्यावेळी तुम्ही जावून मतदान केलं तुम्हाला नोकरी मिळेल म्हणून, पण नोकरी मिळाली नाही. तुमची थट्टा केली जाते पकोडे बेचो म्हणून. आता पकोडे विकण्यासाठी तुम्हाला सांगण्यात येत आहे. मित्रहो, पकोडे विकायचे असतील तर आमच्या गरीब मुला मुलींनी शिक्षण घेतलं कशाला हा खरा प्रश्न आहे. आणि सगळ्यात भयानक गोष्टी ही आहे, मुंबईसारख्या शहराच्या परिसरामध्ये जीवंत बॉम्ब सापडतात, बॉम्ब बनवणारे पकडले जातात, पण त्यांच्यावर कारवाई तेवढी होत नाही. सनातन संस्थेशी संबंधित असल्यामुळे त्यांच्यावर कारवाई होत नाही. पण निष्पाप शेतकऱ्याला मात्र त्याठिकाणी मुख्यमंत्र्यांच्या सभेमध्ये नुसतं बोलायला उठलं तरी त्याठिकाणी पकडलं जातं. जेलमध्ये डांबून ठेवलं जातं. पण बॉम्ब बनवणारे मात्र मोकाट फिरतायंत, मित्रहो. ही परिस्थिती आज देशातल्या सर्वच भागात पाहायला मिळतेय. कुणी वाली राहिलेला नाही.

सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधिश हताश होतात आणि म्हणतात, की आमचं कोर्टदेखील बाहेरनं रिमोटनी कंट्रोल केलं जातंय की काय अशा प्रकारची शंका व्यक्त केली जाते. ही अवस्था सर्वोच्च न्यायालयाची होते. पोलिसांच्या बाबतीतही तशीच अवस्था. ग्रामीण भागातल्या गरीब माणसाची तशीच अवस्था. नोकरदार वर्गाची तीच अवस्था. आता मात्र जुमले सुरू झालेले

आहेत. आणि मित्रहो, म्हणून या जुमल्यांच्या बाबतीमध्ये, या भुलभुलैय्यामध्ये जर आपण अडकलो तर पुढच्या पाच वर्षानंतर उद्या आपल्याला मतदानाचाही हक्क मिळणार नाही. हे लक्षात ठेवा.

नोटबंदी केली. नोटबंदीचा काय फायदा झाला. शंभरपेक्षा जास्त माणसं उन्हान लाईनमध्ये उभी राहून मरण पावली. या नोटबंदीमुळं दहशतवाद बंद झाला नाही. जाली नोटा बंद झाल्या नाहीत. या नोटबंदीचा फायदा झाला कोणाला. रिझर्व्ह बँकेच्या रिपोर्टप्रमाणे 99 टक्के पैसा जर परत आला तर काळा पैसा गेला कुठे. नीरव मोदी, विजय मल्ल्या, पळून गेले. त्यांना पकडायला कुणी नाही. आणि तुमच्या माझ्या कर्जाचा हप्ता थकला तर बँकवाले तुमच्या दारामध्ये उभे राहतायंत. कर्जाची वसुली करण्याकरता. ही शोकांतिका आज राज्याच्या प्रत्येक भागामध्ये पहायला मिळत आहे.

आणि म्हणून आज या सगळ्या कामाकरता मित्रहो आपल्याला सतर्क राहायचं आहे. देशात राफेलचा सर्वात मोठा भ्रष्टाचार झाला आहे. राहुल गांधी सातत्यानं हा विषय काढतायंत. या भ्रष्टाचाराला खतपाणी घालण्याचं काम कुणाकडून होत असेल तर विद्यमान भाजप-सेनेच्या सरकारकडून होत आहे मित्रहो. आणि म्हणून एकाच नाण्याच्या दोन बाजू हे स्पष्ट झालंय, कालची झालेली भाजप-शिवसेनेची युती ही लाचारीपोटी झालेली आहे आणि म्हणून आज देशातल्या सर्व नागरिकांना, महाराष्ट्रातल्या सर्व नागरिकांना मला विनंती करायची आहे, आता पुष्कळ झालं. आता महाराष्ट्राची सहनशीलता संपलेली आहे. एकेकाळी आपलं राज्य देशामध्ये अग्रेसर होतं. गुंतवणुकीमध्ये अग्रेसर होतं. उद्योगधंद्यामध्ये अग्रेसर होतं. नोकरीमध्ये अग्रेसर होतं. आज राज्य अधोगतीला चाललेलं आहे. राज्यामध्ये गुंतवणूक येत नाही. गुंतवणूक नाही म्हणून रोजगार नाही. स्थानिक लोकांना कुठे प्राधान्य मिळत नाही. ही अवस्था झालेली आहे.

परत जाहीरातीतल्या भुलथापांना बळी पडलो मित्रहो, तर लक्षात ठेवा, पुढील पाच वर्षानंतर काहीच शिल्लक राहाणार नाही. म्हणून हीच वेळ आहे, महाआघाडीला विजयी करण्याची ही संधी सोडू नका आणि सर्व आमच्या मित्र पक्षांसह काँग्रेस-राष्ट्रवादीला आपण जोरदार समर्थन द्या ही आग्रहाची विनंती नांदेडवासियांना मुद्दाम याठिकाणी करत आहे. नांदेडनं नेहमी काँग्रेसला साथ दिलेली आहे. नांदेडचा बालेकिल्ला शंकरराव चव्हाण साहेबांपासून तुम्ही सर्वांनी केला. त्याबद्दल मी मनापासून तुमचे आभार मानतो. आजपर्यंत तुम्ही आपला गड राखलेला आहे. आज ज्यावेळी आम्ही सर्वजण एकत्र आलेलो आहोत, तुम्हीसुद्धा एकत्र आलं पाहिजे. एकोप्याचं वातावरण आपण निर्माण करूया. त्यासाठी एक एक जागा महत्त्वाची आहे. जास्तीत जास्त जागा आपण महाआघाडीच्या निवडून आणा आणि पाहा, जी कामं यांनी केली नाहीत, काँग्रेस पक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस आणि सर्व महाआघाडी मिळून या महाराष्ट्रामध्ये चमत्कार केल्याशिवाय आम्ही राहणार नाही मित्रहो, लक्षात ठेवा तुमचे सर्व प्रश्न, तुमच्या असंख्य समस्या, रोजगाराचे प्रश्न, शेतकऱ्यांच्या समस्या, आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे राष्ट्रीय एकोपा जो आपला आहे, जातीय सलोखा जो महत्त्वाचा आहे, आपण महात्मा गांधींची जन्मशताब्दी साजरी करत आहोत. त्यामुळे ज्या महात्मा गांधींचं नाव आपण घेतो, त्या महात्मा गांधींचे आचार विचार कृतीमध्ये आणण्याचं काम आम्हा सर्वांना करायचं आहे. हे भाजपवाले आता पदयात्रा काढतायंत. महात्मा गांधींच्या विचाराला घेवून काम करत आहोत, पण हे सगळे महात्मा गांधींचे मारक आहेत, मित्रहो. महात्मा गांधींच्या विचारांचे मारक असलेली मंडळी आहेत. यांच्यावर विश्वास न ठेवता आपण सर्व एकत्र येऊया आणि या देशामध्ये, राज्यामध्ये परिवर्तन घडवूया. जयहिंद! जय महाराष्ट्र!! जय भीम!!!



# तख्त उलटानेका हुनर भी हम रखते है...

## छगन भुजबळ



पुलवामा घटना घडली. सीआरएफचे जवान बसमधून जात असताना एक आरडीएक्स भरलेली गाडी त्यांच्यावर आदळली. त्याचबरोबर जवानांना घेऊन जाणारी बस आकाशामध्ये उडाली आणि त्या बसमध्ये असलेल्या जवानांचे तुकडे तुकडे सर्वत्र पसरले. अतिशय गंभीर गोष्ट. हे झाल्याबरोबर साडेसहा वाजता प्रियांका गांधी यांची पहिलीच प्रेस कॉन्फरन्स दिल्लीमध्ये होती. त्यांनी तातडीने शहिदांना आदरांजली वाहिली आणि ती प्रेस कॉन्फरन्स रद्द केली. आणि त्याचवेळेला पावणेसहा वाजता देशाचे पंतप्रधान उत्तराखंडमध्ये भाषण करत होते. साडेसहा वाजता योगी आदित्यनाथ केरळमध्ये भाषण करत होते. आठ वाजता अमित शहा कर्नाटकमध्ये मंदिर वही बनाएंगे म्हणून सांगत होते. आमचे सीएम मातोश्रीवर वाटाघाटी करत होते. आता मला सांगा, यात समजदार कोण. 2011 मध्ये दुर्दैवाने अशीच घटना झाली आणि पाच जवानांची हत्या झाली. त्यावेळी अमित शहा म्हणाले होते की, जर मोदी पंतप्रधान झाले तर पाकिस्तानच्या घुसखोरांची सीमा ओलांडण्याची हिंमत होणार नाही. त्यावेळी सुषमा स्वराज म्हणाल्या होत्या की, पाच सैनिकांची हत्या होते, कारण आमच्याकडे एक कमजोर आणि द्विधा असलेली सरकार आहे. गिरीराजसिंह म्हणाले होते की, जर मोदी पंतप्रधान असते तर आम्ही लाहोरपर्यंत गेलो असतो. आणि नरेंद्र मोदी म्हणाले होते, भाईओ और बहनों देशकी रक्षा करनेवाला जवान सुरक्षित नहीं है. ऐसी सरकार देश को नही चाहिए ।

परवाच्या या घटनेनंतर राहुल गांधी म्हणाले की, या संकटाच्या प्रसंगी आणि सरकारसोबत आहोत. हम बटेंगे नही. हम को बटवानेकी कोशिश कर रहे है बाहर के लोग. मगर हम सरकार के साथ है. हम जवानोंके साथ है. मला सांगा कोण समजदार आहे? राहुल गांधी आणि प्रियांका गांधी यांना नासमजदार म्हणून त्यांची टिंगल करता. ते समजदार आहेत की हे समजदार आहेत. त्यावेळी त्यांना पोस्ट लावून पंतप्रधानांचा राजीनामा मागितला. लक्षात घ्या, मनमोहनसिंग यांच्या कारकिर्दीमध्ये 171 शहीद झाले. आणि यांच्या 4 वर्षाच्या काळात किती झाले.

मी असे ऐकले आहे की, एक यज्ञ यात्रा निघाली आहे. आणि देशातून एक यज्ञ करणार आहेत. जेणेकरून या देशावर कोणी हमला करणार नाही. मला त्यांना सांगायचे आहे की,



ना जिओ का डाटा चाहिए, ना पतंजली का आटा चाहिए. ना जन धन का खाता चाहिए, ना अंबानी, अदानी, टाटा चाहिए, पाकिस्तानमें इंदिराजी के समयवाला सन्नाटा चाहिए. अशा नुसत्या पूजा आणि यज्ञांनी काम होणार नाही. त्याच्यासाठी खरी 56 इंच छाती असलेली माणसं पाहिजे.

देशात काय चालले आहे. 1965 ला पाकिस्तानची कंबर मोडली लालबहादूर शास्त्रींनी. त्यावेळी त्यांनी घोषणा दिली की, जय जवान, जय किसान. जवानाचा जयजयकार झाला पाहिजे. पण, त्या जवानाच्या पाठीमागे किसानही तेवढ्या मजबुतीने उभा राहिला पाहिजे. त्याचाही जयजयकार झाला पाहिजे. पण, आज काय चालले आहे. शेतकरी आत्महत्या करत आहे. आणि जवानांच्या शरीराचे तुकडे उडत आहेत.

कायदा सुव्यवस्था राहिली नाही. अखलाखला दादरीमध्ये केवळ त्याच्या घरामध्ये बीफ आहे म्हणून त्याला घराबाहेर काढले आणि त्याच्या बायका पोरासमोर त्याचे तुकडेतुकडे केले. सुबोधकुमार नावाच्या इन्स्पेक्टरने ते मांस प्रयोगशाळेत पाठवून तपासणी केली आणि सांगितले की, ते बीफ नव्हते. अखलाख हकनाक मारला गेला. सुबोधकुमारची बदली बुलंद शहरामध्ये झाली. परत एक अफवा उठली. गोमांस, गोमांस, गोमांस. परत एकदा सगळे पोलिस चौकीवर चालून गेले. इन्स्पेक्टर सुबोधकुमार बाहेर आला आणि सांगितले की, मी चौकशी करतो. सगळं काही ठरवलेलं होते. जमावाने चौकी पेटवून दिली. सुबोधकुमार हात जोडत होता की, थांबा मी चौकशी करतो. पण, त्याला खाली पाडले. त्याला तुडवलं आणि त्याचं पिस्तूल काढून त्याला गोळ्या घातल्या. काय कायदा सुव्यवस्था चालली आहे?

या मोदी सरकारने आल्याबरोबर काय केले असेल तर सगळ्या मान्यताप्राप्त संस्था मोडीत काढल्या. सगळ्यात पहिले प्लॅनिंग कमिशन मोडीत काढले. महाराष्ट्राला किती पैसा आला आणि किती गेला, शेतकऱ्यांना किती द्यायचे, जवानांना किती द्यायचे. पण, प्लॅनिंग कमिशन खलास. सुप्रिम कोर्टाचे जजही बाहेर येऊन तक्रार करायला लागले. अशीच एक दिवस नोटबंदी झाली. त्यांनी असचं रात्री येऊन सांगितले की, भाईओ और बहनो आज रात बारा बजेके बाद पांचसो आणि हजार रुपये नोट एक कागज का तुकडा बनकर रह जाएगी. उद्या दूध आणायचे, औषधे

छगन भुजबळ यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन शंकरअण्णा धोंडगे व प्रदीप नाईक यांनी सत्कार केला. तेव्हा शेजारी अशोक चव्हाण व नसीम खान.



आणायची, शाळेची फी भरायची, पण पाचशे- हजाराची नोट मात्र कागदमात्र तुकडा. काला धन में वापस लाना चाहता हू. में आतंकवाद रोकना चाहता हूं. काय आतंकवाद रोकला. धडाधड सैनिक मरत आहेत. नोटा बदली करण्यासाठी बँकेच्या लाईनीत गेलेले 150 लोक मृत्युमुखी पडले.

या चॅनेलवाल्यांनाही विचारा की, जर अँकर मोदींच्या विरोधात बोलले की, दुसऱ्या दिवशी बाहेर. काय झालं पुण्यप्रसून वाजपेयीचं, काय झालं राजदीप सरदेसाईचं. काय झालं बरखा दत्तचं, काय झालं निखिल वागळेचं.

एक गोष्ट सांगतो. मनकी बात दरवेळेला होते. प्रधानमंत्र्यांनी मनकी बात दरवेळेला केली. समोर एक छत्तीसगडमधील एक भगिनी बसलेली होती. ते विचारतात, बहेनजी कैसे हो. बहेनजी बोलते ठीक हू. फसल अच्छी आयी. हा अच्छी आयी. पैसा अच्छा मिला. हा अच्छा मिला. कई तकलीफ नही. नही. सब ठीक है. पुण्यप्रसून वाजपेयी म्हणाले की, शेतकरी आत्महत्या करत आहेत आणि ही भगिनी म्हणते, सब ठीक है. सब ठीक है. त्यांनी चौकशी करायला पाठवले छत्तीसगडमध्ये. ती भगिनी भेटली. तिला विचारले की, बहेनजी फसल कैसी हे. अरे, काहे का फसल. अरे अपने तो बोला की, अच्छा पैसा मिला फसल का. अरे कैसा पैसा मिला भाई. अपने तो ठीक है बोला. अरे हमको तो पुलीसवाला और अफसर लेके गए और बोले की सामनेवाला पुछे गा तो बतानेका ठीक है. आणि ते सर्व परत रेकॉर्ड करून परत त्या वाजपेयींनी टीव्हीवर दाखवलं. रात्री फोन आला. दुसऱ्या दिवशी वाजपेयी बाहेर. दादागिरी सुरू आहे. यांची मुस्कटदाबी होत आहे. बाकीच्यांचे काय घेऊन बसलात.

सीबीआयचा सत्यानाश करून टाकला. अलोककुमार सरळ अधिकारी. त्यांची बदली केली गेली. कारण, राफेलची एफआयआर त्यांच्या विरोधात नोंदली जाईल. या भीतीने 56 इंचाची छाती थरारली. सुप्रिम कोर्टाने सांगितले की, त्यांना तेथेच ठेवा. दुसऱ्या दिवशी परत मीटिंग घेऊन त्यांना बाहेर काढले. हे सगळं असं चालू आहे. दादागिरी, दादागिरी. कोणी काही बोलायचे नाही.

सांगताना सांगतात की, भारत को विश्वगुरू बनाएंगे. भारताला या जगाचा विश्वगुरू बनवायचे. आणि आमचे प्रधानमंत्री आयआयटीसारख्या इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये येतात आणि समोर सगळे मोठे इंजिनिअर बसलेल आहेत आणि त्यांच्या समोर त्यांचे भाषण होत आहे, में जा रहा था, एक नाली के पास एक आदमी चाय बना रहा था. त्यांना चहा बनविण्याचा आणि चहा विकत होतो, हे सांगण्याची फार मोठी हौस आहे. मी त्यांना सांगितले की, आप चाय बेच रहे थे, तो मै भी भाजी बेचता था. मैं जहा भाजीपाला तरकारी बेचता था वह मार्केट फुटपाथ अभीभी भायखला में है. उसमें क्या. मगर तुम जिस रेल्वे स्टेशन पे जाय बेचते थे. उस समय वह रेल्वे स्टेशनही नहीं था. ओ प्रवीण तोगडिया साहब बोल रहे है की, मै तो 40 साल इसके साथ हू. इसने तो कभी भी चाय नही बेचा है. जो बेचना है वह बेचो, लेकिन देश मत बेचो मेरे भाई.


कह रहे थे की, मैं जा रहा था. एक आदमी नाले के पास चाय बना रहा था. देखा की ये आदमी नाली के पास चाय क्यू बना रहा हे. आदमी बहोत हुशार था. ओ गटर में गॅस होता है ना. उस आदमीने एक पाइप गटर के अंदर डाला था. और उसका दुसरा मुह गॅस के शेगडी को लगा दिया. ओ गटर से गॅस आता था. ओ चुल्हा जलता था. चाय बनती थी. मी तर म्हणालो, ही तर फार चांगली गोष्ट झाली. 350 रुपयांचा गॅस सिलिंडर झाला माझ्या भगिनींनो आठशे, नऊशे, हजार रुपयाचा. किती सोपी गोष्ट आहे, सिलिंडर खाली झाला की, नाली शोधायची. पाईप

त्याच्यात घालायचा. दुसरं तोंड सिलिंडरला लावायचा. घर घर नाली, घर घर गॅस. जिसकी लाठी उसकी भैंस. बने गा पकोडा, बनेगी चाय. स्कूल कॉलेज भाडमें जाय.

काय करता, अडीच वर्षे. मला कळाले नाही की, मला का पकडले. आणि ज्यानी पकडले त्यालाही कळाले नाही की, याला का पकडले. दिल्लीमध्ये महाराष्ट्र सदन बांधण्यात आले. पहिले म्हणाले, 25 हजार कोटीचा भ्रष्टाचार. नंतर म्हणाले, 10 हजार कोटीचा भ्रष्टाचार. आता म्हणता 850 कोटींचा भ्रष्टाचार. मला आठवतयं की, त्या मंत्रिमंडळाच्या उपसमितीमध्ये अशोकरावही असणार. विलासराव देशमुख मुख्यमंत्री असताना त्यांच्या अध्यक्षतेखालील कमिटीने चमनकर नावाच्या माणसाला कॉन्ट्रक्ट दिले. 100 कोटी रुपयांमध्ये महाराष्ट्र सदन बनवा. आरटीओ ऑफीस बनवा. वगैर वगैरे. मी काय कोणाची शिफारस केली नाही. कॅबीनेटने निर्णय घेतला. त्यात मी पीडब्ल्यू मंत्री म्हणून त्या इमारती चांगल्या बांधून घेतल्या. बिसलेरी प्लँट स्वतःचा. पाचशे कारागीर लागले होते. रेड स्टोनमध्ये राजवाड्यासारखे भव्य उभे केले. आणि समोर छत्रपती शिवराय तख्तावर बसले आहेत, असा मोठा पुतळा बसविण्यात आला. उजव्या बाजूला डॉ. बाबासाहेब आंबेडकर, डाव्या बाजूला महात्मा जोतिराव फुले, शाहू महाराज, यशवंतराव चव्हाण अहिल्याबाई होळकर, सावित्रीबाई फुल्यांचे पुतळे बसवलेले आहेत. अमित शहा तिकडेच मीटिंग घेतात. नरेंद्र मोदी साहेब आले, त्यांनी पाहिले, म्हणाले मुख्यमंत्र्यांना बहुत खर्चा आया होगा. म्हणाले, कुछ नही आया. अभी तक बनानेवाले को कुछ दिया ही नही. म्हणजे जे महाराष्ट्र सदन बांधले आणि ते वापरतायेत, एक रुपयाही त्यांना दिला नाही. एक फूट जमीन दिली नाही. एक एफएसआयही दिला नाही. एक रुपया दिला नाही. ते म्हणतात की, ये तो बहुत अच्छी बात है. महाराष्ट्र सदन तो बहुत सुंदर है. बनानेवाला अंदर. अरे मी त्यांना सांगितले की, 100 कोटीचे कॉन्ट्रॅक्ट आणि त्यांना रुपया दिला नाही. आणि 850 कोटीचा भ्रष्टाचार मी कसा करीन रे 100 कोटीमध्ये. पाच फुटाची जी म्हैस गाभण राहिली, आणि ती बाळंत झाली तर त्या पाच फुटाच्या म्हशीला 15 फुटांचे रेडकू होईल का. म्हटले नाही. सगळं जप्त. घर- दार सगळ जप्त. फक्त कपडे अंगावर. म्हणजे ज्या घरी राहतो ना, ते घरही कोर्टाने सांगितले हे राहूद्या ते राहतात म्हणून. ही सगळी दादागिरी. बोलायचे नाही. मला त्यांना सांगायचे आहे की, तुम्ही माझे सगळं जप्त करा. पण लोकांचे प्रेम तुम्ही जप्त करू शकत नाही. ही माझी वाचा आणि वाणी, मी गोरगरिबांसाठी बोलत राहीन. पण तुम्हाला असला कसला गर्व आला आहे. अगर गुरुर है उनको सत्ता का इस कदर, तो तख्त उलटानेका हुनर भी हम रखते है.

बेरोजगारी. वर्षाला दोन कोटी रोजगार देणार होते. 15 दिवसांपूर्वी सीएआयचा रिपोर्ट आला, दोन कोटी नोकऱ्या जाऊद्या. अहो, एका वर्षामध्ये असलेल्या एक कोटी नोकऱ्या गेल्या. कोणी सुखी नाही ओ. शेतकरी सुखी नाही. कष्टकरी सुखी नाही. बेरोजगार तरुण सुखी नाही. बस आता काय. आमचे मुंडेसाहेब सांगतात की, मुलांना सोयरीकही मिळत नाही. का तर म्हणे, त्यांना नोकऱ्या नाहीत. कसा मिळतील. तो आदित्यनाथ योगी आणि हे मोदी. योगी आणि मोदी का एकही नारा, ना घर बसा हमारा, ना बसन देंगे तुम्हारा.

काय शेतकऱ्यांचे हाल. ते डाळ घेतात. पैसे देत नाही.



भाव पडल्याने सरकारचा निषेध म्हणून शेतकऱ्यानी कांदा रस्त्यावर फेकून दिला.

पिण्याच्या पाण्यासाठी लोक टँकरच्या प्रतिक्षेत असल्याचे चित्र हल्ली महाराष्ट्रात सर्वत्र पाहायला मिळते.



कुठे म्हणतात, पैसे नाहीत. आमच्याकडे कांदा असतो. लासलगावला. मी तिकडून निवडून येतो. सगळा कांदा फेकून देतात. 800 रुपये क्विंटलचा खर्च आहे. दोनशे रुपये भाव येत आहे. तोही कधी देणार कळत नाही. 2014 ला असाच भाव काही तरी कमी झाला होता. त्यावेळी मोदीसाहेब आमच्याकडे आले होते. लासलगावला. आणि ते म्हणाले, भाईओ और बहनो, आप जो प्याज भेजते हो, ऊस प्याजको खाकर हम बडे हुए है. मित्रों, अपने जो कपास भेजतो हो, उससे हम कपडे बनाते है. और कहते है ना, जिसका नमक खाते है, उसको भुलाते नाही. किसानो को, देढ गुना पैसा मिलना चाहिए. मिलना चाहिए की नही मिलना चाहिए? मै आपसे पुछना चाहता हू, मिलना चाहिए या नही मिलना चाहिए? अरे मिलना चाहिए. पण देतो कोण रे बाबा. दे ना रे बाबा. देतो कोण. नुसतेच आपले बोलायचे काम चालले आहे.

या साध्या पीक विम्यामध्ये एवढा मोठा भ्रष्टाचार आहे ना, तो राफेलपेक्षा फार मोठा भ्रष्टाचार आहे. ते पी. साईनाथ सांगतात, हे तुम्ही जे तुम्ही विम्याचे हप्ता भरता. एक जिल्ह्यामध्ये सरासरी 173 कोटी दरवर्षाला जमा होतात. खर्च केले जातात, 43 कोटी. 130 कोटी रुपये फक्त एका जिल्ह्याचा फायदा. एका वर्षाचा 55 हजार कोटी रुपयांचा विमा कंपनीचा, अंबानी कंपनीचा फायदा झाला, असं पी. साईनाथ म्हणतात. सगळे अच्छे दिन फक्त अदानी- अंबानीला आले आहेत. बाकीच्या कुणालाही अच्छे दिन नाहीत.

काय चाललंय तुमच्या दुष्काळाचं. मराठवाडा म्हणून नको. सगळ्या महाराष्ट्रात फिरलोय. काही नाही. लोकं मागतात पाण्याचे टँकर आणि छावण्या. आणि सरकार देते डान्सबार आणि लावण्या. छत्रपती शिवाजी महाराजांचे पुतळा उभारण्याच्या कामावर बंदी आली. ज्याच्यावर बंदी होती, त्या डान्सबारवरील बंदी उठली. काय वकील. काय महाराष्ट्र सरकार. काय बघत काय?

महागाईचे काय सांगायचे. काँग्रेसच्या काळात खिशात पैसे घेऊन गेले तर पोतं भर सामान येत होतं. आता खिसाभर पैसे नेले तर पिशवीत सामान येतं. आणि जर हे सरकार परत आले तर पिशवीभर पैसे न्यावे लागतील आणि खिशात सामान आणावे लागेल. पेट्रोलचा भाव वाढतोच आहे. मोदी साहेबांच्या वयाच्या पलीकडे तो भाव गेला. लालकृष्ण अडवानींच्या वयाबरोबर तो भाव आलेला आहे. आणि हे सरकार राहिले तर ते एमडीएच मसालेवाले काका आहे ना, त्यांच्या वयाच्या पलीकडे ते जाईल. आणि एक दिवस असा येईल की, आजोबा नातवाला सांगतील की, एखादी बाटली दाखवतील आणि सांगतील, बाळा याला पेट्रोल म्हणत होतो बरं का. आणि या भाजपच्या लोकांना नाव बदलायची फार हौस आहे. त्यामुळे त्यांनी या पेट्रोलचेही नाव बदलले आहे. आता या पेट्रोलला म्हणतात, पंडित दीनदयाल उपाध्याय बहुमूल्य तरल पदार्थ.

काय सांगायचे ओ. सगळं फेल यांचं. सगळं फेल. या आमच्या दिल्लीवाल्या साहेबांची डिग्री फेल. त्यांचे घर फेल. गुजरात मॉडेल फेल. लग्न फेल. नोटबंदी फेल. मेक इन इंडिया फेल. स्टार्ट अप इंडिया फेल. डिजिटल इंडिया फेल. स्कील इंडिया फेल. स्मार्ट सिटी फेल.



जीएसटी फेल. दोन कोटी लोकांना नोकऱ्या तेही फेल. 15 लाखांचा वादा फेल. आणि आता राफेल. साडेपाचशे कोटीचे विमान साडेसोळाशे कोटीला का घेतले. हे कोणी सांगायला तयार नाही. आणि त्या विमानाचा कारखाना आमच्या नाशिकला आहे. त्याकाळी चव्हाणसाहेबांनी केला. त्यावेळी त्यांना संरक्षणमंत्री म्हणून बिनविरोध निवडून दिले म्हणून तो मिगचा कारखाना नाशिकला निघाला. तिथे ती मिग विमाने, सुखोई विमाने बनतात. त्यांना ते विमाने बनविण्याचे कॉन्ट्रॅक्ट दिलेले असताना त्यांचे ते काढून एका रात्रीत अंबानीला ते कॉन्ट्रॅक्ट दिले. साडेपाचशे कोटीचे साडेसोळाशे कोटीला का. आणि मिग कारखाना सरकारचाच. ज्या अंबानीने कधी खेळण्याचे विमान बनवले नाही. त्याला थेट राफेल बनविण्याचे कॉंट्रॅक्ट दिले.



आमचे हे शिवसेनेचे मित्र आहेत. ते त्यांच्या विरोधात एवढे बोलायचे, एवढे बोलायचे. आम्ही जेवढे बोलत नव्हतो, तेवढे ते बोलत होते. काय म्हणत होते. ठाकरे साहेब, आजवर आमची मैत्री पाहिली, मात्र वाघाचा पंजा नाही पाहिला. मग फडणवीस म्हणतात, वाघाच्या जबड्यात घालूनी हात, मोजीतो जात आमची ही जात. आता युती करणार नाही. 25 वर्षे आम्ही सडलो. शिवसेना एकाकी लढेल. भगवा महाराष्ट्रात एकहाती फडकवेल. नाहीतर नाव सांगणार नाही. युतीचे राजकारण बास झाले. य जनतेने सरकारला फसवले आहे. युती करणार नाही. राजीनामे खिशात घेऊन फिरतोय. अफजलखानाची फौज दिल्लीवरून येत आहे. तिचा आम्ही कोथळा बाहेर काढू. फडणवीस म्हणतात, शिवसेनेचे प्रेम छुपे आहे, आमचे उघड आहे. कोणी किती नाकारले तरी आम्ही करू. शिवसेना पोकळ धमक्यांना घाबरत नाही, असं संजय राऊत म्हणतात. पहारेकरी चोर आहे, असं उद्धव ठाकरे म्हणतात मोदींना. कर्जमाफी महाघोटाळा आहे, असं उद्धव ठाकरे म्हणतात या सरकारला. जर पहारेकरी चोर आहे, तर का त्या चोराच्या संगतीला बसलात. ढवळ्याशेजारी पवळ्या बांधला. वाण नाही पण गुण लागला. कशाला बसलात, एकट्याने लढणार होता ना. त्यांना बसावं लागलं, कारण त्या दोघांना खात्री झाली की, कॉंग्रेस, राष्ट्रवादी कॉंग्रेस महाआघाडी जोरावर आहे आणि ते आपटी दिल्याशिवाय राहणार नाहीत म्हणून ते एकत्र आलेत. दुसरं काही नाही.

आता मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, 250 कोटी रुपये आम्ही त्या ओबीसी महामंडळाला देणार. साडेचार वर्षे तुम्ही एक रुपया दिला नाही. ओबीसी विद्यार्थ्यांचे पैसे तुम्ही भरले नाही. ती पोरं अजून रस्तोरस्ती फिरतायेत. त्यांचे पैसे दया. फसवू नका.

2014 मध्ये कोणी मंदिर वगैरे घेऊन आले नव्हतं. विकास विकास आणि मोदी मोदी होतं. आणि आता परत मंदिर. ओ मंदिर नही. सरकार बनाना चाहते है. देश में कितने मूर्ख है ओ आजमाना चाहते है. त्या मंदिराच्या आणि मशिदीच्या लढाईत फसू नका. त्यांना दंगे घडवायचे आहे. तुमचे रक्त सांडवायचे आहे. त्यातून त्यांना परत सत्ता मिळवायची आहे. धर्माचा धंदा ते करतात. मुझे अफसोस नही की धर्म का धंदा हो रहा हे, अफसोस तो इस बात का है, की पढा लिखा भी अंधा हो रहा है. मुसलमानांनाही या देशासाठी सर्वस्व दिलेले आहे. सरफिरोशीकी तमन्ना आज हमारे दिल में है. देखना हे जोर कितना बाजू ए कातील मे है. बिसमील कादीर. सारे जहा से अच्छा हिंदोसता हमारा, हम बुलबुले है उसकी, ओ हिंदोसता हमारा. भगतसिंगपासून राजगुरुपर्यंत सगळे इन्कलाब झिंदाबाद म्हणत फासावर गेले. आपण भाषणानंतर जो जय हिंदचा नारा देतो, तो अबील सासरा यांनी दिला. लाहोर किल्ल्यावर पहिला तिरंगा शहानबाज खानांनी फडकवला. मुसलमानांचेही तेवढेच योगदान या देशात आहे. म्हणून बांधवानो तुम्हाला सांगायचे आहे की त्यांना जातीजातीत धर्माधर्मात तर लढाया लावल्याच आता देवादेवामध्येही लढाया लावायला लागलेत. ते म्हणतात की, बजरंगबली दलित था. आता हा तुम्ही कधी विचार केला होता का. दुसरा म्हणतोय, दलित नही, ओ आदिवासी दलित था. तिसरा अती हुशार. तो म्हणतोय, जैसे रेहमान, सुलेमान वैसे हनुमान. एकाने मला मॅसेज पाठवला की, दलित असलेल्या हनुमानाने ब्राम्हण असलेल्या रावणाची लंका जाळली. ती कोणासाठी तर ओपन कॅटॅगरीतील रामासाठी. माझी आपल्याला विनंती आहे की, 33 कोटी देव आहेत. कोण आदिवासी, कोण दलित करत बसले रे. हे जे दोन बसलेत ना सत्तेत त्यांनाच हे काम जमेल. त्यांना शेतकऱ्यांचे, कष्टकऱ्यांचे, बेरोजगारांचे प्रश्न समजणार नाही. यांना 33 कोटी देवांच्या जाती शोधण्यासाठी घरी पाठवा. त्यासाठी ही आघाडी आज जन्माला आला आहे. त्यासाठी आपण प्रतिज्ञा केली पाहिजे की, काही झाले तरी चालेल पण या पुढे दिल्लीत असेल किंवा मुंबईत असेल, यांचे सरकार येता कामा नाही. आज राहुल गांधी असतील, पवारसाहेब असतील, ममता, अखिलेश असतील. आता लढाई ही मोदी विरुद्ध संविधान अशी आहे. मोदी विरुद्ध लढणारे जे जे कोण असतील ते ते नक्की या आघाडीत येतील. ज्यांच्या बरोबर चर्चा आहे, ते सुद्धा येतील, माझी खात्री आहे. कारण, आपल्याला सगळ्यांना मिळून ही लढाई जिंकायची आहे.

# शिवसेना व भाजपचे भांडण ही नौटंकी...



## वाघाने शेपूट घातलं

**धनंजय मुंडे**

जम्मू काश्मीरमध्ये झालेल्या हल्ल्यात शहीद झालेल्या जवानांना आपण सर्वांनी श्रद्धांजली अर्पण केलेली आहे. कालच आपण युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती साजरी केली आहे. आपल्यातील प्रत्येकाला छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास माहिती आहे. पण जम्मू काश्मीरचा हल्ला झाल्यानंतर, देशाचे 48 सैनिक शहीद झाल्यानंतर ज्यावेळी काही दिवसांनी आपण छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती साजरी करतो, त्यावेळी आपल्याला छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास आठवल्याशिवाय राहत नाही. असाच एक भ्याड हल्ला छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात संग्रामगडावर शाहिस्ते खानानी केला आणि स्वराज्याचे मावळे मारले. पण, त्यावेळी छत्रपती शिवाजी महाराजांनी त्याबाबत खंत व्यक्त केली नाही. तर काही दिवसातच शायिस्ते खानाची बोटे तोडली, हा इतिहास आपल्याला महाराष्ट्र सांगतोय. पण आज देशात एवढी मोठी घटना घडून महाराष्ट्राचा नागरिक म्हणून एका गोष्टीचं वाईट वाटतं. की त्या 48 सैनिकांपैकी महाराष्ट्राचे दोन सैनिक. ज्या क्षणाला त्यांचा अंत्यविधी चालू होता. त्याचवेळी देशाचे पंतप्रधान या महाराष्ट्रात त्या अंत्यविधीपासून काही अंतरावर होते. त्यांच्यासोबत मुख्यमंत्रीही होते, पण साधं कुटुंबाला भेटावेही वाटलं नाही. हे दुर्दैव सबंध देश आज पाहत आहे.

अनेक दिवस, चार वर्षे सात महिने आपण टीव्हीवर केंद्र सरकारची एक जाहिरात पाहिली. ती जाहिराती मला पूर्ण आठवत नाही, पण त्या जाहिरातीचे शेवटचे दोन शब्द आठवतात. देश बदल रहा है. 11 डिसेंबरनंतर एका दिवशी पूर्ण दिवस टीव्हीवर होतो की, केंद्र सरकार ही जाहिरात दाखवतय का नाही दाखवत. मला एकदापण देश बदल रहा है जाहिरात पाहायला मिळाली नाही. कारण, 11 डिसेंबरनंतर देश खऱ्या अर्थाने बदलला होता. भाजपकडून राजस्थान गेलं होतं. छत्तीसगड गेलं होतं. मध्यप्रदेश गेलं होतं. तेलंगण गेलं होतं. मिझोराम गेलं होतं. आणि देश खऱ्या अर्थाने बदलतोय, हे चित्र आपल्या सर्वांच्या समोर आलं होते.

आज महाआघाडीच्या नांदेड येथील गुरुगोविंदसिगांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या या भूमीत ज्यावेळेस ही महाआघाडीची पहिली प्रचार सभा होत आहे, त्यावेळी आपल्यासमोर एक विश्वास व्यक्त करावासा वाटतो. येणाऱ्या काळात दिल्लीचे तख्त बदलणारच आहे. पण, महाराष्ट्राचेही तख्त 2019 च्या निवडणुकीत बदलल्याशिवाय राहणार नाही.

मला आजही 2014 ची नरेंद्र भाई मोदींची भाषणे आठवतात. एक व्यक्ती देशाच्या 125 कोटी जनतेला स्वप्न दाखवत होता. स्वप्न होतं अच्छे दिनच. आता कोणी अच्छे दिन म्हटलं तर माणूस एक तर हसतो किंवा शिवी देतो. एवढी चेष्टा

झाली आहे. तुमचं आमचं जाऊद्या. पण भाजपचे या राज्यातील एक दिग्गज नेते की जे मोदींच्या मांडीला मांडी लावून बसतात, त्यांचे नाव नितीन गडकरी. चार महिन्यांपूर्वी एका हिंदी चॅनेलला मुलाखत द्यायला गेले. वार्ताहरानी प्रश्न विचारले. नितीन गडकरींनी उत्तरे दिली. शेवटी वार्ताहराने एक प्रश्न विचारला. की नितीनजी आपण बता सकते है की, इस देश में अच्छे दिन कब आने वाले है. नितीनजींनी उत्तर दिले. म्हणाले, हे अच्छे दिन बिच्छे दिन कुछ नही होते है. उसको मेहसूस करना होता है. आज आपल्याला मेहसूस झाले का अच्छे दिन. हे आजच्या सभेच्या माध्यमातून विचारण्याची गरज वाटते.

अच्छे दिनच्या नावानी फसवले. मै मर जाऊंगा, मै मीट जाऊंगा, इस देश के हर नागरिक के खातेमें 15 लाख जमा करूंगा. आहे का येथे कोणी खातेदार की ज्याच्या खात्यात 15 लाख जमा झालेत. 15 लाख तर सोडा, 15 पैसेही नाहीत. काल परवा केंद्रीय बजेट झाले. त्यात नरेंद्र भाई मोदींनी सांगितले की, आम्ही शेतकऱ्याला वर्षाला सहा हजार रुपये देऊ. चार महिन्याला दोन हजाराच्या हिशोबानी देणार. आमची परिवर्तन यात्रा चालू होती. मी पश्चिम महाराष्ट्रात एका सभेत होतो. मला अमरावती जिल्ह्यातील परतवाडा तालुक्यातील एका शेतकऱ्याचा फोन आला. त्यांनी मला सांगितले की, भाऊ काहीही करा, पण त्या मोदीला सांगा. मी म्हणालो, अरे भाऊ पण कसे सांगू. तर म्हणाला, कसंही करा पण सांगा. तर म्हणालो, अरे बाबा सांगायचे काय. तर म्हणाला, 2014 मध्ये दिलेले 15 लाख कसे खर्च करायचे, असा प्रश्न माझ्यासमोर आहे. आणि आता हे सहा हजार रुपये देणार आहे म्हणे. मग ते कसे खर्च करू. हेच कळेना.



आता यांच्या फसव्या घोषणांना सामान्यातला सामान्य शेतकरीही भूलणार नाही. पण एवढ्यावर भाजप आणि सेनेची लोकं दम काढणार नाहीत. पुन्हा येतील. पुन्हा खोटी स्वप्न दाखवतील. पुन्हा मोदी म्हणतील, खात्यावर सहा हजार रुपये येणार आहेत. असा प्रचार करणारा कोणी तुमच्याकडे येईल. माझ्यावतीने तुम्हाला एवढंच सांगणे आहे, असा जर कोणी भाजपचा आणि सेनेचा नेता जनतेला फसवायला येईल, त्यावेळी त्याला एवढंच सांगा की, मोदी पंतप्रधान देईल त्यावेळी देईल. आमच्या खात्यावर सहा हजार रुपये येतील तेव्हा, पण तोपर्यंत तू तेवढे चार- पाच लाख रुपये उसणे दे. पुढंच पुढं बघू.


अरे त्याच काळात भाजप- शिवसेनेने मिळून महागाईच्या विरोधात एक जाहिरात काढली. जाहिरात होती, बहोत हो गई महागाई की मार, अबकी बार मोदी सरकार. ज्यावेळी या देशात पेट्रोल 50 रुपयांनी मिळत होते. त्यावेळी भाजप- शिवसेनेचे ही बांडगुळं आपल्याला महागाई फार वाढली, असं म्हणत होते. ज्यावेळी या देशात डाळ 60 रुपये किलोनी मिळत होती, त्यावेळी आपल्यासमोर बहोत हो गई मंहगाई म्हणत होते. ज्यावेळी या देशात सिलेंडरची टाकी पावणेचारशेला मिळत होती, त्यावेळेस भाजप आणि शिवसेनेने आपल्यासमोर महागाईचा डोंगर उभा केला होता. आज कसं आहे. 50 रुपयांचे पेट्रोल आज 78 रुपयांवर गेले आहे. दीड महिन्यांपूर्वी 94 रुपयांवर गेले होते. मी साधा, सरळ हिशोब सांगतो. जर एखादा व्यक्ती जर त्यांच्याकडे मोटारसायकल आहे आणि त्याच्यामध्ये जर तो रोज 2014 च्या हिशोबाने एक लिटर पेट्रोल टाकत असेल आणि आजच्या हिशोबाने पेट्रोलचा भाव 80 रुपये असेल, तर मोदी साहेबांनी आपली प्रतिदिवशी 30 रुपये लूट केली आहे. चार वर्षे सात महिन्यांचा हिशोब काढा. एवढी मोठी फसवणूक या देशातील जनतेची केली आहे. म्हणून आज या महाआघाडीची सभा यासाठी आहे.

बघा योगायोग कसा आहे. इतिहास सांगतो की, कुठल्याही लढाईची सुरवात चांगली आणि लवकर झाली की, विजयावर शिक्कामोर्तब असतो. एकीकडे त्यांच्या युतीची चर्चा झाली आणि इकडं महाआघाडीची पहिली प्रचारसभा या ठिकाणी नांदेडला सुरू झाली. याचा अर्थ आता नियतीसुद्धा आपल्या पाठीशी आहे. सुरवात आपली चांगली झाली. सुरवात आपली लवकर झाली. विजय सुद्धा आपला निश्चित होणार आहे. त्यामुळे आता विजयाच्या काळजीत जायचे कारण नाही. मजेशीर गोष्ट झाली, ज्या दिवशी अमित शहा मातोश्रीवर गेले, संबंध देशाचे लक्ष लागून होते. तसं आमचेही लक्ष लागून होते. एका संपादकाशी मी संपर्कात होतो. दहा दहा मिनिटांनी विचारात होते, काय होतय. संपादक त्याच्या वार्ताहराला विचारत होता. आणि वार्ताहर सांगत होता आणखी काही नाही. शेवटी संपादकांनी वार्ताहराला विचारले, अरे काय झालं. तो म्हणाला, काही नाही, वाघाने शेपूट घातले. हिंदुहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांची ही शिवसेना पुन्हा लाचार झाली. आणि हे भाजप आणि शिवसेनेचे हें भांडण जे नौटंकी होती, ती महाराष्ट्राच्या जनतेच्या समोर आली. हे गेली चार वर्षे काँग्रेस- राष्ट्रवादी काँग्रेस व सर्व विरोधी पक्ष सांगत होता.

म्हणून आजच्या या प्रचारसभेच्या निमित्ताने आज नांदेडसारख्या या पुण्यनगरीमध्ये प्रचाराची सुरवात होत आहे. महाआघाडीचे सर्व नेते या ठिकाणी आहेत. अपेक्षा एवढीच आहे की, या महाआघाडीला आपण महाआशीर्वाद द्या आणि येणाऱ्या निवडणुकीत यश द्यावे, हीच कळकळीची विनंती.

# देशाला लागलेले आरएसएसप्रणीत भाजपचे ग्रहण हटवा

## जोगेंद्र कवाडे



सभेच्या सुरवातीला आम्ही मेणबत्त्या प्रज्वलित केल्या आणि जळत्या अंतःकरणांनी शहिदांना श्रद्धांजली अर्पण केली. आमचा एक कवी म्हणतो, बस्तीया रह जाती है. तुफान चले जाते है. याद रह जाती है. इन्सान चले जाते है. प्यार कम नही होता किसी के जाने से. पण दर्द जरूर होता है हमारे शहीदोंकी याद आणेसे. आपण आपली श्रद्धांजली या बहादूर शहिदांना श्रद्धांजली अर्पण केली. पण ज्यांच्यामुळे हा प्रसंग आमच्यावर ओढवला, ज्यांच्या नाकर्तेपणामुळे हे सरकार एवढं नालायक निघालं. एवढं कमकुवत निघालं की आमच्या सैनिकांचे प्राण ते वाचवू शकले नाहीत. सर्जिकल स्ट्राईक केला मागे. पण त्यानंतरही आतंकवादाला हे मोदी सरकार थांबवू शकले नाही. 2019 ला मतदारांनो तुम्हाला सर्जिकल स्ट्राईक करून मोदीच्या या सरकारला मातीमध्ये दफन करायचे आहे. यासाठी ही महाआघाडी झाली आहे. आम्ही सगळे एक झालो आहोत. कोणा मोठा आणि कोण छोटा हे विसरून एकत्र झालो आहोत की, या देशाचे भाग्य आणि भविष्य बदलविण्यासाठी. ज्या मोदीसाहेबांनी या देशामध्ये संकटे निर्माण केली. नोटबंदी असेल, शेतकऱ्यांची कर्जमाफीतून फसवणूक असेल. हे सगळं झालं, पण आज हा देश संकटात आहे. या देशाला आरएसएसप्रणीत भाजपचे ग्रहण लागले आहे. सूर्याला- चंद्राला लागलेले ग्रहण दोन- चार तासात सुटून जातं पण या देशाच्या संविधानाला, या देशाच्या समानतेला, या देशाच्या बंधुत्वाला, या देशाच्या लोकशाहीला, या देशाच्या सहिष्णुतेला या जातीयवादी सांप्रदायिक भाजपचे ग्रहण लागले आहे. ते उद्याच्या 2019 च्या निवडणुकीत दूर करण्याची जबाबदारी आपल्यावर आहे, हे सांगण्यासाठी आम्ही या ठिकाणी आलो आहे. सूर्याला-चंद्राला ग्रहण लागल्यानंतर आमचे गरीब लोक फिरतात, दे दान फिटे गिऱ्हाण म्हणत. उद्याच्या 2019 च्या निवडणुकीत द्या तुमचे मताचे दान आणि सुटुदे भाजपचे गिऱ्हाण. हे सांगण्यासाठी आमची ही आघाडी या ठिकाणी आली आहे.

मित्रांनो, या देशात किती फसवणूक सुरू आहे. आमच्या राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आहेत. राज्यातील लोकांनी त्यांचे नावच बदलवून टाकले. फसवणीस. फडणवीस नाही फसवणीस. शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करू म्हणाले ना. सत्तेवर येण्यापूर्वी. शेतकऱ्यांची सरसकट कर्जमाफी करू. स्वामिनाथन आयोग लागू करू. ही सगळी आश्वासने दिली. मोदीच्या सरकारनी, भाजपच्या सरकारनी, आरएसएसच्या सरकारनी. पवारसाहेबांसह आम्ही महाराष्ट्र पिंजून काढला. शेतकऱ्यांचे दुःख जगाला सांगण्यासाठी चांद्यापासून बांद्यापर्यंत गेलो. या आंधळं, बहिरं, मुकं सरकारच्या कानी कपाळी ओरडून सांगितले की, शेतकरी आत्महत्या करत आहे. त्यांना वाचवा. तुम्ही सांगितले होते की, आमचे सरकार आले की, कर्जमाफी करून टाकू. तुम्ही सांगितले होते की, आमचे सरकार आले की, सातबारा कोरा करून टाकू. शेतकऱ्यांची कर्जमाफी करून टाकू. स्वामिनाथन आयोग लागू करू. साडेचार वर्षे झाली, काहीच केले नाही. हे आपल्याला थांबवायचे आहे की नाही. हा जाती आणि धर्माचा उन्माद या देशामध्ये निर्माण केला जातो. मंदिर- मशिदीच्या नावाखाली या देशात फूट पाडण्याचा प्रयत्न केला जातो. ज्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संविधानाने देशातील 130 कोटी लोकांना ताठ मानेने जगण्याचा अधिकार दिला. राज्य घटना म्हणजे या देशाचे सत्व आहे. ते बाबासाहेबांनी दिले. समतेचे, बंधुत्वाचे, माणुसकीचे आणि न्यायाचे स्वप्न पूर्ण झाले पाहिजे. पण या देशाचे उलट्या काळजाचे सरकार बाबासाहेबांचे



राष्ट्रवादी स्वाभिमानी आचार! राष्ट्रवादी विचार !!

संविधान बदलून पुन्हा या देशाला ब्राम्हणशाहीच्या गुलामगिरीमध्ये मनुवादाच्या गुलामगिरीमध्ये अडकविण्याचा प्रयत्न करत आहे. मोदीचे सरकार, भाजपचे सरकार हे आरएसएसच्या रिमोट कंट्रोलवर चालत आहे. मोदीच्या भाजपचे सरकार चड्डीवाल्या आरएसएसच्या रिमोट कंट्रोलमध्ये आहे. चड्डीची आठवण झाली की मला तो मोगली आठवतो. चड्डी पहन के फूल खिला है. फूल खिला है. जंगल जंगल बात चली है. पता चला है. चड्डी पहन के फूल खिला है. फूल खिला है. हे कसलं फूल उगवलंय इथ. देशामध्ये विषमतेची, जातीयवादाची, सांप्रदायिकतेची दुर्गंधी पसरविण्याचे काम आरएसएसच्या माध्यमातून मोदी सरकार करत आहे.

आपण सर्व एकत्र आलो. राहुलजींच्या, सोनियांजींच्या, पवारसाहेबांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्राचीच नाहीतर संपूर्ण देशाची तकदीर बदलवायची आहे. आपल्याला सर्वांना मिळून या देशाचे भाग्य बदलवायचे आहे.

महाराष्ट्रात लोकसभेच्या 48 जागा आहेत. आता हे महाआघाडीचे वादळ निर्माण झाले. धर्मनिरपेक्ष महाआघाडीचे वादळ निर्माण झाले. नांदेडपासून निघेल आणि दिल्लीच्या लाल किल्ल्यापर्यंत जाईल. आणि या भाजपच्या सरकारचा पालापाचोळा करून टाकीन. एवढी ताकद आमच्या या महाआघाडीत आहे. तुमच्या एकजुटीची साथ पाहिजे. माझी विनंती आहे. घाबरण्याचे काम नाही. माझ्या मोबाईलवर एक पोस्ट आली की, एकाने कोंबड्याला विचारले की, कल तो तुमको ओ काट देंगे, कोंबडं काय उत्तर देतं, हम जबजब जगानेकी कोशिश करते है, तो हमे काट ही डाला जाता आहे. हम जगाने की कोशिश कर रहै हे. देश के कोनेकोने में बैठे लोगो को हम जगाने की कोशिश कर रहे हे. आप जागो गे तो देश जगेगा, देश बचेगा. देशकी अखंडता मजबूत बनानी है की नहीं? का यांच्या सांप्रदायी विचारांवर जाऊन आपल्या काय देशाच तुकडे करायचे आहेत. हा कोणाच्या बापाचा देश नाही. हा देश तुमचा आमचा आहे. हा देश शाहू, फुले, आंबेडकर, शिवाजी महाराजांचा देश आहे. या देशाची कोणी वाटणी करत असेल तर त्यांना ही आमची महाआघाडी या मातीत दफन करीन.

मित्रांनो, कश्ती डुबती है डूब जाने दो
ओ फिर तुफानोसे उभरती है
शमा बुझती है तो बुझने दो
ओ फिर अंधेरोमे जल सकती है.
मायूस ना हो. इरादा ना बदल
देश की तक्तीर 2019 मध्ये बदल सकती है.

आपल्या सर्वांची एकजूट अशीच कायम ठेवा. त्याचा मुकाबला आपल्याला करायचा आहे. 2019 च्या निवडणुकीत चमत्कार दाखवा. तुम्ही दाखविलेल्या चमत्काराला आम्ही नमस्कार करायला येऊ. या आरएसएसच्या भाजप सरकारला मातीत गाडून टाका.

**महाआघाडीत सहभागी झालेल्या सर्व पक्षांच्या नेत्यांनी एकजुटीने निवडणूक लढविण्याचा निर्धार हात वर करून व्यक्त केला. त्यावेळी प्रमुख नेत्यंमध्ये शरद पवार, अशोक चव्हाण, जोगेंद्र कवाडे, छगन भुजबळ, फौजिया खान, माणिकराव ठाकरे व इतर मान्यवर.**





# महाआघाडी भक्कम राहणार

**भाई जयंत पाटील**

मी कालपासून फार आनंदी वातावरणात आहे. कारण युती झाली ते चांगले झाले. कारण, मागच्या वेळी आपण वेगवगळे लढलो. त्यामुळे आपला पराभव झाला. परंतु आता युती झाली, त्यामुळे आता त्यांना चांगल्याप्रकारे आपटण्याचे काम आपल्याला करायचे आहे. युतीची पत्रकार परिषद मी टीव्हीवर बघत होतो. सगळे दडपणाखाली होते. माननीय उद्धवराव ठाकऱ्यांचाही चेहरा एकदम पडलेला होता. कारण, त्यांना मनामध्ये काहीतरी खात होतं की आपण सहा महिन्यांपूर्वी काय बोलत होतो. आणि आज आपण काय बोलत आहोत. मला वाटतं आपल्याला प्रचार करायची गरज नाहीये. उद्धव ठाकरेंनी केलेले आरोप आणि त्यांच्यावर केलेले सर्व अटॅक यांचीच एक चित्रफीत काढली आणि ती दाखवली तर आपला चांगला प्रचार होईल. पहले मंदिर बाद मे सरकार, पहिले शेतकऱ्यांचे कर्ज माफ करा, तरच आम्ही बोलू, आम्हीच या राज्यामध्ये मोठे भाऊ दुसऱ्या कोणाला आम्ही मोठे होऊ देणार नाही, तरच युती. पण, ते कधी छोटे झाले, ते कळालेच नाही. मला वाटतं महाआघाडी भक्कम आहे. महाआघाडी भक्कम राहणार आहे. आमच्या वतीने आम्ही शरद पवारसाहेबांना अधिकार दिला आहे. आम्हाला काही नको, यांना घालवा, यांचा शेवट करा तरच महाराष्ट्रातला शेतकरी समाधानी होईल, ही आमची भूमिका आहे.

म्हणून उद्याच्या निवडणुकीत वेगळे आकडे गेले पाहिजे. उलटी गणती त्यांना करायला लावली पाहिजे. पवारसाहेबांनी एक मार्मिक प्रतिक्रिया दिलेली आहे. 45 का 48 का नाही. म्हणजे प्रचार कुठला करायचा आहे, हे आपल्याला बघायचे आहे. नांदेडवासीयांना आणि सर्वांना सांगतो की, महाराष्ट्रात सर्वाधिक खासदार हे महाआघाडीचेच असतील. सर्व छोटे पक्ष तुमच्या पाठिशी आहोत. पण नांदेडवासियांना माझी विनंती आहे की, गेल्या निवडणुकीत तुम्ही दोन जागा दिल्यात. महाआघाडीचा जो पहिला विजय होईल तो पहिला नारळ या नांदेडमध्ये फुटेल. तो सर्वाधिक मतांनी या महाराष्ट्रातून निवडून येईल.

महाआघाडीच्या प्रचाराची सुरवात मराठवाड्यातील नांदेडमधून होत आहे. नांदेड जिल्ह्याचा इतिहास आहे की, ज्या ज्या निवडणुकीच्या प्रचाराची सुरवात नांदेडमधून झाली, त्यानंतर निवडणुकीचा निकाल लागतोय, तेव्हा आघाडी आणि महाआघाडीची सत्ता आली आहे. त्यामुळे येणाऱ्या काळात राज्य आणि देशाचे चित्र बदलल्याशिवाय राहणार नाही. असा विश्वास मी व्यक्त करतो.

अशोक चव्हाणसाहेबांनी सांगितले की, महाआघाडीची गरज का वाटली. मतांचे विभाजन 2014 मध्ये झाले. मग ते युपी असो, बिहार असो, मध्यप्रदेश असो. राजस्थान असो. महाराष्ट्रात असो. वेगवेगळ्या राज्यात वेगवेगळ्या पक्षांचे लोकं उभे राहिले आणि मतांचे विभाजन झाले. आणि भाजप व शिवसेनेला या देशामध्ये व राज्यामध्ये सत्ता मिळाली.

धनंजय मुंडेंनी सांगितले की, किती आश्वासने दिली होती. महागाई, बेरोजगारी, शेतकऱ्यांची कर्जमाफी सबका साथ सबका विकास, सीमा सुरक्षा, 56 इंचांची छाती. अशी अनेक प्रकाराची आश्वासने दिली. प्रत्येक समाजाला मराठा, मुस्लीम, धनगर समाजाला आरक्षण देण्याचे आश्वासन दिले. यवतमाळमध्ये परवा पंतप्रधान जाऊन आले, तिथे 2014 मध्ये शेतकऱ्यांना कर्जमाफी, शेतमालाला हमीभाव देण्याचे आश्वासन दिले होते. आता विचार करायाची वेळ आलेली आहे की, गेल्या पाच वर्षामध्ये या देशामध्ये राहणाऱ्या गोरगरीबांना, शेतकऱ्यांना, युवकांना, शहरी भागात राहणाऱ्या लोकांना, मध्यमवर्गीयांना, व्यापाऱ्यांना या पाच वर्षात काय मिळालेले आहे. हा आता विचार करण्याची वेळ आलेली आहे.

मित्रांनो, पुलवामामध्ये चार- पाच दिवसांपूर्वी जे घडलं, दुर्दैव आहे. रोज आपले चार- पाच जवान शहीद होत आहेत. 2014 पूर्वी काश्मीरमध्ये जी घटना घडली होती, त्यावेळी आपले सरकार होते, डॉ. मनमोहनसिंग पंतप्रधान होते. पवारसाहेब मंत्री होते. त्यावेळी आताच्या मंत्री असणाऱ्या स्मृती इराणी यांनी सांगितले होते की, मला आता असं वाटतं की, हातातील बांगड्या काढून पंतप्रधानांना पाठवाव्यात. आता मला वाटते की, आता पुलवामामध्ये आपले 44 जवान शहीद झाले. आता याच्यामध्ये कोणीतरी जबाबदारी स्वीकारली पाहिजे की नाही, या देशामध्ये. स्मृती इराणी तुम्ही तुमच्या बांगड्या पाठविणार की नाही, मोदीसाहेबांना. ही चर्चा आता झाली पाहिजे. कोण आहे जबाबदार. का फक्त पाकिस्तान, पाकिस्तान. या देशाचे 130 कोटी नागरिक आहेत. त्यात हिंदू, मुस्लीम, शीख, इसाई आहेत. या देशातून इंग्रजांना हकलविण्याचे काम झालेले आहे. पाकिस्ताननी सावध राहिले पाहिजे. कारण, हे 130 कोटी लोकं जर सीमेवर गेलेना, तर तुमचे नकाशावरून नाव निघून जाईल.

मला राहुल गांधींना, पवारसाहेबांना आणि देशातील












जेवढे विरोधी पक्षाचे नेते आहेत, त्यांना मला धन्यवाद द्यायचे आहे. की जेव्हा पुलवामाची घटना घडली, त्यावेळी सरकारने सर्व नेत्यांची बैठक घेतली. त्यावेळी सर्व नेत्यांनी सांगितले की, तुमचे सरकार जे काही निर्णय घेईल, त्या मुद्द्यावर आम्ही तुमच्या सोबत असेन. आम्हाला याच्यावर राजकारण करायचे नाही. मोदीची आपण फिरतायेत. त्या दिवसापासून आपण आपला एकही कार्यक्रम रद्द केला नाही. आमचे एवढे जवान सीमेवर शहीद झाले. त्यांच्या चितेची आगही थंड झाली नाही आणि आपण उदघाटन करतायेत. धनंजय मुंडेंनी सांगितले की, ज्यावेळी पंतप्रधान आणि मुख्यमंत्री यवतमाळ आणि धुळ्यामध्ये सभा घेत होते, त्याच्या बाजूच्या जिल्ह्यातील सैनिक शहीद झाला होता. त्याच्या घरीसुद्धा जाऊन आले नाही. त्यांना दिलासाही द्यावासा वाटला नाही. हे फक्त भाषण देतात. पण आता या खोट्या आश्वासनांची भाषणे या देशात चालणार नाहीत. म्हणून हे सगळे नेते एकत्र आलेले आहेत. आणि त्यांना सत्तेतून बाहेर काढण्याचे काम करणार आहे. म्हणून पवारसाहेब, राहुल गांधीसाहेब आणि जेवढे केंद्राचे नेते आहेत, सगळे एकजूट झालेली आहे.

महागाईवर फार चर्चा झाली. याच महागाईवर 2014 मध्ये किती चर्चा व्हायची. भाजपने किती मोठे मोठे बॅनर- होर्डिंग लावले. टीव्हीवर किती जाहिराती यायच्या. बहुत हुआ मंहगाई की मार, अबकी बार मोदी सरकार. 350 रुपये गॅस सिलिंडर होतं. महागाई कमी होती. गॅस सिलिंडर, पेट्रोलचे भाव कमी होते. नोटबंदी नव्हती. जीएसटी नव्हती. सगळे व्यवस्थीत चालले होते. पण गेल्या पाच वर्षात या सरकारने देशाचे वाटोळे करण्याचे काम चुकीच्या निर्णयामुळे केलेले आहे. आता लोक म्हणतायेत, बहोत हुई महंगाई की मार, भाग जाओ मोदी सरकार. हे मोदी सरकार नको, या मोदी सरकारला काढले पाहिजे.

या देशाला जर वाचवायचे असेल, या देशाच्या सुरक्षेसाठी सीमेच्या रक्षणासाठी, एकतेसाठी, संविधानाच्या रक्षणासाठी महाआघाडीला निवडून आणण्याची गरज आहे. म्हणून आपण ठामपणे कामाला लागले पाहिजे. आणि घोषणा दिली पाहिजे की, तख्त बदलो तख्त बदलदो, बेईमानों का तख्त बदलदो, हा नारा घेऊन आपण सर्वांना इथून गेले पाहिजे. आज आपल्या अनेक नेत्यांना या देशाची सुरक्षा करायची आहे. त्यांना देश वाचविण्याची चिंता आहे. ते सगळे एकत्र येत आहेत. या देशामध्ये काही नेते मतांचे विभाजन करण्याचे राजकारण करत आहेत. विशेषतः मुस्लीम समाजाचे, अल्पसंख्यांक समाजाच्या मतांचे विभाजन करण्याचे राजकारण करत आहेत. अशा लोकांनाही येणाऱ्या काळात धडा शिकविण्याचे काम मुस्लीम, दलित आणि सर्व समाजाच्या लोकांनी करायचे आहे. या निवडणुकीची वेळ पाहून मतांचे विभाजन करणारी जी मंडळी आहेत, त्यांनाही धडा शिकविण्याची गरज आहे. 2019 च्या निवडणुका आता सुरू होत आहेत. शिवसेनेची काय भूमिका आहे, होती. भाजपचे नेते शिवसेनेला काय म्हणायचे. शिवसेनेचे नेते उद्धव ठाकरे काय म्हणायचे, हे आपण सगळ्यांनी बघितलेले आहे. आपण सगळे ऐकलेले आहे. सामनाचे संपादकीय आपण वाचलेले आहे. अशा लोकांचे काय करायचे, हे आपल्याला ठरवायचे आहे. सत्तेसाठी युती आहे. राज्यासाठी युती नाही ही. शिवसेना आणि भाजपची जी युती झाली, ही फक्त सत्तेसाठी युती आहे. येणाऱ्या काळात या लोकांना सत्तेतून काढण्याचे काम आपल्याला करायचे आहे. या नांदेडच्या भूमीतून आपल्याला राज्याला आणि देशाला एक संदेश द्यायचा आहे की, हे सर्व नेते महाआघाडी बनवून देशाला वाचवायला निघालेले आहेत, या सर्वांना आमचा पाठिंबा आहे. असा संदेश देण्याचे काम आपण करूयात.

# महाआघाडीचे सरकार सत्तेवर येणारच

## बसवराज पाटील यांची ग्वाही




ही सभा खऱ्या अर्थाने परिवर्तनाची सभा आहे. आज ही सभा नांदेडमध्ये होत आहे. आपल्याला माहित आहे की, गुरु गोविंदसिंग आणि आदरणीय शंकरराव चव्हाण साहेबांची ही भूमी आहे. याच्यामध्ये एक मोठी ताकद आहे. एक मोठी शक्ती आहे. आणि ज्या ज्या वेळेला देशावरती संकटे आली आणि ज्या ज्या वेळेला राज्यावर संकटे आली, त्या त्या वेळेला या नगरीतून मोठ्या प्रमाणावर लोकं देशासाठी, राज्यासाठी संघर्ष करण्याचे काम सातत्याने केल्याचा इतिहास या नांदेडमध्ये संतांच्या भूमीमध्ये आहे. म्हणून ही सभा खऱ्या अर्थाने ऐतिहासिक सभा आहे.

आज आपण पाहतोय की, या देशामध्ये, या राज्यामध्ये एक वेगळ्या विचारांचे सरकार आहे. या सरकारला लोकांचे काही घेणंदेणं नाही. शेतकऱ्यांविषयी काही घेणंदेणं नाही. वंचित वर्गाविषयी काही घेणंदेणं नाही. फक्त धर्माधर्मात आपल्याला भांडणं कशी लावता येतील. जातीजातीत आपल्याला भांडणं कशी लावता येतील. लोकांची दिशाभूल कशी आपल्याला करता येईल. आणि लोकांमध्ये भांडणे कशी लावता येतील, हेच आपण पाच वर्षामध्ये अनुभवतोय. आज आपल्यावर ही फार मोठी वेळ आहे. हे सरकार आपल्या देशासाठी फार घातक आहे. लोकशाहीला घातक आहे. आपण मंडळींनी या गोष्टीचा प्रामुख्याने विचार करण्याची वेळ या राज्यावर देशावर आलेली आहे.

आज राहुल गांधी आणि या नेतेमंडळींच्या नेतृत्वाखाली देशात एक आगळेवगळे वातावरण आहे. सर्वधर्मसमभाव हा विचार या देशाला वाढवेल, जोपासेल, एकात्मता टिकवेल. आणि या देशाला पुढे जाण्याचा विचार गेल्या 50 वर्षामध्ये ज्या काँग्रेसच्या सरकारने केला. ज्या आघाडीच्या सरकारने केला. त्यांचे दिवस आपण पाहिलेले आहेत. म्हणून आज आपली वेळ आहे, आणि विशेष करून आपण ज्याज्या वेळेला नांदेडमध्ये आलो, त्यात्यावेळेला अशोकराव चव्हाण साहेब यांनी आवाहन केले, मग ती लोकसभेची निवडणूक असेल, विधानसभेची असेल, नगरपालिकेची असेल, त्या त्या वेळेला मोठी शक्ती आपण काँग्रेस पक्षाच्या पाठीमागे उभी केली. अशोकराव चव्हाण यांच्या पाठिशी उभी केली. शंकरराव चव्हाण यांच्या पाठिशी केली, नांदेडचा नावलौकीक या देशामध्ये केला. हा इतिहास आहे. हा इतिहास पुन्हा निर्माण करण्याची वेळ आलेली आहे. म्हणून आमची एवढीच विनंती आहे. आज नांदेडकरांवर संपूर्ण राज्याची देशाची जबाबदारी आहे. आज या नांदेडची सर्व जनता, मराठवाड्याची सर्व जनता अशोकराव चव्हाण समजून, महाआघाडीचा सैनिक समजून आपण या चळवळीत भाग घेऊया. आणि केंद्रामध्ये आणि राज्यामध्ये आपल्या महाआघाडीचे सरकार आणल्याशिवाय स्वस्थ बसू नये. अशी विनंती करतो. उद्याचा दिवस आपला आहे. उद्याचे विजय आपले आहेत. खऱ्या अर्थाने लोकशाहीचा विजय आहे. पुरोगामी विचारांचा विजय आहे. सर्वधर्मसमभावाचा विजय आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने १० जानेवारी २०१९ पासून राज्यभर सुरू करण्यात आलेल्या निर्धार परिवर्तन यात्रेचा समारोप २३ फेब्रुवारी २०१९ रोजी परळी (जि. बीड) येथील जाहीर सभेने झाला. त्याप्रसंगी पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांनी केलेले मार्गदर्शन...



## निर्धार परिवर्तन संपर्क यात्रा समारोप भाषण...



# भाजपाला धडा शिकविण्याची वेळ

### शरद पवार

यापूर्वी अनेकदा मी आपल्या जिल्ह्यामध्ये आलो. अनेक मोठ्या सभाही याठिकाणी पाहिल्या. पण धनंजय मुंडेंच्या नेतृत्वाखालची आजची सभा माझ्या 50 वर्षांच्या सार्वजनिक जीवनामध्ये एवढी मोठी कधी पहायला मिळाली नाही. सभेची हजेरी हा महत्त्वाचा भाग असतो. पण बोलणारे सहकारी जी भूमिका मांडतात, त्या भुमिकेच्या पाठीमागं मजबुतीनं उभं राहणं, तो विचार समजणारा आणि त्या विचाराला साथ देणारा श्रोतावर्ग हा सरसकट सगळीकडं बघायला मिळत नाही. मला आनंद आहे, की आज तो याठिकाणी बघायला मिळाला. आणि म्हणून धनंजय मुंडेंचं अभिनंदन तसंच तुमचं सगळ्यांचंही अभिनंदन.

अनेक प्रश्न याठिकाणी मांडले गेले. गेल्या साडेचार वर्षाची देशाची सत्ता भलत्याच लोकांच्या हातामध्ये गेली. अनेक गोष्टींची पूर्तता करण्याचा विचार दिला आणि त्या विचारांवर विश्वास ठेवून संस्था आहेत, त्या सगळ्या संस्थांच्यावर एकप्रकारचे हल्ले होतायंत. आणि म्हणून दिलेला शब्द कोणता पाळला. या तालुक्यामध्ये, या जिल्ह्यामध्ये, या राज्यामध्ये कष्ट करणारा धनगर समाज, त्या धनगर समाजाला आदिवासीचा दर्जा देवू. आमच्या हातामध्ये सत्ता द्या. सत्ता आल्याच्यानंतर मंत्रिमंडळाच्या पहिल्या बैठकीमध्ये हा निकाल मी घेईन हे देवेंद्र फडणवीसांनी बारामतीला जावून सांगितलं. आता मंत्रिमंडळाच्या शेवटच्या बैठकीची वेळ आली. अजूनही त्यासंबंधीचा निकाल नाही. आज, उद्या तुम्हाला वाचायला मिळेल, काहीतरी ठराव केला जाईल. विधानसभेत मांडला जाईल. दिल्लीला पाठवला जाईल आणि सांगितलं जाईल, की धनगर बांधवांनो तुमच्या हिताचा प्रश्न आम्ही सोडवलेला आहे. त्यांची फसवणूक.

मराठा समाजाला 16 टक्के आरक्षणाची गोष्ट केली.

तलवार वर करून जनसमुदायाला विजयाची ग्वाही देताना शरद पवार व अशोक चव्हाण, शेजारी धनंजय मुंडे, जयंत पाटील, जोगेंद्र कवाडे, रामराव वडकुते, गणेश दुधगावकर, डॉ. नरेंद्र काळे, प्रशांत जगताप, प्रकाश गजभिये व इतर मान्यवर



लोकांनी आपला मतांचा शिक्का दिला. अनेक कार्यक्रम दिले. पण या देशाच्या कानाकोपऱ्यात कुठेही गेल्याच्यानंतर लोक सांगतात, की शंभर टक्के आमची फसवणूक झाली. नोटाबंदी केली. काळा पैसा जाईल सांगितलं. नाही गेला. कर्जमाफी केली म्हणून सांगितलं. सगळं फिटलं म्हणून सांगितलं. त्याच्यातून शेतकऱ्याची सुटका नाही. दोन कोटी तरूणांना बेरोजगारीतून बाहेर काढून नोकरीचा रस्ता दिला जाईल हा शब्द दिला. आज ठिकठिकाणी तरूण मुलं नोकरीच्यासाठी हेलपाटे घालतायंत. अर्ज करतायंत. पण त्यांच्या पदरामध्ये कष्ट करण्याचासुद्धा अधिकार त्यांना मिळत नाही.

ज्याचा उल्लेख याठिकाणी केला, की देशाच्या महत्त्वाच्या त्यासंबंधीची कोर्टामध्ये केस गेली. आजपर्यंत देवेंद्र फडणवीसांच्या आदेशानं जे ॲडव्होकेट जनरल म्हणून काम करत होते, आज देवेंद्र फडणवीसांच्या 16 टक्के आरक्षणाच्या विरूद्ध महाराष्ट्राच्या हायकोर्टामध्ये हा निकाल रद्दबातल करण्यासंबंधीची अर्ग्युमेंट आणि मागणी हेच लोक याठिकाणी करतायंत. मुस्लिम समाजाला पूर्वीच्या राजवटीमध्ये आरक्षण दिलं. कोर्टानं सांगितलं, की आरक्षणाचा त्यांचा अधिकार आहे. भाजपाच्या सरकारनी सांगितलं, की मुस्लिमांना आम्ही याठिकाणी आरक्षण देणार नाही. या देशाचे मुस्लिम या देशाचे नागरिक आहेत. या देशाच्या स्वातंत्र्यासाठी कष्ट केलेले आहेत. देशाच्या रक्षणासाठी किंमत देणारे आहेत आणि त्यांना आम्ही आरक्षण देणार नाही. कशाच्या




आधारे हे सांगताय.

आज याठिकाणी या सगळ्या गोष्टींच्या पाठीमागं एकच गोष्ट आहे. जातीय धोरण, धर्माच्या नावानं समाजामध्ये अंतर निर्माण करून विद्वेष वाढविण्यासंबंधीचा प्रयत्न केला जातोय. साधं उदाहरण सांगतो, की क्रिकेटच्या मॅचसंबंधी आपल्या देशातल्या लोकांना भयंकर आस्था आहे. मी क्रिकेट संघटनेचा अध्यक्ष होतो. जागतिक संघटनेचा अध्यक्ष होतो. भारताचे खेळाडू जगाच्या पाठीवर कुठेही जावून आपला खेळ दाखवतात, कर्तृत्व दाखवतात याचा विचार संबंध जगाने केला. आता जगाच्या मॅचेस होणार आहेत. काही मॅचेस पाकिस्तानला होणार आहेत. भाजपावाल्यांनी चर्चा सुरू केली, की नाही त्या ठिकाणी मॅच खेळायच्या. सचिन तेंडुलकर, भारतरत्न ज्याला दिलं गेलं, गावस्कर, ज्यानं खेळामध्ये दुनियात नाव केलं. त्यांनी एकच गोष्ट सांगितली सचिन तेंडुलकरनी, की पाकिस्तानला जायचं का नाही हा भाग सोडा पाकिस्तानच्या टीमचा पराभव करण्याची हिंमत आमच्या खेळाडूंमध्ये आहे. त्याला कुणी बंदी घालू नये. नुसतं एवढं वाक्य हे तेंडुलकरनी सांगितलं, की त्याच्यावर जातीयवादाचा आणि पाकिस्तानच्या प्रेमाचा उल्लेख केला जावू लागला. ज्यांनी आरोप त्यांच्यावर केला त्यांना माहित नाही, वयाच्या 15व्या वर्षी हाच सचिन तेंडुलकर भारताच्या संघातून पाकिस्तानमध्ये गेला आणि पहिल्या मॅचमध्ये शंभर रन त्याठिकाणी काढल्या आणि पाकिस्तानचा पराभव केला. पराभव करण्यासंबंधीची धमक आणि ताकद ज्या सचिन तेंडुलकरमध्ये आहे, आज त्याच्यासंबंधी या प्रकारचे उद्गार हे काढायला लागले आहेत.

याचा अर्थ साधा आहे. समाजात दलित असो, आदिवासी असो, अल्पसंख्याक असो, खेळाडू असो, तरुण असो या प्रत्येकाच्या संबंधी एकप्रकारच्या आकसाची भूमिका ठेवून समाजासमाजामध्ये विष पसरवण्याचं काम आज भारतीय जनता पार्टीच्यावतीनं केलं जातंय. त्यांना उत्तर देण्याचा आणि त्यांना धडा शिकवण्याची वेळ आलेली आहे.

महाराष्ट्रात दुष्काळाचे संकट आहे. गुराढोरांना चारा मिळत नाही. लोकांना रोजगाराची आवश्यकता आहे. अनेक ठिकाणी सोन्यासारखी पिकं जळून गेली. आणि ज्यावेळेला शेतकरी संकटामध्ये येतो, त्यावेळेला केंद्र सरकारनी, राज्य सरकारनी पूर्ण ताकदीनं मदत केली पाहिजे. आज हा बीड जिल्हा दुष्काळामध्ये होरपळतोय. आम्ही चौकशी केली, गुरंढोरं इथून बाहेर जायला लागली, त्यांची विक्री व्हायला लागली, त्यांची हत्या व्हायला लागली. ज्यावेळेला आम्हा लोकांच्या हातामध्ये सत्ता होती, त्यावेळेला लाखो जनावरांसाठी छावण्या काढल्या. मोफत खाद्य दिलं आणि शेतकऱ्याच्या कुटुंबाच्या दावणीची जनावरं ही वाचवायच्यासंबंधीची भूमिका घेतली. आज बीड जिल्ह्यामध्ये दुष्काळ आहे. पण एकही छावणी काढलेली नाही. कुठेही शेतकऱ्याला मदत केलेली नाही. त्याच्या डोक्यावरचं ओझं कमी केलेलं नाही. रोजगार हमीची कामं मुक्तपणे काढलेली नाहीत. याचा अर्थ हा आहे, की संकटग्रस्त महाराष्ट्राच्या पाठीशी आज उभं राहण्याची धमक या राज्य सरकार आणि केंद्र सरकारची नाही. पण तुम्ही काळजी करू नका. धनंजय मुंडेसारखा एक लढाऊ योद्धा महाराष्ट्राच्या विधिमंडळामध्ये आहे. उद्याच्याला विधिमंडळाचं अधिवेशन सुरू होईल. तर या प्रश्नावरून त्या सदनामध्ये आकाश-पाताळ एक केल्याशिवाय राहणार नाही आणि तुमच्या पदरामध्ये न्याय मिळवून दिल्याशिवाय तो स्वस्थ बसणार नाही एवढीच खात्री आज याठिकाणी देतो आणि ही परिवर्तनाची लढाई, जी सुरू केली रायगडावरून आज तिचा शेवट याठिकाणी होतोय. या शेवटामधून हे भाजपाचं सरकार निश्चित आपण घालवू हा विश्वास याठिकाणी व्यक्त करतो आणि माझे दोन शब्द संपवतो.



# छगन भुजबळ

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या परिवर्तन यात्रेची सुरूवात रायगडावर झाली. शिवछत्रपतींना वंदन केलं. कारण, शिवछत्रपतींनीसुद्धा या देशामध्ये जुलमी राजवटीच्या विरूद्ध तलवार उपसली आणि एक परिवर्तन या देशामध्ये घडवून आणलं. डॉ. बाबासाहेब आंबेडकरही तिथेच रायगडाच्या पायथ्याशी चवदार तळ्यावर, त्यांना वंदन केलं कारण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनीसुद्धा एक सामाजिक क्रांती या देशात घडवून आणली. मनुस्मृति जी आहे, 25 सप्टेंबर 1927ला बाबासाहेबांनी ती जाळली आणि जुलमी कायदा कायमचा काढण्यासाठी त्यांनी तुमच्या आमच्या हातामध्ये एक संविधान दिलं, कायदा दिला. आणि म्हणून मघाशी म्हटल्याप्रमाणं, दोन राजे इथे गाजले महाराष्ट्राच्या पुण्यभूमीवर, एक तो रायगडावर, एक चवदार तळ्यावर. त्यांनी परिवर्तन केलं. तोच मुद्दा घेवून आम्ही यात्रा सुरू केली.

देवेंद्र फडणवीस यांचं म्हणणं असं आहे, की नकलाकार बोलवावे लागतात, भुजबळ तुम्ही काय बोलता, तुम्ही काय स्वातंत्र्यलढ्यामध्ये गेला होता का? मला त्यांना सांगायचंय, की अरे मी नकलाकार आहे तर तुम्हाला एवढी धडकी का भरलीय. नकलाकार असेन तर सोडून द्यायला पाहिजे होतं. पण तुम्हाला धडकी भरली आहे आणि तुम्ही विचारता की भुजबळ तुम्ही काय बोलता? अरे मग काय बोलायचं ते देवेंद्रभाई तुमच्याकडून मी शिकू काय. अरे, 1985ला मुंबईचा महापौर आणि आमदार होतो, त्यावेळी तुम्ही शाळेत शिकत होता, तुमच्याकडून आता शिकायचं काय. पुढे ते म्हणतात, की तुम्ही काय स्वातंत्र्यलढ्यात गेला होता काय. अरे, माझा त्यावेळी जन्म झाला नाही. पण माझे वाडवडील गेले होते. पण तुमचे जे राजकीय पूर्वज त्यांनी स्वातंत्र्यलढ्याला विरोध केला. चले जाव चळवळीला विरोध केला. हा इतिहास आहे. तो विसरू नका. आणि कारावास म्हटलं तर मी अनेकवेळा भोगलांय. अरे, बेळगाव-कारवारमध्ये लाठ्या-काठ्या खाल्ल्या आम्ही. शिशिर शिंदे, दगडू सपकाळ आम्ही सगळे दोन तीन महिने आतमध्ये होतो. आम्हाला तुरूंगाची भीती नाही.

आता आम्ही पवार साहेबांच्या नेतृत्वाखाली सामाजिक काम करतो आहोत. राजकीय कार्य करत आहोत. पण बाळासाहेबांच्या सोबत 25 वर्षे काम करताना छगन भुजबळने अनेक लढ्यांमध्ये बिन्नीची भूमिका बजावलेली आहे. त्यामुळे तुम्ही मला अशी भीती वगैरे दाखविण्याची काही आवश्यकता

# परिवर्तनाची लढाई जिंकायची आहे



नाही. छगन भुजबळ हा डरणारा नाही. आणि जामीनावर आहेत म्हणता. अरे, जामीनावर तर अनेकजण असतात. तुमचे सुद्धा अनेक नेते आहेत. अरे, तुम्ही तर मला भ्रष्टाचारीच म्हणता, पण तुमच्या लोकांनी तर मर्डर्स केले. लोकांचे खून पाडले. अशा केसेस तुमच्यावर आहेत. त्यामुळे तुम्ही मला, जामीनावर भुजबळ आहात. मग आता काय परत तुम्ही मला आतमध्ये घेणार. अरे, मी तयार आहे. जेलमध्ये असतानासुद्धा तुम्ही मला हॉस्पिटलमध्ये जावू देत नव्हता. शेवटी पवार साहेबांनी सांगितलं, की भुजबळांचं जर कमी जास्त झालं, तर देवेंद्र फडणवीस तुम्ही जबाबदार आहात. छगन भुजबळ घाबरत नाही. मैं नही चाहता खुदा से, ये खुदा मुझे लंबी उम्र दे, बस्स् चंद लम्हे दे मगर कमाल के दे. छगन भुजबळ जगेल तर सिंहासारखा जगेल. असं घाबरून जे आहे गप्प बसणाऱ्याची औलाद छगन भुजबळ नाही.

तुम्ही माझे मित्र आहात देवेंद्र फडणवीस. त्यामुळं नक्की माझं कुठलं भाष्य तुम्हाला आवडलं नाही ते तुम्ही मला सांगा. आणि म्हणून मी परत एकदा ते भाषण जे आहे परत मला बोलावं लागणार आहे. ते तुम्ही अभ्यास करा आणि मला सांगा, की तुम्हाला कुठल्या भाषणाचा राग आला. मी काय म्हणालो त्या दिवशी, 14 फेब्रुवारीला पुलवामामध्ये जो हल्ला झाला, आरडीएक्सची गाडी जवानांच्या बसवर आदळली. 44 जवांनाचे तुकडे तुकडे झाले. एक जवान आपल्या पत्नीबरोबर फोनवर बोलत होता. त्याला मुलगा झाला होता. आनंदात होता. तो म्हणाला, मी लवकरच भेटायला येतो आहे आणि तितक्यात त्या फोनवरून त्याच्या पत्नीला मोठा धमाका ऐकायला आला. संपलं आयुष्य. एका जवानाचे वडील लग्नपत्रिका वाटत होते. त्यांना सांगितलं, की वाटू नका आणि त्यांना तिथंच भोवळ आली की काय झालं.

हे सगळं झालं, त्यावेळेला 3 वाजून 37 मिनिटांनी हल्ला झाला, 44 जवान गेले. पावणे सहा वाजता देशाचे प्रधानमंत्री उत्तराखंडमध्ये भाषण करत होते. मतांसाठी. साडेसहा वाजता, आदित्यनाथ योगी केरळमध्ये भाषण करतात. 8 वाजता अमित शहा कर्नाटकमध्ये भाषण करतात आणि सांगतात, राम मंदिर वही बनायेंगे. आणि आमचे मुख्यमंत्री महोदय मातोश्रीवर वाटाघाटी करत असतात. कुणाला काही पडलेलं नव्हतं. त्यावेळी प्रियांका गांधी यांनी त्यांची पहिली प्रेस कॉन्फरन्स साधारण सहाच्या दरम्यान श्रद्धांजली शहीदांना वाहिली आणि त्यांनी प्रेस कॉन्फरन्स रद्द केली. कोण समजदार आहे? ते समजदार आहेत की प्रियांका गांधी समजदार आहेत.

2014ला असेच दुर्दैवाने पाच जवान शहीद झाले होते आंतकवादी हमल्यामध्ये. काय म्हणाले अमित शहा त्यावेळेला? यदी मोदी प्रधानमंत्री बने तो पाकिस्तान के घुसपेठीयों की सीमा पार करने की हिंमत नही होगी. सुषमा स्वराज म्हणाल्या, पाच जवानों की हत्या, देश व सेना को किस अपमान का सामना करना पड रहा है, क्यों की हमारे पास एक कमजोर और दुविधापूर्ण सरकार है. गिरीराज सिंह काय म्हणाले? अगर देश के प्रधानमंत्री नरेंद्र मोदी होते, तो हम लाहोर तक पहूंच गये होते. आणि नरेंद्र मोदी म्हणतात, देश की सुरक्षा करनेवाला जवान सुरक्षित नही है, ऐशी सरकार इस देश को नही चाहिये. पाच जवान, त्यांची हत्या झाल्यानंतर हे बीजेपीचे प्रमुख नेते काय म्हणतात आणि आज ज्यावेळेला 44 जवानांचे तुकडे झाले, त्यावेळी राहुल गांधी म्हणतात, या संकटाच्यावेळी मी सरकारबरोबर आहे. मी जवानांबरोबर आहे. वो हमे बांटना चाहते हैं, मगर हम बटेंगे नहीं. हम एक हैं. सांगा, राहुल गांधी समजदार आहेत की ही मंडळी समजदार आहेत.

आता त्यांनी वेद, ग्रंथ, मंत्र नावाची काय तरी यात्रा काढली आहे. का, तर आपल्या भारतावर कुणी आतंकवादी हमला करू नये म्हणून. मला त्यांना सांगायचंय, की या यात्रेनं काही होणार नाही. लोक म्हणतात, की ना जिओ का डाटा चाहिये, ना पातंजली का आटा चाहिये, ना जन धन बँक का खाता चाहिये, ना अंबानी, अडाणी, टाटा चाहिये, पाकिस्तानमध्ये इंदिराजी के समयवाला सन्नाटा चाहिये. आज देशभरामध्ये ही मागणी आहे आणि यांचं चाललंय पूजा, अर्चा. दहशतवादी हल्ल्यामध्ये मनमोहनसिंग



प्रधानमंत्री असताना दहा वर्षात 110 जवान शहीद झाले, आणि या मोदी सरकारच्या काळात तीन वर्षातच 721 जवान शहीद झाले. ज्यावेळेला या सगळ्या प्रेतयात्रा ज्या आहेत त्या निघाल्या 44 जवानांच्या तिरंग्यात लपटलेल्या शवपेटिका ज्या मांडलेल्या होत्या, काय वाटलं असेल त्या तिरंगी झेंड्यालासुद्धा. आणि मनात आलं, की तिरंगेने मायूस होकर, तिरंगेने दु:खी होकर सरकार को पूछ रहा है, ये मेरा क्या हाल है, मेरा काम लहराने मे कम और कफन पर जादा इस्तेमाल हो रहा है. माझं काम फडकण्याचं आहे. पण मला दुर्दैवानं जास्तीत जास्त जवानांच्या शवपेट्या पहायला मिळतायंत. काय चाललेलं आहे. माझी आपल्याला विनंती आहे, याचं उत्तर ही सगळी मंडळी काय देवू शकणार नाहीत. याच्यासाठी हे सरकार बदलावं लागेल.

संपूर्ण देशामध्ये कायदा सुव्यवस्थेची वाट लागली आहे. दादरीमध्ये अखलाकच्या घरी गोमांस सापडलं म्हणून आरडाओरड केली. त्या अखलाकला घराच्या बाहेर काढलं. बायको मुलांसमोर त्याचे तुकडे केले. सुबोधकुमार नावाच्या इन्स्पेक्टरनं त्या मांसची लॅबोरेटरित चौकशी केली, ते गोमांस नव्हतं. अखलाक हकनाक मारला गेला. सुबोधकुमारची बदली बुलंदशहरमध्ये झाली. परत एकदा आवई उठली, गोमांस, गोमांस, गोमांस. सुबोधकुमार चौकीच्या बाहेर आला. हात जोडले आणि सांगितलं, की मी चौकशी करतो. पण सगळं ठरलेलं होतं. चौकीला आग लावली. सुबोधकुमार हात जोडत होता. त्याला खाली पाडलं. त्याला तुडवलं. त्याचं पिस्तुल काढलं आणि त्याला गोळ्या घातल्या. काय कायदा सुव्यवस्था. गुजरातमध्ये दलित समाजाचा एक नवरदेव घोड्यावरून आला, म्हणून त्यालाही तुडवून तुडवून मारला. कुठे कायदा सुव्यवस्था.

सत्तेत आल्याबरोबर या मोदी सरकारनं केलं काय? तर पहिल्यांदा जे आहे, आणखी एक गोष्ट तुम्हाला सांगायची आहे. अलिकडेच पांढरकवड्याला प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या सभेत पाच तास पाणी न मिळाल्यामुळे विद्यार्थीनीचा मृत्यू झाला. एक तर उन्हाचा तडाखा, महिलांना तिथं आणलं गेलं, सातवीतली ही मुलगी. तिने पाण्याची बाटली आणली होती. पाण्याची बाटली पोलिसांनी नेवू दिली नाही. तिला तहान लागली. सभेला पाच तास बसून होती ती. ती बाहेर जावू इच्छित होती. तिला पोलिसांनी जावू दिलं नाही. सभा संपल्यानंतर ती सीरियस झाली आणि हॉस्पिटलमध्ये मृत्यू झाला. हे सगळीकडं छापून आलं आहे. मी स्वत: म्हणत नाही. देवेंद्र फडणवीस तुम्ही पाणीसुद्धा त्या मुलीला मिळू दिलं नाही. तिला बाहेर जावू दिलं नाही. पाण्याची बाटली काढून घेतली आणि ती मुलगी मृत्यू पावली. तुमच्यावर कुठला खटला भरला पाहिजे. आणि तुम्हाला कसली भीती वाटतेय. एका मुलीची. पाण्याच्या बाटलीची. 56 इंच का सीना है आपका और एक लडकी से डरते हो.

सत्तेत आल्याबरोबर यांनी काय केलं? संस्था मोडून टाकल्या. प्लॅनिंग कमिशन खलास करून टाकलं. सुप्रीम कोर्ट, ते सुद्धा जजेस बाहेर येवून कंप्लेंट करायला लागले, की हे काय चाललेलं आहे. अशीच एकदा नोटबंदी एका रात्रीत केली. का तर आपल्याला काळा पैसा परत आणायचा आहे. अरे, पण दुसऱ्या दिवशी पाचशे, हजार रूपयांच्या नोटा जर

कागद बनले तर लोकांनी त्यांच्या गरजा कशा पूर्ण करायच्या. दहशतवाद थांबवायचा असल्याचे सांगितले. काला धन परत आले. सगळे पैसे गुजरातमध्ये गेले. तिकडच्या पतसंस्था आणि बँकांमध्ये काळ्याचे गोरे झाले. अमित शहा आणि त्यांचे लोक संचालक म्हणून तिथे आहेत. त्या संस्थांची चौकशी करा. आणि आतंकवाद. अरे, आतंकवाद तर वाढला. त्या बँकेच्या लाईनमध्ये नोटा बदलण्यासाठी उन्हात उभे राहिलेले दीडशे लोक मरण पावले. सगळ्या संस्था तुम्ही मोडल्या.

रिझर्व्ह बँक, तिचं वाटोळं झालं. रघुराम राजन गेले. यांनी स्वत: नेमलेली माणसेही सोडून गेले. कारण त्यांना दादागिरी पसंत आली नाही. आता तिथे कोण आहेत, तर इतिहासतज्ज्ञ शक्तीकांत दास रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर आहेत. बँक मोडून टाकली. सीबीआयचं काय झालं? हेच. एक डायरेक्टर दुसऱ्या डायरेक्टवर रेड करतो, दुसरा डायरेक्टर याच्यावरती रेड करतो. सरकारला वाटलं, अलोक वर्मासारखा अधिकारी राफेलची केस नोंदवणार. त्याची बदली केली. सुप्रीम कोर्टानं सांगितलं, की तिथेच ठेवा. परत दुसऱ्या दिवशी मिटिंग केली आणि बदली केली. छप्पन इंच का सीना थर्रथर्राया. टीव्हीवाल्यांवर किती दादागिरी. अनेक लोकांना बाहेर जावं लागलं. का? तर मोदींच्या विरूद्ध काही बोलायचं नाही.

मोदी साहेबांनी सांगितलं, की भारत को विश्वगुरू बनाना है. त्यांनी सांगितलं, की मै जा रहा था, एक आदमी गटर के पास चाय बना रहा था. यांना हे सांगायची फार हौस की मै चाय बनाता था. मै भी कहता हूँ की मै भाजीपाला बेचता था, भायखळा मार्केटमे, फुटपाथपर. वो तो अभी है. पर तुम जहाँ चाय बेचते थे, वो रेल्वे स्टेशन तभी था ही नहीं. तो चाय कहाँ बेचते थे भाई. और वो प्रविण तोगडिया कहते हैं, की मै चालीस साल इसके साथ था, कभी भी चाय नही बेची. जाऊ द्या, चहा विका, काही विका. देश विकू नका. एवढं मला त्यांना सांगायचंय. तर ते काय सांगत होते, की मै गटर के पास से जा रहा था, एक आदमी गटर मे गॅस होता है ना, तो उसने उस नाली मे एक पाईप डाला था, उसका एक मुंह जो है एक शेगडी को लगाया था, नाली मे से गॅस आता था, शेगडी जलती थी, चाय बनता था. अरे वा, काय भाषण. म्हणजे याच्यापुढे जर आपला सिलिंडर मोकळा झाला, तर तो घेवून नाल्यावर जायचं आणि तिथून फुकट गॅस भरून आणायचा. घर घर नाली, घर घर गॅस. जिसकी लाठी उसकी भैंस. बनेगा पकोडा, बनेगी चाय. स्कूल, कॉलेज भाड मे जाय. आम आदमी के साथ मन की बात. अदानी, अंबानी के साथ धन की बात. वा रे शासन तेरा खेल, न्याय मांगा तो हो गयी जेल.



देवेंद्रजी म्हणाले, की भ्रष्टाचारासाठी तुम्हाला अटक केली होती. देवेंद्र फडणवीस मला तुम्हाला विचारायचं आहे, शंभर कोटीचं ते कॉन्ट्रॅक्ट छगन भुजबळनं दिलं नाही. मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली कमिटीनं ते कॉन्ट्रॅक्ट दिलं. मी शिफारससुद्धा केली नाही. पीडब्ल्यूडीचा मंत्री म्हणून मी फक्त ते चांगलं कसं होईल हे पाहिलं. छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा पुढे बसवला. बाबासाहेब आंबेडकर आणि महात्मा जोतिबा फुल्यांचे पुतळे बसले. अमित शहा तिकडेच मिटिंग घेतात. नरेंद्र मोदी तिकडे आले. म्हणाले, बहोत बढिया. बहुत पैसा खर्च हुआ होगा. एक खासदार आले. म्हणाले, महाराष्ट्र सदन बहुत सुंदर, बनानेवाला अंदर. एक पैसा आजपर्यंत महाराष्ट्र सदनचा दिलेला नाही. महाराष्ट्र सदन आणि इतर काही इमारती फुकट बांधून झाल्या. देवेंद्र फडणवीस, तुम्ही आधी म्हणाला, की 25 हजार कोटी खाल्ले. मग म्हणाले, दहा हजार कोटी खाल्ले. मग म्हणाले, साडे आठशे कोटी खाल्ले. शंभर कोटीचं कॉन्ट्रॅक्ट आणि साडे आठशे कोटी मला दिले. आणि त्याला तर एक रूपया दिलेला नाही कुणी. तो कसा काय देईल. पाच फुटाची म्हैस बाळंत झाली तर तिला पंधरा फुटाचं रेडकू होईल का. हे असं सगळं चाललेलं आहे.

माझी आपल्याला

विनंती आहे. हा जो दिल्लीवाला शेठ आहे त्याचं सगळं फेल झालेलं आहे. यांची डिग्री फेल आहे. यांचं घर फेल आहे. गुजरात मॉडेल फेल आहे. नोटाबंदी फेल आहे. मेक इन इंडिया फेल आहे. स्टार्टअप इंडिया फेल आहे. डिजीटल इंडिया फेल आहे. स्कील इंडिया फेल. स्मार्ट सिटी फेल, जीएसटी फेल. दोन कोटी युवकांना नोकऱ्या देणार तेही फेल आणि पंधरा लाखाचा वादा तोही सगळा फेल. आणि आता राफेल. साडेपाचशे कोटीचं विमान साडे सोळाशे कोटीला का घेतलं, कुणीच सांगत नाही. आणि अंबानीला जे कॉन्ट्रॅक्ट दिलं, ज्या अंबानीचं दिवाळं निघालं. एरिक्सन कंपनीच्या केसमध्ये कोर्टानं सांगितलं, की साडेचारशे कोटी भरा नाही तर जेलमध्ये जा. त्याला चाळीस हजार कोटीचं कॉन्ट्रॅक्ट दिलं. कुठे गेला हा पैसा सगळा. ज्यांनी खेळण्यातलं विमान अजून बनवलेलं नाही, त्याला तुम्ही लढाऊ विमानाचं कॉन्ट्रॅक्ट दिलं.

महागाई एवढी वाढली, की काँग्रेसच्या राज्यात खिशात पैसे घेवून गेले, तर पोतंभर सामान येत होतं. आता खिशात पैसे नेले तर पिशवीमध्ये सामान येतंय. आणि हेच राज्य जर परत आलं ना, तर पिशवीभर पैसे न्यावे लागतील, आणि खिशात सामान आणावं लागेल, एवढी महागाई वाढलीय. पेट्रोलचे भाव किती वाढले. नरेंद्र मोदी यांच्या वयाच्या पलिकडे गेलंय. लालकृष्ण अडवानींच्या वयाबरोबर आलंय आणि हेच सरकार जर राहिलं, तर ते एमडीएच मसालेवाले काका यांच्या वयाबरोबर पेट्रोलचे भाव वाढतील. आणि एक दिवस असा येईल, की आजोबा नातवाला सांगतील, लहान बाटलीमध्ये बाळा याला पेट्रोल म्हणत होते. परंतु या भाजपवाल्यांना नाव बदलण्याचा शौक फार. म्हणून याचं नाव बदललेलं आहे. याचं नाव आहे, पंडित दिनदयाळ उपाध्याय बहुमूल्य तरल पदार्थ.



आता मंदिर-मशिद, हिंदु-मुसलमान, आपसामध्ये वाद लावण्याचे प्रयत्न होतील. पण मला तुम्हाला सांगायचंय, वो मंदिर नही, सरकार बनाना चाहते है, देश मे कितने मुर्ख है, फिर एक बार अजमाना चाहते है. तुम्ही अजिबात मनाचा समतोलपणा ढळू देवू नका. धर्माचा धंदा हे लोक करायला निघालेले आहेत. फक्त निवडणुकीसाठी आणि मला त्याचं दु:ख आहे, पण अफसोस इस बात का नही की धर्म का धंदा हो रहा है, अफसोस इस बात का है की पढा लिखा भी अंधा हो रहा है. आणि म्हणून याच्यापुढे काही जरी झालं तरी काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्याच उमेदवारालाच तुम्ही मतं दिली पाहिजेत. त्याशिवाय ना महागाई कमी होणार आहे, ना कायदा सुव्यवस्था निर्माण होणार आहे. ना देशाचं संरक्षण होणार आहे. ना दोन कोटी मुलांना नोकऱ्या मिळणार आहेत. काहीही होणार नाही. त्याला एकच मार्ग, तो म्हणजे सरकार बदलणं. ते तुमच्यामध्ये भांडणं लावतील.

मला देवेंद्र फडणवीसांना विचारायचंय, की 250 कोटी रूपये तुम्ही ओबीसी महामंडळाला दिले, मग साडे चार वर्षात एक रूपया का नाही दिला. आज साडे चार वर्षे झाली, ओबीसी विद्यार्थ्यांचे पैसे का नाही दिले. हे तुमच्या आमच्यातच नाही तर देवामध्ये सुद्धा भांडणे लावायला लागलेत. हे आता म्हणायला लागलेत, की बजरंगबली दलित समाज का था, हे आदित्यनाथ योगी. योगी और मोदी इनका एकही नारा, ना घर बसा हमारा, ना बसने देंगे तुम्हारा. ते योगी म्हणाले, की हनुमान दलित होता. दुसरा म्हणाला, हनुमान आदिवासी दलित था. तिसरा म्हणाला, रहमान, सलमान वैसे हनुमान. एकानं मेसेज पाठविला, म्हणाला बघा भुजबळ, एका दलित हनुमानानं ब्राह्मण रावणाची लंका जाळली आणि कुणासाठी तर ओपन कॅटॅगरीमधल्या रामासाठी. माझी आपणाला विनंती आहे, हे देवादेवांच्यासुद्धा जाती सोडत नाहीत, तुमच्या आमच्या जातीत भांडणं लावून झाली, सगळ्यांनी एक राहा. काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस आणि सगळ्यांनी एक राहा आणि एकमुखानं ही लढाई जिंकायची आहे, परिवर्तन घडवायचं आहे. धन्यवाद. जय महाराष्ट्र!



# राज्याच्या भल्यासाठी सत्ता परिवर्तन आवश्यक

**अशोक चव्हाण**

मला या सभेच्यानिमित्तानं आवर्जून सांगायचं आहे, की धनंजय मुंडे हे आमचे सिंघम आहेत. महाआघाडीच्या या सभेचे विराट आयोजन करून आज भाजप-शिवसेनेला प्रत्युत्तर देण्याचं काम या परळीमधून निश्चितच होतंय. या परळीतल्या सभेला पाहून केंद्रातले असो किंवा राज्यातले भाजप-शिवसेनेचे सरकार हादरले आहे. मित्रहो, आज ही सभा पाहिल्यानंतर निश्चित म्हणावं लागतं, मै अकेला ही चला था जाणिवे मे मंजील मगर लोग आते चले और कारवां चलता गया, अशा प्रकारची परिस्थिती आज या विराट सभेच्या माध्यमातून याठिकाणी पहायला मिळतेय.

लोकांच्या मनामध्ये खऱ्या अर्थाने प्रक्षोभ आहे. लोकांच्या मनामध्ये राष्ट्रीय आणि राज्य पातळीवर जे जे प्रश्न आपल्यासमोर आहेत, त्या प्रश्नांचा, आपल्या सर्वांचा आवाज बुलंद करण्याचं काम आपली महाआघाडी म्हणजेच काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, शेकाप पक्ष, आमचे पीआरपीचे नेते, राज्यातील सर्व सीपीआय, सीपीएम आम्ही प्रयत्न करत आहोत. जे 70 टक्के मतदान भाजपच्या विरोधात गेलेले आहे, ते 70 टक्के मतदान या महाआघाडीमध्ये सामील झालं तर जे 30 टक्केवाले मागच्या 2014च्या निवडणुकीमध्ये केवळ 30 टक्के मते घेतली आणि या 30 टक्के मताच्या आधारावर हे सत्तेवरून येवून बसले आणि 70 टक्के मतदान जे तुम्ही दिलं ते विखुरलं गेलं आणि फायदा त्यांचा झाला. आणि म्हणूनच काळाची गरज आहे, की ही महाआघाडी देशात करण्याचं काम पुढाकार जर कुणी घेतला असेल पवार साहेबांचं याठिकाणी जोरदार अभिनंदन केलं पाहिजे. देशातल्या सर्व समविचारी पक्षांना एकत्र आणण्याचं काम ते करतायंत. राहुल गांधी त्यांच्या संपर्कात आणि ते राहुल गांधींच्या संपर्कात आहेत आणि देशातल्या सर्व समविचारी पक्षांना एका व्यासपीठावर आणण्याचं काम पवार साहेब करत आहेत. पवार साहेबांना मनापासून लाख लाख धन्यवाद मी देतो, की त्यांच्या पुढाकाराने आज देशामध्ये महाआघाडी स्थापन होणार आहे.

मित्रहो, ही जर 70 टक्के मतं एकत्र आली तर या भाजप आणि सेनेला आपण पायउतार केल्याशिवाय रहाणार नाही, हे जनसमुदाय सांगू लागला आहे. सत्ता परिवर्तन अटळ आहे. सत्ता परिवर्तन महाराष्ट्रात होणार, सत्ता परिवर्तन देशात होणार आणि आपलं महाआघाडीचं सरकार आल्याशिवाय रहाणार नाही. आपल्या सगळ्या व्यथा याठिकाणी आमच्या सर्व सहकाऱ्यांनी सांगून युतीच्या चिंधड्या काढण्याचं काम केलेलं आहे. आता मला सांगा तुम्ही. मी पाहतोय, आमची जनसंघर्ष यात्रा असो, आपली परिवर्तनाची यात्रा असो, या सगळ्या यात्रांचे एवढ्या विराट सभेमध्ये रूपांतर झाल्या, आपण कल्पना करू शकत नाही एवढा प्रचंड विद्रोह हा जनतेच्या मनामध्ये आहे.

आज महाराष्ट्रामध्ये तीव्र दुष्काळ आहे. दुष्काळाची घोषणा फक्त औपचारिकता झाली. ती पण आम्ही वारंवार मोर्चे काढले, नागपूरला मोर्चा काढला, राज्यात मोर्चे काढले, ठिकठिकाणी आंदोलने केली. या सरकारला वारंवार मुख्यमंत्री म्हणत होते, मी अभ्यास करतोय. आम्ही मुख्यमंत्र्यांना म्हणालो, तुमचा अभ्यास आता पुष्कळ झाला. तुम्ही परीक्षेमध्ये नापास झालेला आहात. दुष्काळ जाहीर करा, पुष्कळ वाटोळं झालं आहे. नंतर मोठ्या मुश्किलीनं दुष्काळ जाहीर केला, 89 लाख लोकांना 34 हजार

राष्ट्रवादी स्वाभिमानी आचार! राष्ट्रवादी विचार !!

शेळ्या व मेंढरांना खाण्यासाठी कपाशीत पालादेखील शिल्लक राहिलेला नाही, इतकी दुष्काळाची भीषणता यावेळी आहे.



कोटींची कर्जमाफी देणार असं घोषीत केलं. मिळाला का पैसा तुम्हाला. आज कुठल्याही माणसाच्या बँकेमध्ये कर्जमाफीचा पैसा पोहोचला नाही ही वस्तुस्थिती आहे. जेमतेम 12-14 हजार कोटींच्या आसपास सांगतायंत, प्रत्यक्षात मात्र याद्या अजूनही बँकेला मिळालेल्या नाहीत. हिशोब मिळालेला नाही. सरकारला विचारलं, किती पैसा दिला. उत्तर देता येत नाही. कारण सरकारच्या खिशात दमडीही नाहीये. सरकार भिकारी झालेलं आहे. हे भिकारी सरकार आहे, आणि या सरकारच्या माध्यमातून कुठल्याही प्रकारची कर्जमाफी अद्याप मिळालेली नाही.

मला जनतेला मुद्दाम आठवण करून द्यायची आहे. ज्यावेळी काँग्रेस-राष्ट्रवादीचं सरकार महाराष्ट्रात होतं, आणि महाराष्ट्रात दुष्काळ होता, आत्महत्या होत होत्या, 24 तासाच्या आत कर्जमाफीचा निर्णय आपल्या सरकारनं घेतला आणि 24 तासांत पैसे तुमच्या बँक खात्यात जमा झाले. हे तुम्हाला मुद्दाम याठिकाणी आवर्जून सांगितलं पाहिजे. संवेदनशीलता असलेलं आपलं सरकार होतं. मनामध्ये ही तीव्रता आणि भावना होती. आपली लोकं अडचणीमध्ये आहेत. महाराष्ट्रात अडचणीमध्ये आहे आणि महाराष्ट्रातल्या तमाम लोकांना आपण मदत केली नाही तर कोण करणार आहे, ही भावना तमाम मंत्रिमंडळातले सहकारी, भुजबळ साहेब उपमुख्यमंत्री होते, मी राज्याचा प्रमुख होतो, अजितदादा होते, जयंत पाटील होते, आम्ही सर्व सहकाऱ्यांनी निर्णय घेतला की महाराष्ट्रात तातडीने कर्जमाफी केली पाहिजे

दुष्काळाने मराठवाड्यात जळालेला ऊस सर्वत्र पाहायला मिळतो. रांजणी गावाच्या परिसरातील हे दुष्काळाचे दृश्य.



आणि महाराष्ट्रामध्ये दिलासा देण्याचं काम जर कुणी केलं असेल, तर काँग्रेस-राष्ट्रवादीच्या सरकारने केलं होतं याची मुद्दाम तुम्हाला मी आठवण करून देत आहे.

आज काय झालंय. कुठे गेली संवेदनशीलता. 14 हजार पेक्षा जास्त लोकांच्या आत्महत्या या महाराष्ट्रात होतायंत. जबाबदार कोण आहे. एकनाथराव खडसे त्यावेळेस आम्हाला म्हणायचे, की तुमच्या सरकारमध्ये एवढी माणसं मरण पावली. 302चा गुन्हा तुमच्यावर का दाखल करू नये. तर मला आज देवेंद्र फडणवीस साहेबांना विचारायचंय, तुमच्या सरकारवर आज 302चा गुन्हा का दाखल करू नये. हे मला प्रथम सांगा, मग लोकांकडे मत मागण्यासाठी फिरा. हे मला मुद्दाम याठिकाणी आवर्जुन सांगायचंय, मित्रहो. कारण, व्यथा समजायला कुणी तयार नाही. बहुमताच्या जोरावर हम करे सो कायदा अशा प्रकारची भूमिका या देशात आणि राज्यात होणार असेल तर मित्रहो, ही सगळ्यांच्या भरोशावर मी याठिकाणी सांगू इच्छितो, की तुम्ही पुढे व्हा, आम्ही तुमच्याबरोबर आहोत मित्रहो. सत्ता परिवर्तन करा, त्याशिवाय राज्याचं भलं होणार नाही आणि त्याशिवाय मराठवाड्याच्या पदरात काहीच पडणार नाही.

आपलं सरकार, घोषणा दमदार एवढाच कार्यक्रम सुरू आहे. किती आश्वासनं दिली. पण एकही आश्वासन पूर्ण केलेलं नाही. एवढ्यावर काय उजळ माथ्यानं सांगतायंत, की ये तो चुनावी जुमला था. चुनाव मे बोलना पडता है. अरे, आम्ही कधी खोटं बोललो होतो. पण आज गडकरींचं भाषण ऐका तुम्ही. लोकांनी अच्छे दिन कब आने वाले है, असं विचारलं तर गडकरीजी म्हणतात, की अच्छे दिन कभी नही आते. महाराष्ट्र अतृप्त आत्माओं का देश है. म्हणजे तुमचं मतदान मिळाल्यानंतर आम्ही अतृप्त आत्मे झालोत. यांना हा अधिकार दिला कुणी. आज हे पुन्हा उजळ माथ्याने येणार, त्याच त्याच जुन्या गोष्टी सांगणार



लोकसभा निवडणुकीत एकजुटीने लढण्याची ग्वाही देताना शरद पवार, अशोक चव्हाण, जयंत पाटील, छगन भुजबळ, धनंजय मुंडे व इतर.

धोक्याची घंटा आहे.

पाच वर्षांमध्ये आपण अनुभवलं, आपण पाहिलं, या पाच वर्षामध्ये यांनी सांगितलं तो कायदा, यांनी म्हटलं ते निर्णय, त्यांनी म्हटलं यांना अटक करा, त्यांनी म्हटलं यांना बाहेर काढा. ही जर शोकांतिका महाराष्ट्रातल्या सामान्य माणसाची होणार असेल तर जायचं कोणाकडं हा खरा प्रश्न आज देशामध्ये निर्माण झालेला आहे. काय अवस्था आहे मराठवाड्याची? काय मिळतं मराठवाड्याला? रस्ते खोदून ठेवलेले आहेत. ठेकेदार यांचे आहेत. पैसा मिळविण्याचं मशिन जोरात सुरू आहे. पैशातून सत्ता आणि सत्तेतून पुन्हा पैसा कमवण्याचं काम जर या महाराष्ट्रात होणार असेल, हा पैसा सामान्य माणसाचा पैसा आहे. तुमच्या आणि त्या जुन्या आश्वासनांच्या जोरावर पुन्हा मतं मिळवण्यासाठी तुमच्यासमोर येणार मित्रहो. देशात नरेंद्र, महाराष्ट्रात देवेंद्र आणि मंत्रालयात उंदरं अशा प्रकारची अवस्था आज महाराष्ट्राची झालेली आहे. काहीच हाती पडणार नाही. या उंदरांनी महाराष्ट्र कातरून टाकला आहे. निर्णय प्रक्रिया ठप्प झाली आहे. सर्व संविधानीक संस्था मोडित काढण्याचं काम या सरकारनं हाती घेतलं आहे. म्हणून हे सरकार आपल्या चुकीमुळं जर पुन्हा आलं तर पुढच्या पाच वर्षामध्ये तुम्हाला मतदानाचा अधिकारसुद्धा राहणार नाही. ही मंडळी संविधान बदलल्याशिवाय राहणार नाहीत. पुनश्च एकदा आपल्या सर्वांचे आभार.



या देशातील संस्था मोडण्याचे काम नरेंद्र मोदी आणि भाजपच्या सरकारने केले आहे. म्हणून माझ्यासारख्या कार्यकर्त्याची एवढी विनंती आहे की, काल परवा अशोकरावांच्या नांदेडला लाखोची सभा झाली. आजही बीडमध्ये हीच लाखोची सभा होत आहे. लोकांचे मूड, ट्रेंड हा भाजपचे दिल्लीतील आणि महाराष्ट्रातील सरकार घालविण्याचा एक झाला आहे. महाराष्ट्रात काही लोकं आता स्पॉन्सर्ड सभा घेत आहेत. कोणाचं तरी पाठबळ मिळविण्याचे काम करत आहेत. मोठ्या संख्येने माणसं गोळा करण्याचे काम करत आहेत. काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस आणि धर्मनिरपेक्ष लोकांची जी आघाडी आम्ही महाराष्ट्रात निर्माण करू पाहतोय, त्याच्या खंड पाडण्याचे काम करत आहेत. त्यांची स्पॉन्सरशीपही भाजपची आहे. हे आपल्याला विसरता कामा नये. म्हणून आणि सर्व धर्मनिरपेक्ष लोकांना महाराष्ट्रात एकत्र करण्याचा प्रयत्न करतोय. आदरणीय शरद पवारसाहेब, राहुल गांधी असतील किंवा या देशातील सर्व लोकांना एकत्र करण्याचे काम पवारसाहेब करत आहेत. म्हणून आपल्याला महाराष्ट्रात सर्व धर्मनिरपेक्ष लोकांची ताकद एकत्र येईल.



# बोलघेवड्या पंतप्रधानापेक्षा काम करणारा पंतप्रधान करा

## प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांचे उद्‌गार

मी आपल्या सर्वांना विनंती करणार आहे. काही दिवसांपूर्वी इंग्लंडमध्ये एक पत्रकार परिषद झाली. त्या पत्रकार परिषदेत अमेरिकेत बसलेल्या एका माणसाने मुलाखत दिली. त्याने सांगितले की, इव्हीएममध्ये 2014 साली घोटाळा झाला. आणि ज्यांनी घोटाळा केला, त्या 12 -13 लोकांची हत्या झाली. ठीक आहे, त्याची काही चौकशी होईल नाही होईल. पण, त्याचबरोबर त्या सातासमुद्रापार बसलेल्या माणसाने आणखी एक मुद्दा सांगितला, गोपीनाथराव मुंडेंचीही हत्या त्याच कारणातून झाली. असा आरोप त्याने केला. मध्ये पाथर्डीला एक सभा झाली. त्यावेळी मी एक मागणी केली की, देशाचा केंद्रीय मंत्री असताना एक माणूस, जो या बीड जिल्ह्यातील होता, महाराष्ट्राचा नेता होता, त्या गोपीनाथराव मुंडेंची हत्या झाली, असं सातासमुद्रापार पलीकडून कोणीतरी सांगतयं, याची चौकशी करा. काय चुकलं हो माझं. गोपीनाथराव मुंडेच्या अंत्यसंस्कारादिवशी मी येथे आलेलो. जमाव किती क्षुब्ध झालेला, हे आम्ही पाहिलेले. आमची एक साधी अपेक्षा होती की, कोणीतरी जर असा आरोप करत असेल, तर त्याची चौकशी झाली पाहिजे. मला आश्चर्य वाटलं, मला वाटलेलं की, पंकजाताई मुंडे आम्हाला पाठिंबा देतील, शेवटी त्यांचे वडील आहेत ते. पण त्यांनी मला सांगितले की, जयंत पाटलांना हे शोभते का. अहो, तुमच्या वडिलांची हत्या झाली म्हणून कोणीतरी सांगतोय, किमान एवढी तरी मागणी करा की, ज्या दोन गाड्यांचा अपघात झाला, त्या दोन गाड्यांच्या ड्रायव्हरला काय शिक्षा झाली. 2001 साली माझा अपघात झाला होता. समोरच्या गाडीतील एक माणूस मेला. आमची एक साधी मागणी आहे की, शिक्षा काय झाली त्या ड्रायव्हरला. गोपीनाथ मुंडेंसारख्या नेत्याची हत्या झाली, असं जर कोणी सांगत असेल तर त्याची चौकशी झाली पाहिजे. आता हे सरकार काही बोलायला तयार नाही. पंकजाताई याच्यावर काही बोलत नाही. सत्तेत असल्यामुळे त्यांना काही मर्यादा असतील, सत्ता त्यांना जास्त महत्त्वाची असेल. पण, मी तुम्हाला या निमित्ताने सांगतो की, येणाऱ्या लोकसभा आणि विधानसभेच्या निवडणुकीनंतर राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेसचं धर्मनिरपेक्ष विचारांचे सरकार सत्तेवर येणार आहे. हे सर्व परिवर्तन यात्रेच्या निमित्ताने

महाराष्ट्रात फिरून आल्यानंतरचे आमच्यासमोरचे चित्र आहे. त्यामुळे येणाऱ्या विधानसभेनंतर ज्यावेळी काँग्रेस व राष्ट्रवादी चं धर्मनिरपेक्ष विचारांचे सरकार सत्तेवर येईल त्यावेळी आम्ही गोपीनाथराव मुंडे यांची हत्या कोणी केली, याची चौकशी करण्याचे काम पहिले करू, हा विश्वास सगळ्या बीडकरांना देतो.

पुलवामाच्या घटनेनंतर पाहिले तर काश्मीरमध्ये अतिरेकी हल्ल्याची संख्या फार वाढलेली आहे. म्हणून बोलघेवड्या पंतप्रधानापेक्षा काम करणारा देशाचा पंतप्रधान असला पाहिजे, त्यासाठी आपली ताकद काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसच्या आघाडी मागे उभी करावी, एवढीच विनंती करतो. आमच्या धनंजय मुंडेंना जरा महाराष्ट्रात फिरायला मोकळे करा. ही पहिली विनंती मी तुम्हाला करेन. कारण, ही परळीची तोफ सगळ्या महाराष्ट्रात फिरली पाहिजे. त्यासाठी तुम्ही धनंजय मुंडेंना परळीत जास्त काळ अडकवून ठेवू नका. हा समोरचा समुदाय पाहिल्यावर मला खात्री झालेली आहे की, धनंजय मुंडे तुम्ही महाराष्ट्रात बाहेर फिरा. शेवटची आपली विजयाची मिरवणूक काढण्यासाठीच आपण परळीला आलात तरी चालेल. एवढं आपलं महाराष्ट्रात आणि परळीत निश्चितपणाने वजन आहे. आपला आशीर्वाद धनंजय मुंडे असोत किंवा लोकसभेचे जे कोणी उमेदवार असतील त्यांच्या मागे आपला आशीर्वाद उभा करा.



# शिवसेना उपनेते डॉ. अमोल कोल्हे राष्ट्रवादीत

शिवसेनेचे उपनेते डॉ. अमोल कोल्हे यांनी शिवसेनेला जय महाराष्ट्र करत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये जाहीर प्रवेश केला. याशिवाय औरंगाबादचे (बदनापूर) माजी आमदार अरविंद चव्हाण यांनीही भाजपला रामराम करत राष्ट्रवादीमध्ये जाहीर प्रवेश केला. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आमदार छगन भुजबळ यांनी आपले विचार मांडले. त्यांनी यावेळी डॉ. अमोल कोल्हे यांनी छत्रपती शिवाजीराजे, छत्रपती संभाजी कसे होते हे मांडले आहे. ते सुशिक्षित आहेत. त्यांचा नक्कीच निवडणुकीत फायदा होणार आहे असेही आमदार छगन भुजबळ यांनी सांगितले. पक्षात नवे आहोत अशी वागणूक देणार नाही. पवार साहेबांचे मार्गदर्शन आहे. ते खंबीरपणे पाठीशी उभे आहेत असेही स्पष्ट केले.

आज विशेष आनंद की, जगाच्या पाठीवर प्रतिभावंत कलेवर प्रेम करत राजा शिवछत्रपती साकारला आणि आता राज्यातील घराघरात गाजत असलेली स्वराज्य रक्षक संभाजींचा स्वाभिमानी इतिहास उभा करणारे डॉ. अमोल कोल्हे यांनी शिवसेनेचा त्याग करुन राष्ट्रवादीत प्रवेश केल्याची माहिती प्रदेशाध्यक्ष आमदार जयंतराव पाटील यांनी यावेळी दिली.

डॉ. अमोल कोल्हे यांचे स्वागत करताना प्रदेशाध्यक्ष आमदार जयंतराव पाटील यांनी त्यांना घड्याळ चिन्ह आणि मफलर देवून पक्षात प्रवेश दिला.

बदनापूरचे माजी आमदार अरविंद चव्हाण यांनीही प्रवेश केला. भाजपमध्ये वाईट अनुभव घेतल्यावर ते स्वगृही परतले आहेत असेही प्रदेशाध्यक्ष आमदार जयंतराव पाटील म्हणाले.

तरुणाईला योग्य दिशेची गरज याची जाणीव फक्त शरद पवारांच्या नेतृत्वामध्ये आहे, असे सांगून डॉ. अमोल कोल्हे म्हणाले की, अनेकांना हा प्रश्न पडला असेल की, मी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश का करत आहे परंतु आज देशाच्या राजकारणात फार मोठी अस्वस्थता आहे. तरुणाईला योग्य दिशेची गरज आहे. ही जाणीव शरद पवारांसारख्या नेतृत्वामध्ये आहे. त्यामुळे त्यांचे हात बळकट करावे म्हणून मी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये प्रवेश केला आहे अशी स्पष्ट भूमिका डॉ. अमोल कोल्हे यांनी मांडली. शिवसेनेचे सुसंस्कृत नेते उद्धव ठाकरे यांच्यासोबत काम करायला मिळाले. आणि आता आनंद होत आहे. लहानपणी शरद पवार साहेबांची छबी बघण्यासाठी त्यांच्या गाडीमागे मी धावत होतो. परंतु आज त्यांच्याच पक्षाचे काम करायला मिळत आहे. यापुढे पक्षाचे काम अखंडपणे सुरु राहणार आहे असे डॉ. अमोल कोल्हे यांनी स्पष्ट केले.



# राष्ट्रवादीचा समारोप करणे चिक्की खाण्याएवढं सोप्प नाही...

## धनंजय मुंडे यांची टीका

परळीच्या इतिहासात या मैदानावर दुसरी सभा या ठिकाणी होत आहे. एक ज्यावेळी श्रद्धेय अटलबिहारी वाजपेयी या देशाचे पंतप्रधान होते, आणि त्यानंतर आज आदरणीय पवारसाहेबांची परिवर्तनाच्या निर्धाराची सभा होत आहे. काय योगायोग आहे बघा, 10 जानेवारीला रायगडावर शिवछत्रपतींना मानाचा मुजरा घालून, राष्ट्रमाता जिजाऊंच्या समाधीला नतमस्तक होऊन, महाडच्या चवदार तळ्यावर आदरणीय बाबासाहेब आंबेडकरांना वंदन करून ही निर्धार परिवर्तनाचा यात्रा सुरू झाली. सुरवात झाली स्वराज्याची राजधानी रायगडावरून. आणि समारोप होतेय, शिवशंभू वैद्यनाथाच्या चरणी. आणि कालच राज्याचे मुख्यमंत्री सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळ्याला परळीत आले. मला वाटलं वधू वरांना शुभाशीर्वाद देण्यासाठी, अक्षता टाकण्यासाठी मुख्यमंत्री या ठिकाणी आले असतील. पण, एखाद्या राज्याच्या मुख्यमंत्र्याला परळीतील परिवर्तनाची सभासुद्धा काळजात कळ आणत असेल, तर स्वाभाविक आहे की, त्यांनी आजच्या सभेवर टीका केली. राज्याच्या मुख्यमंत्र्यांना परळीचा इतिहास माहीत नाही. अरे, सुरवातही इथूनचे होते आणि तुमच्या मस्तवाल सत्तेचा समारोपही येथूनच होतो. म्हणून ही समारोपाची सभा परळी नगरीत घेतली आहे. वाईट एकाच गोष्टीचे वाटते की, म्हणाले परळी ही सुरवात करायची भूमी आहे. जर राष्ट्रवादी काँग्रेसने ही परिवर्तनाची यात्रा रायगडाला मानाचा मुजरा घालून केली, तर ती तुमच्या दृष्टीने पवित्र जागा नाही का. अरे, तुमच्या मनात किती काळं आहे, हे काल परळीच्या नगरीत कळाले. तुम्ही कितीही प्रयत्न करा, पण 2019 मध्ये या बीड लोकसभा मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेस- काँग्रेस आघाडीचा सार्वभौम खासदार आपल्याला साहेबांच्या खांद्याला खांदा लावून आपल्याला संसदेत पाठवायचा आहे.

आज पहिल्यांदा परळीच्या सभेत दिल्लीतलं बोलावं की, गल्लीतलं बोलावं, हा माझ्या समोर प्रश्न आहे. प्रश्न जेवढे दिल्लीतील गंभीर आहेत, तेवढेच गंभीर प्रश्न आमच्या बीड जिल्ह्यातील आहेत. आज भाजपवाले चर्चा करतात की भाजपच्या दबंग खासदाराच्या बरोबरीने राष्ट्रवादीला उमेदवारच मिळत नाही. पण मला खासदारसाहेबांना विचारायचे आहे की, आपला राजकीय जन्म होऊनच किती दिवस झाले आहेत. अरे, या बीड जिल्ह्याचा इतिहासच आहे की, 2009 ची निवडणूक झाली. त्यावेळी जिल्हा परिषदेचा एका साधा सदस्य आदरणीय मुंडेसाहेबांच्या विरोधात उभा केला तर तुम्हाला 1 लाख 36 हजार मतांनी निवडणूक जिंकता आली. 2014 ला आष्टीचा आमदार, मंत्री मंडळातील एक सदस्य निवडणुकीला उभा केला. मोदीची लाट असताना 1 लाख 20 हजार मतांनी पराभूत झाला. आता या खासदारांनी समजायला लागलेत की, मोदी नंतर हेच लोकप्रिय आहेत. मध्ये अमित शहाही नाहीत. अरे,

आज राष्ट्रवादी काँग्रेसला निवडणूक जिंकायची असेल तर फक्त 80 हजार मतांची गरज आहे. आज व्यासपीठावर सगळे एकत्र आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस, काँग्रेस, कवाडे आरपीय, खरातांची आरपीय, गवई आरपीय, सर्व एकत्रित आहेत. आपण सगळ्यांना साहेबांना निर्धार करून देऊ या की, या ठिकाणी बीडचा खासदार आपल्याला काँग्रेस- राष्ट्रवादी काँग्रेस आघाडीचा करून द्यायचा आहे.

खरं तर गल्लीपासून दिल्लीपर्यंतची सर्व सत्ता मुंडे साहेबांच्या निधनानंतर एका घरात दिली. आमदारकी घरात, खासदारकी घरात, राज्याचे मंत्रिमंडळ, हे सगळं असताना मला प्रश्न विचारायचा आहे, या सभेच्या माध्यमातून मला विचारायचे आहे की, बीड जिल्ह्यातील जनतेच्या जीवनात काय क्रांती घडली. काल मी फोटो पाहिला की, आमच्या बहिणबाईने दोन रुळावर दोन पाय ठेवून फोटो काढला. मला तो फोटो पाहिल्यावर कॉलेज जीवनातला एक पिक्चर आठवला. त्या पिच्चरचे नाव फूल और कांटे होतं आणि त्या पिच्चरला हिरो अजय देवगण होता. त्याने दोन मोटारसायकलवर पाय ठेवून फोटो काढला होता. रेल्वे आली नाही. सगळ्यात वाईट काय, कशासाठी आम्ही ही परिवर्तनाची सभा परळीत घेतली आहे. सांगायला लाज वाटते की, बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक परळीचे हे स्थान आहे, पण केंद्राच्या गॅझेटमध्ये परळीची नोंद बारा ज्योतिर्लिंग म्हणून नाही, तर झारखंडमधल्या परळी धामची आहे. ही तुमचा आमचा अपमान नाही. काय मिळाले आपल्याला.

आजही या बीडची ओळख ऊसतोड मजुरांचा जिल्हा म्हणून आहे. या ऊसतोड मजुरांची संख्या या चार वर्षात सात महिन्यांत कमी झाली का? आजही या जिल्ह्यातील सिंचनाचे 78 प्रकल्प प्रलंबित आहेत. मंत्रिमंडळातील मंत्री म्हणून जर हे प्रकल्प मंजूर झाले असते, तर कदाचित बीड जिल्ह्यातील या ऊसतोड मजुरांची संख्या कदाचित कमी झाली असती. ऊस तोडायला जाणार आमचा हा बांधव स्वतः ऊस पिकवू शकला असता. पण, एवढीसुद्धा अक्कल इथल्या पालकमंत्र्यांना नाही की, ते प्रकल्प मंजूर करून आणावेत.

अरे, तुम्ही ज्या परळीचे प्रतिनिधित्व करताय, त्या परळीच शक्तिपीठ जसं प्रभू वैद्यनाथ आहे, तसा वीज निर्मिती करणारा साडेबाराशे मेगावॉटचा प्रकल्प आहे. आज आपल्यापैकी अनेकांना माहिती नसेल की, सर्वच्या सर्व प्रकल्प बंद आहेत. आणि सरकार येणाऱ्या काळात थर्मलचे हे सर्वच्या सर्व प्रकल्प बंद करणार आहे. मग इथले प्रतिनिधी काय करतायेत. या थर्मल प्रकल्पावर इथल्या आणि परिसरातील 10 हजार लोकांचे पोट नाही का. हो आहे. पण, वारंवार या परळी आणि बीड जिल्ह्याला भकास करायचे, भावनिक करायचे, काळजात हात घालायचा, स्वर्गीय मुंडे साहेबांचे नाव घ्यायचे, मतं मिळवायची, स्वतः मोठं व्हायचं आणि आपल्याला मात्र भिकारी ठेवायचं. आता मात्र हे इथून पुढं चालायचं नाही. अरे याच्यापासून वाईट काय असावं, की मुंडे साहेबांच्या वारसा म्हणून आमच्या बहिणबाई महाराष्ट्रभर फिरतात, त्या मुंडेसाहेबांच्या नावानी 12 डिसेंबर 2014 ला गोपीनाथ गडावर ऊसतोड मजुरांचे महामंडळ काढलं, चार वर्षे सरकारने कार्यालय म्हणून सांगितले. मी दुर्बीण लावून फिरत होतो, पण, मला कही ऊसतोड मजुराचे कार्यालय सापडले नाही. शेवटी ऊसतोड मजुरांचे ते महामंडळही रद्द केले. औरंगाबादला स्वर्गीय मुंडेसाहेबांचे स्मारक करणार म्हणून सांगितले. सरकारने जमीन घेतली, पण स्मारक कुठे झाले नाही. स्मारक छत्रपती शिवाजी महाराजांचे झाले नाही. स्मारक परमपूजनीय डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे झाले नाही.





या सगळ्या गोष्टींच्या अपमानाचा राग आपल्या मनात नाही. आणि जर हा राग मनात असेल, तर माझी हात जोडून कळकळीची विनंती आहे. अरे, विधानसभेला माझ्यासारखा एक व्यक्ती पराभूत झाला. पराभूत झाल्यानंतर 15 दिवसांत माझ्यासारख्या एक सर्वसामान्य कार्यकर्त्याला पवारसाहेबांनी राज्याचे विरोधी पक्षनेतेपद दिले. आज तुम्ही ज्या माझ्या नावाच्या घोषणा देताय, आज तुम्ही जे मला आगे बढो म्हणताय, आज मला महाराष्ट्रात सामान्य माणसाच्या प्रश्नावर जो आवाज उठवता आला, त्याला कारण फक्त आदरणीय साहेबांनी मला विरोधी पक्षनेते पदाची जबाबदारी दिली. आणि त्या संधीचे सोने सामान्य माणसांचे प्रश्न सोडविण्यासाठी केले.

आज माझी कळकळीची विनंती आहे की, काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस आणि मित्र पक्षांच्या प्रचाराच्या जाहीर सभा घेतायेत, 20 तारखेला नांदेडची सभा झाली. आज आपल्याकडे बीड लोकसभा मतदारसंघाची सभा होत आहे. मी अनेक सभा पाहिल्या, पण आजची ही सभा ऐतिहासिक एवढी मोठी आहे, की मी तर परळीत एवढी मोठी सभा कधी पाहिली नाही.

काल मी मुख्यमंत्र्यांचाही दौरा पाहिला. ते नांदेडला गेले. तेथे बूथ प्रमुखांच्या मेळाव्यात त्यांनी आमच्या नेत्यांवर टीका केली. आदरणीय भुजबळसाहेबांवर टीका केली. ते म्हणाले, लक्षात ठेवा, तुम्ही जामिनावर आहात. देवेंद्र फडणवीस साहेब, भले तुम्ही राज्याचे मुख्यमंत्री असाल, पण राज्याचे मुख्यमंत्री म्हणून आमच्या नेत्याला जर धमकी देण्याचे काम कराल, तर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी कधीही स्वस्थ बसणार नाही. जशाच तसे उत्तर देण्याची धमक आमच्यात आहे. तुम्ही ज्या राष्ट्रीय नेत्याचे नाव घेता, ते राष्ट्रीय अध्यक्षही जामिनावर आहेत. आधी त्या 16 मंत्र्यांची चौकशी करा. अगोदरच क्लीन चीट देताय. आपला म्हणजे बाळा आणि दुसऱ्याचं म्हणजे कारटं. हे चालणार नाही. म्हणून राज्याचे मुख्यमंत्री असतील, किंवा राष्ट्रवादी काँग्रेसच समारोप करणार म्हणून आमच्या बहिणबाई बोलल्या. कुठल्या तरी सभेत. माझ्या बहिणबाईला सांगायचे आहे, अगं बाई, राष्ट्रवादी काँग्रेस संपवणे चिक्की खाण्याएवढं सोप्प आहे का. ते भल्याभल्यांना जमले नाही. अरे समारोप कोणाचा. मागच्या निवडणुकीत कोणाचा केला माहिती नाही. या परळीत जिल्हा परिषद निवडणुकीत सहाच्या सहा जिल्हा परिषद सदस्य राष्ट्रवादी काँग्रेसचे आहेत की नाहीत. मग समारोप कोणाचा झाला. नगरपालिका निवडणुकीत 33 पैकी 27 नगरसेवक आणि नगराध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे निवडून दिला. समारोप कोणाचा केला. भले परळीत केला. पण कोणाचा केला. आणि तुम्ही समारोपाची भाषा करताय. अरे, हिंमतच असेल, तर येणाऱ्या लोकसभेच्या निवडणुकीत आणि येणाऱ्या विधानसभेच्या निवडणुकीत फक्त समोरासमोर या, मग कोण संपतय, हे आपण एकदा पाहूया.

आजच्या या परिवर्तनाच्या जाहीर सभेत माझी आपल्याला कळकळीची विनंती आहे, या परिवर्तनाच्या सभेनिमित्त आम्ही सगळे बीड जिल्ह्यातील राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आपल्याकडे आशीर्वाद मागतोय की, या वेळेस चुकायचे नाही. कसल्याही परिस्थितीत आपल्या पक्षाचा खासदार आपल्याला पवारसाहेबांच्या खांद्याला खांदा लावून लोकसभेत पाठवायचा आहे. एवढीच कळकळीची विनंती करतो.

# हुतात्म्यांच्या चितेवर राजकीय पोळी भाजण्याचा भाजपचा डाव



## नवाब मलिक यांचा आरोप

आजची ही सभा परळीच्या भूमीत ऐतिहासिक सभा आहे. आणि गेली दोन दिवस झाले, आपण बातमी बघतो की, राज्याच्या महिला व बालविकासमंत्री सांगतात की, राष्ट्रवादी काँग्रेसची समारोप सभा येथे होत असताना आम्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा समारोप करणार. मुख्यमंत्री महोदय आल्यानंतर ते पुन्हा बोलले, की ही समारोप सभा कुठंतरी पक्षाचा समारोप करणारी असेल. देवेंद्रजी तुमची गुप्तचर यंत्रणा येथे असेल, निर्धार परिवर्तनाचा यात्रेचा समारोप होत असेल, पण परिवर्तनाची सुरवात बीडमधून होते. तुमच्या लोकांना सांगा, ही गर्दी सांगते की, परिवर्तन अटल आहे.

काल येथे मुख्यमंत्री आले आणि येताना एका चित्रपट अभिनेत्याला घेऊन आले. भाजप संपूर्ण देशात राष्ट्रवादाच्या घोषणा देत आहे. राष्ट्रभक्तीच्या प्रमाणपत्रांचे वाटप करण्याचे काम करत आहे. ज्या अभिनेत्याला घेऊन राष्ट्रवाद दाखवत आहे, तो अक्षय कुमार कॅनडाचा नागरिक आहे. त्याच्याकडे देशभक्तीचे गुणगान करण्याचा अधिकारी नाही. भाजपला काय भारतीय नागरिक मिळत नाही. भाजप कॅनडाच्या नागरिकाच्या माध्यमातून देशात प्रचार करण्याचे काम करत आहे.

आता अशा बातम्या येत आहेत की, मोहन भागवतांनी सांगितले की, आता निवडणुकांचा मुद्दा राम मंदिर नसणार आहे. मुद्दा आता आतंकवादाचा असणार आहे, हे आता संघ परिवाराने जाहीर केले आहे. भागवतजी आम्ही याचे स्वागत करतो की, आपण आतंकवादाचा मुद्दा करा आणि देशात आतंकवादावर चर्चा करण्याचे काम सुरू करा. 14 फेब्रुवारीला पुलवामाची घटना झाली, 3 वाजून 10 मिनिटांनी. अर्ध्या तासात देशभरातील टीव्हीवर याच्या बातम्या येऊ लागल्या. एका तासात बातमी आली की, 40 जवान शहीद झालेत. सगळ्या देशात 3 वाजून 10 मिनिटांनी बातमी कळाली तर आम्ही विचारतो की, देशाचे पंतप्रधान उत्तराखंडच्या जीम कॉर्बेट जंगलात साडेसहा वाजेपर्यंत काय करत होते. याचे उत्तर पंतप्रधानांना द्यावे लागणार आहे. 6 वाजून 10 मिनिटांनी त्यांनी दूरध्वनीच्या माध्यमातून उत्तराखंडच्या एका रॅलीमध्ये भाषण दिले. आणि तेथेही त्यांनी पुलवामा हल्ल्याचा काही उल्लेख केला नाही. मतं मागण्याचे काम केले, पण शहीदांना श्रद्धांजली देण्याचे काम केले नाही. 3 वाजून 10 मिनिटांपासून 6 वाजून 10 मिनिटांपर्यंत पंतप्रधान काय करत होते, मित्रांनो, प्रधानमंत्री नॅशनल जिऑग्राफिक टेलिव्हिजनच्या शूटिंगमध्ये व्यस्त होते. पूर्ण देशात रोष असताना प्रधानमंत्री आपल्या शूटिंगमध्ये व्यस्त होते. भागवतजी, आम्ही स्वागत करतो की, तीन तास पंतप्रधान काय करत होते. जर पुलवामात हल्ला झाला, तर पंतप्रधानांची जबाबदारी होती. कॅबिनेट आणि काऊन्सिलची बैठक त्याच क्षणाला बोलवायला हवी होती. पण, पंतप्रधानांनी त्या रात्री बैठक बोलवली नाही, तर दुसऱ्या दिवशी सकाळी बैठक बोलावली. भाजपने पत्रकार परिषद घेऊन सांगितले की, आम्ही सगळे कार्यक्रम रद्द केले आहेत. 15 तारखेला मोदींनी जाऊन वंदे मातरम रेल्वेला हिरवा झेंडा दाखवत होते. झेंडा दाखवण्याला आमचा कोणताच आक्षेप नाही. पण झेंडा दाखविण्यापूर्वी खळखळून हसत हात दाखविण्याचे काम पंतप्रधान करत होते, हे देशातील जनतेने पाहिले. आणि भाजप पत्रकार परिषदेत सांगत आहे की, आम्ही कार्यक्रम रद्द केले आहेत. उत्तरप्रदेशातील इटारशी, झांशीमध्ये 15 तारखेला पाच वाजता जाऊन पंतप्रधान

आशीर्वादाच्या रूपाने मतं मागण्याचे काम करत होते.

देशावर अतिरेकी हल्ला झाला. सर्व विरोधी पक्षांची बैठक बोलवली. आदरणीय पवारसाहेब आमच्या वतीने गेले. देशातील सर्व पक्षांचे नेते गेले. लोकांना अपेक्षा होती की, पंतप्रधान त्या बैठकीला असतील. काही तरी ठोस निर्णय होईल. पण पंतप्रधान त्या बैठकीला बसले नाहीत. ते यवतमाळला आले. आणि येथे येऊन मत मागत बसले. भागवतजी, तुम्ही पुलवामाचा मुद्दा करा, आम्ही प्रश्न विचारण्याचे काम देशाच्या पंतप्रधानांकडे करू. देश दुःखात आहे. मोदीचे म्हणतात की, मला दुःख आहे. पण, ह्रदय जळत असताना चेहऱ्यावर हसू असत नाही. आणि ह्रदय जळत असताना चेहऱ्यावर हसू आहे, हे सत्य देशातील जनतेला माहिती आहे.

जेव्हापासून भाजपची सत्ता आली, तेव्हापासून पाकिस्तानच्या सीमेवर गोळीबार व्हायला लागले. तीन पट जास्त झाले आहे. मोदी सरकारच्या काळात जवान शहीद होण्याचे प्रमाण दोन पटीने वाढले आहे. 300 किलोचे बाँब बनविण्याचे सामान घेऊन गाडी आत आली. प्रश्न केला जातोय की, तिथे तपासणी करण्याचे काम का केले नाही. म्हणतात की, मेहबूबा मुफ्तीच्या सरकारने निर्णय घेऊन तिथले चेक पोस्ट हटवले होते. आपण राज्यपाल शासन तिथे लावले, त्याला चार महिने झाले. आपण काही नाही चेकिंग केले, हा प्रश्न आम्ही आपल्याला विचारतोय.

जर कोणी पाच किलो मटण घेऊन घरी जात असेल तर भाजप व आरएसएसचा कार्यकर्ता त्या मारण्याचे काम करतो. पण 300 किलो स्फोटके घेऊन गेला, पण त्यांना नाही पकडले. मोदींच्या हातात देशाच्या सुरक्षेचे तीनतेरा झाले आहेत. देशात एक वेगळीच परिस्थिती निर्माण झाली आहे. म्हणतात की, काश्मीरची समस्या फार जुनी आहे. अमित शहा म्हणतात की, ही नेहरूंपासूनची समस्या आहे. पण, तुमचेच मंत्री सांगतात की, 2005 पासून 2012 पर्यंत शांती होती. हे तुमचेच मंत्री सांगतात. सेनेचा प्रमुख असलेला मंत्रीच सांगतोय की, काश्मीरमध्ये शांतता होती. पण भाजपने पीडीपी सोबत सत्ता स्थापन करून काश्मीरमध्ये अशांतता निर्माण करण्याचे काम भाजपने केले आहे.

आम्ही आतंकावादाला मुद्दा करू इच्छित नाही. हुतात्म्यांच्या साह्याने आम्ही आमची उंची वाढवू इच्छित नाही. आम्ही जवानांच्या चितेवर राजकीय पोळी भाजू इच्छित नाही. पण भाजपची इच्छा आहे की, पुलवामाचा राजकीय मुद्दा करावा आणि फायदा उठवावा. मित्रांनो, मी आपल्याला आवाहन करतो की, जे लोक जवानांच्या चितेवर राजकीय पोळी भाजू इच्छितात, त्यांना मोठं उत्तर देण्याचे काम करावे लागणार आहे.

देशात परिस्थिती वेगळी आहे. पवारसाहेबांसारखे नेतृत्व आपल्याकडे आहे. गेल्या 20 वर्षांपासून पक्ष महाराष्ट्राच्या मातीत काम करत आहे. पण, आम्ही परिवर्तन यात्रेच्या माध्यमातून येथे आले आहोत. कारण, महाराष्ट्रात सगळ्यात पहिले परिवर्तन बीडमधून करायचे आहे. धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण बीड जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अशा पद्धतीने काम करत आहे, एक मोठी लाट तुम्ही या ठिकाणी निर्माण केली. हे महाराष्ट्राच्या मातीतून एक संदेश देऊ इच्छित आहे की, परिवर्तन तर देशात होणारच, महाराष्ट्रातही होणार, तर त्याची सुरवात बीडच्या मातीतून होणार. त्यासाठी तुम्हाला मोठ्या ताकदीने उतरावे लागणार. एक चांगला उमेदवार निश्चितपणे तुम्हाला दिला जाणार आहे. पण, तुम्ही ज्या ताकदीने या परळीच्या मातीत एकत्र येण्याचे काम केले आहे, त्याच पद्धतीने ज्या वेळी निवडणूक जाहीर होईल, त्यावेळी ताकदीने उभे रहा. काँग्रेस- राष्ट्रवादी काँग्रेसने एकत्र निवडणूक लढविण्याचे ठरवले आहे. जोगेंद्र कवाडे पण आपल्यासोबत आहेत. समविचारी पक्षांनी आम्ही सोबत घेऊ इच्छितो. आंबेडकरी विचारधारेची लोकं आपल्या सोबत आहेत. जे लोकं धर्माच्या नावावर राजकारण करतात, त्यांच्या विरोधात आम्ही एक संघटन तयार करणार आहे. आमचं राजकारण जातीवर नसणार, तर ते गरीब, मजूर, शेतकरी, यांच्या लढाईसाठी असेल.

भाजप वेगवेगळे मुद्दे तयार करत आहे. मागच्या वेळेस आठवत असेल की, काय होती घोषणा. बहोत हो गई महागाई की मार, अब की बार मोदी सरकार. चर्चा असते की महागाई वाढली. तर ते म्हणतात की, आकडा बघा, महागाई वाढली नाही. पण केंद्राने महागाई भत्ता नऊ वरून बारा टक्के केला. आपण म्हणता की, महागाई वाढली नाही. पण, आपण महागाई भत्ता वाढवून शिक्कामोर्तब केले आहे की, महागाई वाढली आहे.

आम्ही लढाई लढायला तयार आहोत, शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर. आम्ही लढाई लढायला तयार आहोत, युवकांच्या प्रश्नांवर. मोदींनी आश्वासन दिले होते की, तुम्ही आम्हाला सत्ता द्या, आम्ही दरवर्षी दोन कोटी रोजगार देऊ. भाजपची लोकं म्हणतात की, आम्ही रोजगार देण्याचे काम केले आहे. 15 कोटी लोकांना मुद्रा लोन दिले आहे. टीव्हीवर जाहिरात येते की, 15 कोटी लोकांना मुद्रा लोन मिळाले. भाजपचा प्रवक्ता म्हणतो की, 12 कोटी लोकांना मुद्रा लोन मिळाले. पण, मोदींना संसदेत सांगितले की, 4 कोटी लोकांना मुद्रा लोन मिळाले. मोदींनी खोटे उघड करण्याचे काम निश्चितपणाने केलेले आहे. आज एवढी लाखोची गर्दी येथे आहे. जर कोणाला मुद्रा लोन भेटले असेल तर हात वरती करा. ज्याप्रमाणे ते 15 कोटी मुद्रा लोनची गोष्ट करतात, त्यानुसार 60 कोटी लोकांना मुद्रा लोनचा फायदा झाला आहे. एका कुटुंबात 4 लोक आहेत, 18 वर्षांपेक्षा मोठी, म्हणजे यांनी 60 कोटी मतदारांपर्यंत मुद्रा लोन पोचवले आहे. जर देशात मतदारांची संख्या 70 कोटी आहे, जर तुम्ही 60 कोटी लोकांना मुद्रा लोन दिले आहे, तर तुम्ही देशातील प्रत्येक तीनपैकी दोन लोकांना मुद्रा लोन देण्याचे काम केले आहे. सरकारचे एकच काम आहे, खोटे आकडे पसरवा. बेरोजगारीची समस्या मोठी आहे. सर्व्हेनुसार बेरोजगारी मोठ्या प्रमाणावर पोचली आहे.



**सारांश ? पुलवामा घडले. त्याच्या प्रत्युत्तरासाठी बालाकोट घडले. त्यानंतर हवाई हल्ल्याचा प्रकार, भारतीय वैमानिकाला पाकिस्तानकडून अटक व सुटका ! पुन्हा परिस्थिती 'जैसे थे' ! पाकिस्तानचा गोळीबार, बॉंबफेक व जम्मू-काश्मीरमधील घुसखोरी, दहशतवादी कारवाया सर्व काही नेहमीप्रमाणे चालू ! मग पुढे काय ? पुढे एवढेच की या वातावरणाचा राजकीय लाभ उठविण्याचा प्रयत्न पंतप्रधानांनी सुरु केला आहे आणि लोकसभेच्या निवडणुका या मुद्याच्या आधारेच लढविल्या जाणार हेही स्पष्ट झाले आहे.**



# पुलवामा... बालाकोट... पुढे? जैसे थे?

आकाश नवी दिल्ली

# पूर्वार्ध

काश्मीरमधील (दक्षिण काश्मीर)पुलवामा येथे सीआरपीएफ जवानांच्या काफिल्यावर आत्मघातकी हल्ला होऊन त्यात जवळपास चाळीस जवानांचा मृत्यु झाला.14 फेब्रुवारीला हा हल्ला झाला होता. पाकिस्तानस्थित जैश ए मुहम्मद या दहशतवादी संघटनेने या हल्ल्याची जबाबदारी स्वीकारली होती. हल्ल्याच्या घटनेने व 40 जवानांच्या मृत्युमुळे देशभरात संतापाची लाट उसळली. सर्वसामान्य नागरिकांमध्ये या घटनेने उद्विग्नता येणे स्वाभाविक होते. परंतु या लोकांच्या संतप्त भावनेचा फायदा.... खरे तर गैरफायदा विशिष्ट अशा राजकीय शक्तींनी लोकांच्या भावना आणखी भडकविण्याचे काम सुरु केले. या हल्ल्यातील हल्लेखोर हा एक वाट चुकलेला काश्मिरी तरुण होता. निरपराध असूनही सुरक्षा दलांकडून झालेल्या छळामुळे तो दहशतवादाच्या मार्गाला लागलेला होता. तो धागा पकडून विशिष्ट अशा विचारसरणीच्या राजकीय पक्ष आणि संघटनांनी देशात काश्मीर व काश्मिरी लोकांच्या विरोधी वातावरण तापविण्याचा प्रयत्न केला. मेघालयाचे राज्यपाल तथागत रॉय यांनी एका निवेदनाद्वारे काश्मिरी लोकांवर आणि त्यांच्या वस्तुंवर बहिष्कार करण्याचे आवाहन केले. रा.स्व.संघ आणि भाजपच्या संस्कारात रॉय वाढलेले आहेत. राज्यपाल होण्यापूर्वी ते पश्चिम बंगाल भाजपचे अध्यक्ष होते. यानंतर काश्मीरला विशेष दर्जा देणारे कलम 370 व 35(अ) रद्द करण्याच्या मागण्याही पुढे येणे स्वाभाविकच होते. हे प्रक्षोभक वातावरण तयार करण्याचा आणखीही एक दुर्दैवी पैलू आहे. काश्मीर हे मुस्लिम बहुसंख्यक राज्य आहे. त्यामुळे काश्मिरी लोकांना बहिष्कृत करण्याची मागणी करणे म्हणजे त्या आडून मुस्लिम समाजालाही एकंदरीत बदनाम करण्याचा डावही खेळला जाणे हे ओघाने आलेच. याच्याच जोडीला पाकिस्तानविरुध्द कारवाई करण्याच्या मागणीला जोर चढणेही



स्वाभाविकच होते. परंतु यापूर्वीच्या सर्जिकल स्ट्राईकची बेसमुर प्रसिध्दी

राष्ट्रवादी स्वाभिमानी आचार! राष्ट्रवादी विचार !!












केल्याने त्या स्वरुपाच्या कारवाईतील धक्कातंत्राचा जो भाग असतो तो नाहीसा झालेला होता. या हल्ल्याची जबाबदारी जैश ए मुहम्मदने घेतल्याबरोबर पाकिस्तानने त्यांच्या सेनेला अतिदक्षतेचे आदेश देऊन ठेवले होते. त्यामुळे जमीनीवरुन किंवा सेनेच्या माध्यमातून पूर्वीप्रमाणेच सर्जिकल स्ट्राईकची कल्पना प्रत्यक्षात आणणे अशक्य होते. एका बाजुला भक्त मंडळींचा कारवाईसाठी दबाव वाढत होता आणि मग सरकारला जोखीम पत्करावी लागली.

## उत्तरार्ध

26 फेब्रुवारी 2019.

पुलवामा घटनेला बारा दिवस उलटून गेले होते. सरकारकडे कारवाईचे पर्याय मर्यादित असल्याची चर्चा सुरु झालेली होती. एकप्रकारे टीकाही सुरु झाली होती. 25 आणि 26 फेब्रुवारीच्या रात्री किंवा पहाटे तीन - साडेतीनच्या सुमारास ग्वाल्हेरच्या हवाईतळावरुन अंबाला हवाईतळावर आणून ठेवलेल्या बारा मिराज विमानांनी हवेत झेप घेतली. 25 व 26च्या रात्रीची ही मोहिम हाती घेण्यापूर्वी म्हणजेच आधीच्या तीन-चार दिवसांपासून उत्तर सीमेवरील हवाई तळावरुन दिवस-रात्र हवाईदलाची विमाने जोरदारपणे हवेत झेपावत होती आणि परतत होती. यामध्ये अत्याधुनिक सुखोई-30, मिग-23, मिराज 2000 या विमानांचा समावेश होता. यामुळे सीमेवरील सर्व गावांमध्ये काहीसे भीतीचे वातावरण तयार झाले होते. भारतीय हवाईदलातर्फे सुरु असलेल्या या हालचाली पाकिस्तानच्या नजरेत आल्याखेरीज राहणेच शक्य नव्हते. त्यामुळे त्यांनीही सेनेला व हवाईदलाला सुसज्जतेचे आदेश दिले. या हालचालींमुळे भारतातर्फे बहुधा पूंच किंवा त्या भागात कुठेतरी कारवाई केली जाते की काय अशी शंका पाकिस्तानला निर्माण होणे स्वाभाविक होते. 26 तारखेच्या पहाटे मिराज विमाने झेपावण्यापूर्वी देखील भारतीय हवाई दलाची दोन सुकोई-30 विमाने, इल्युशिन 76 हवेतल्या हवेत इंधन भरु शकणारी महाकाय दोन विमाने, हवेतल्याहवेत शत्रुच्या हालचालींचा मागोवा ठेवणारी 'अॅवॅक्स' विमाने हवेत झेपावली होती. ही विमाने भारतीय हद्दीतच

संचार करीत होती. बारा मिराज विमानांनी नकळतपणे आपला मार्ग व दिशा बदलून पाकव्याप्त काश्मीरच्या भागाकडे आपला मोर्चा वळविला. पाकव्याप्त काश्मीरचा भाग ओलांडून ही विमाने अफगाणिस्तानला लागून असलेला प्रांत खैबर पख्तुनख्वाच्या हद्दीत प्रवेश करती झाली. पाकव्याप्त काश्मीर आणि खैबर पख्तुनख्वा प्रांताच्या सीमेवरच मानसेहरा जिल्हा आहे व सीमेवरच बालाकोट नावाचे गाव आहे. मिराज विमानांचे टार्गेट होते हे बालाकोट गाव. या गावाचा परिसर डोंगराळ आहे. लहानलहान टेकड्यांचा हा परिसर आहे आणि त्यातील एका टेकडीवर सहा एकर परिसरात जैश ए मुहम्मदचे ठाणे वसलेले होते. जैश संघटनेचे हे प्रमुख प्रशिक्षण केंद्र मानले जाते. येथे दहशतवाद्यांसाठी निवासाची व प्रशिक्षणाची अत्याधुनिक सोय आहे. शस्त्रास्त्रे व इतरही सर्व प्रकारचे प्रशिक्षण दहशतवाद्यांना दिले जाते. एकावेळी सुमारे तीनशे ते चारशे दहशतवादी येथे प्रशिक्षणासाठी जमत असतात. मिराज विमानांचे लक्ष्य हे केंद्र होते. तेथे पोहोचताच विमानांनी रात्रीच्या अंधारातच लेसर किरणांच्या मदतीने अचूक लक्ष्यवेध करणारी क्षेपणास्त्रे या तळावर डागली. तळ उद्ध्वस्त झाल्याचे

भारतीय हद्दीत प्रवेश केला आणि व्यूहरचनेप्रमाणे ही विमाने वेगवेगळ्या हवाईतळांकडे रवाना झाली. यामुळे शत्रुला पाठलाग करण्यात अडचणी येतात.

पहाटे साडेतीन ते चारच्या दरम्यान ही कारवाई करण्यात आली. पुलवामा आत्मघातकी हल्ल्यानंतर पाकिस्तानी हद्दीत घुसून उरीप्रमाणेच हल्ला करण्याची भारतीय सेनादलांची तयारी होती परंतु उरीच्या हल्ल्यानंतर यावेळी पाकिस्तानने कमालीची सावधगिरी आणि सुसज्जता बाळगली असल्याने पायदळ म्हणजेच लष्करातर्फे मोहिम करण्याबाबत सरकारी पातळीवर अनुकूलता नव्हती. हवाईदलाने पाकिस्तानातील विविध दहशतवादी प्रशिक्षण केंद्रांची जमविलेली माहिती सादर करुन ते यापैकी काही केंद्रे उद्ध्वस्त करु शकतात असे सांगितले. या मुद्यावर झालेल्या सल्लामसलतीत बालाकोट दहशतवादी शिबिरावर हल्ला करण्याचे निश्चित झाले. एकतर हा तळ गावापासून बाजुला व टेकडीवर होता. कुन्हार नदीच्या तीरावर वसलेले हे गाव डोंगराळ आहे. 2005 मध्ये झालेल्या तीव्र भूकंपात हे गाव जमीनदोस्त झाले. येथून गावकऱ्यांनी चक्क स्थलांतर केले.





निदर्शनास येताच ही विमाने परतीच्या मार्गाला लागली. नियंत्रण रेषा म्हणजेच भारत-पाकिस्तान दरम्यानच्या वर्तमान सीमेरेषेपासून बालाकोट सुमारे ऐंशी किलोमीटर अंतरावर आहे. त्यामुळे या स्थानापर्यंत पोहोचण्यास भारतीय विमानांना काही मिनिटेच लागली आणि एका पाठोपाठ सुमारे एक हजार वजनाचे बॉंब टाकून भारतीय लढाऊ विमाने आपल्या हद्दीत सुखरूप पोहोचली. या विमानांनी बॉंबवर्षाव करेपर्यंत पाकिस्तानी हवाईदलास फारसा सुगावा लागला नसल्याचे आता स्पष्ट झाले आहे. कारण भारतीय विमानांची अचूक बॉम्बफेक काही मिनिटातच आटोपली आणि ही विमाने परतीचा मार्ग पकडत असतानाच पाकिस्तानी लढाऊ विमाने हवेत झेपावली. परंतु भारतीय विमानांनी काही मिनिटातच

त्यांच्यासाठी काही अंतरावर 'न्यू बालाकोट' म्हणून गाव वसविण्यात आले आहे. त्यामुळे या दहशतवादी शिबिरावर हल्ला केला तरी निरपराध नागरिकांची जीवितहानि होणार नाही हे लक्षात आल्यानंतरच बालाकोटची निवड करण्यात आली होती. मिळालेल्या माहितीनुसार या प्रशिक्षण शिबिरात सुमारे अडीचशे ते तीनशे दहशतवादी उपस्थित होते. या शिबिराचा प्रमुख उस्ताद घोरी उर्फ युसुफ अजहर हा मौलाना मसूद अजहरचा मेव्हणा असल्याची माहिती मिळाली होती. अशी सर्व अनुकूल माहिती मिळाल्यानंतरच हवाईदलाने अचूक हल्ला चढविला. मात्र या हल्ल्यात किती दहशतवादी मारले गेले याची अधिकृत माहिती सरकारतर्फे अद्याप देण्यात आलेली नाही. पाकिस्तानने या

हल्ल्यात कसलीही मालमत्ता किंवा जीवित हानि झाली नसल्याचा दावा केला. भारताने मात्र जीवित हानि मोठ्या प्रमाणात झाल्याचा दावा केला. भारताने आपल्या दाव्याच्या समर्थनार्थ अद्याप पुरावे सादर केलेले नाहीत. पाकिस्तानने मात्र हल्ल्याच्या स्थानावर पाकिस्तानातील परदेशी पत्रकारांना विशेषतः रॉयटर्स, बीबीसी व सीएनएनच्या प्रतिनिधींना बालाकोटला भेट देण्याची परवानगी दिली आणि त्यांनी दिलेल्या बातम्यांनुसार दहशतवाद्यांचे नुकसान झालेले असले तरी त्याची व्याप्ती मोठी नसल्याचे म्हटलेले आहे.

या हल्ल्यानंतर पाकिस्तान गप्प राहणे अशक्यच होते. त्यानुसार दुसऱ्याच दिवशी म्हणजे 27 फेब्रुवारीला पाकिस्तानी हवाई दलाने भारतीय हवाईहद्दीत घुसण्याचा प्रयत्न केला. प्रत्युत्तरादाखल भारतीय लढाऊ विमानेही हवेत झेपावली. यावेळी झालेल्या हवाई झटापटीत पाकिस्तानचे एक एफ-16 विमान पाडण्यात भारतीय विमानांना यश मिळाले. परंतु भारताचे एक मिग-21 विमानही पडले. विमान पडण्यापूर्वी वैमानिकाने पॅराशूटच्या साह्याने विमानाबाहेर उडी मारली होती. वाऱ्याची दिशा पाकिस्तानी सीमेच्या दिशेने असल्याने तो पाकिस्तानी हद्दीत गेला.

होताच बालाकोट हवाईहल्ल्यावर देशभरात सुरु करण्यात आलेला जल्लोष ओसरुन त्याची जागा चिंतेने घेण्यास प्रारंभ झाला. लोकांना पुढे काय वाढून ठेवले आहे याची काळजी भेडसावू लागली आणि युध्द होते की काय अशी धास्ती लोकांना वाटू लागली. मात्र तोपर्यंत अमेरिका आणि अन्य मोठ्या देशांनी दोन्ही देशांच्या नेतृत्वाशी संपर्क साधून संघर्ष टाळण्याचा सल्ला दिला होता. पाकिस्तानी लष्कराने त्यांना संघर्ष वाढविण्याची इच्छा नसल्याचे जाहीर केले होते. त्या पाठोपाठ पंतप्रधान इम्रानखान यांनी पाकिस्तानी संसदेच्या संयुक्त बैठकीत बोलताना संघर्षाची व्याप्ती न वाढविण्याचे जाहीर केले. त्यासाठी पुलवामा हल्ल्यात जैश ए मुहम्मदचा हात असल्याचे पुरावे भारताने द्यावेत व त्याआधारे चौकशी करण्याची तसेच दहशतवादासह सर्व मुद्यांवर भारताबरोबर बोलणी करण्याची तयारी दाखवली. तोपर्यंत भारताने पकडलेल्या वैमानिकाला अपाय न करता भारताच्या ताब्यात देण्याची मागणी केली. जिनिव्हा करारानुसार त्याची पाठवणी करावी याकडे भारताने पाकिस्तानचे लक्ष वेधले. पकडलेल्या वैमानिकाच्या बदली पाकिस्तान आणखी काही कुरापत काढणार की काय अशी







तेथे उतरल्यानंतर प्रथम त्याला पाकिस्तानी गावकऱ्यांनी पकडले. थोडीफार मारहाण केली. त्यानंतर पाकिस्तानी लष्कराचे सैनिक तेथे आले आणि त्यांनी त्यास ताब्यात घेतले. त्याचे नाव अभिनंदन वर्धमान असल्याचे निष्पन्न झाले. या वैमानिकाबाबतही भारताने माहिती देताना बराच लपंडाव खेळला. प्रथम भारताचा वैमानिक बेपत्ता असल्याचे सांगितले. परंतु तोपर्यंत पाकिस्तानने पकडलेल्या भारतीय वैमानिकाची माहिती जाहीर करुन टाकलेली होती व त्याचे फोटोही प्रसारमाध्यमांवर टाकले होते. त्यानंतर भारत सरकारने भारतीय वैमानिक पाकिस्तानच्या ताब्यात असल्याचे मान्य करण्यास सुरुवात केली व मागाहून त्याचे नावही जाहीर केले.

भारतीय वैमानिक पाकिस्तानने पकडल्याचे सार्वजनिक शंका भारताला येणे स्वाभाविक होते. परंतु स्वतः इम्रानखान यांनी वैमानिक अभिनंदन यांची त्वरित सुटका करुन भारताच्या ताब्यात देण्याचे जाहीर करुन काहीसे अनपेक्षित पाऊल उचलले. थोडक्यात पाकिस्तानला संघर्ष न वाढविता भारताबरोबर बोलणी करण्याची इच्छा असल्याचे त्यांनी दाखवून दिले. राजनैतिक आणि मुत्सद्देगिरीच्या पातळीवर पाकिस्तानने अंशतः बाजी मारली होती. त्यामुळे भारतालाही काही प्रमाणात बचावाच्या पवित्र्यात यावे लागले होते. वैमानिकाच्या सुटकेनंतर भारताला तक्रारीला जागा उरली नव्हती आणि तोपर्यंत युध्दाची खुमखुमी आणि उन्मादही खालावलेला होता. वैमानिक अभिनंदनच्या सुटकेपर्यंतचा घटनाक्रम झाल्यानंतर पुढे काय ? जणू काही सर्व काही आलबेल झाल्याचे

समजून भारत सरकार आता पूर्ववत झाले आहे. पाकिस्तानतर्फे पूंच, राजौरी या भागातील सीमेवर शस्त्रबंदी उल्लंघन चालूच आहे. उखळी तोफा, क्षेपणास्त्रांचा मारा सुरुच आहे. काश्मीर खोऱ्यातील कुपवाडा, हंडवारा, बारामुल्ला आणि इतरत्रही दहशतवाद्यांचे हल्ले सुरु आहेत. त्यांच्या हल्ल्यात भारतीय सुरक्षा दलांचे जवान पूर्वीप्रमाणेच शहीद होत आहेत. निरपराध नागरिक मारले जात आहेत. त्यामुळेच पुढे काय हा प्रश्न भलेमोठे प्रश्नचिन्ह घेऊन उभा आहे. या प्रश्नाचेच उत्तर शोधण्याचा प्रयत्न करावा लागेल.

भारतीय हवाईदलाने बालाकोट मोहिम केल्यानंतर त्याची सार्वत्रिक चर्चा होणे अपेक्षितच होते. यापैकी एका चर्चेत माजी हवाईदल प्रमुख एअरचीफ मार्शल अनिल टिपणीस यांनी एक अत्यंत अर्थपूर्ण अशी टिप्पणी केली. युध्दशास्त्रात प्रत्येक हल्ल्याचे एक मूल्य किंवा किंमत(व्हॅल्यु ऑफ अ‍ॅटॅक) असते. म्हणजे त्या हल्ल्याची फलनिष्पत्ती काय, तिचे प्रमाण, तिची व्याप्ती याच्या मोजमापनावर त्या हल्ल्याचे मूल्य ठरते. भारतीय हवाईदलाने बालाकोट येथील जैश ए मुहम्मदच्या दहशतवादी केंद्रावर हल्ला केला हे सत्य असले तरी त्या हल्ल्याने भारताचा कोणता हेतु साध्य झाला किंवा त्याची फलनिष्पत्ती काय हा एक मोठा प्रश्न अद्याप अनुत्तरित आहे. पाकिस्तानला या हल्ल्यामुळे फार मोठा धडा मिळाला आणि पाकिस्तानने आता आपल्या सर्व कारवाया थांबवल्या आहेत अशी कोणतीही चिन्हे आढळून येत नाहीत. मग या हल्ल्यांचे प्रयोजन काय आणि या हल्ल्यांनी काय साधले ?





भारताचे वर्तमान नायक किंवा ब्रह्मांडनायक यांना अशा सनसनाटी गोष्टी करण्याची सवय लागलेली आहे. मग नोटबंदी असो की उरीचा सर्जिकल स्ट्राईक असो ! आपण काहीतरी चमकदार गोष्टी करु शकतो हे दाखविण्याचा अट्टाहास आणि त्या आधारावर राजकीय फायदा (खरंतर गैरफायदा) उपटणे असल्या तद्दन सवंग, हलक्या दर्ज्याच्या गोष्टी करण्यात ते पटाईत आहेत. बालाकोट मधील हल्ल्यांनंतर पुढे काय या प्रश्नाचे उत्तर त्यांच्याकडे नाही. उलट याचा आधार घेऊन त्यांनी काश्मीर खोऱ्यात अंदाधुंद कारभाराला सुरुवात केली आहे. ताज्या निर्णयानुसार त्यांनी काश्मीरच्या स्वायत्ततेची भाषा करणाऱ्या किंवा काश्मीर भारतापासून वेगळे करण्याची भूमिका घेणाऱ्या हुरियत कॉन्फरन्स म्हणजेच त्यात सामील विविध स्थानिक राजकीय पक्ष व संघटनांच्या नेत्यांना अटक केली आहे. त्यांना दिलेली सुरक्षा काढून घेतलेली आहे आणि आता हुरियतमधील एक प्रमुख पक्ष जमाते इस्लामीवर बंदी घातली आहे. काश्मीर खोऱ्याचा ताबा जवळपास सुरक्षा दलांकडे दिल्यासारखीची स्थिती आहे. काश्मीरमधून मिळत असलेल्या माहितीनुसार या परिस्थितीमुळे तेथील प्रमुख असा पर्यटन व्यवसाय संपुष्टात आल्यासारखा आहे. त्यामुळे त्यावर अवलंबुन बहुसंख्य सह-व्यवसाय व व्यावसायिकही आर्थिक संकटात सापडले आहे. राज्यकारभार पूर्णपणे थंडावलेला आहे. मध्यंतरी यासंदर्भात झालेल्या एका परिसंवादात एका शाळकरी काश्मिरी मुलीने सांगितले की काश्मीरमधील शाळाच कित्येक महिने बंद पडून आहेत.

कधीतरी एखाददोन दिवसांसाठी वर्ग चालतात की पुन्हा बंद होतात. सरकार नावाची कोणती गोष्टच शिल्लक नाही. याच मुलीने सांगितले की तिच्या वडिलांना ऑफिसात कामच नसते. ते दोन तास काम करुन घरी परत येतात. थोडक्यात काश्मीरमध्ये शिक्षण, नोकरी-व्यवसाय व राज्यकारभार संपुष्टात आलेला आहे. अशा परिस्थितीत तेथील लोकांना उपजीविका किंवा उदरनिर्वाहाचे साधन काय असा प्रश्न आहे. युवक शिकूनही

त्यांना काश्मीरमध्ये तर नोकरी मिळणे अशक्य आहे कारण तेथे नोकऱ्याच नाहीत अशी स्थिती आहे. काश्मीरबाहेरच्या राज्यात त्यांना काश्मिरी म्हणून कुणी नोकरी देत नाहीत. या अवस्थेत काश्मिरी तरुणांनी करायचे काय ? त्यांचे प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न कुणी करीत नाही आणि त्यातून हे तरुण दहशतवादाकडे वळल्यास ते आश्चर्यकारक नाही. माजी परराष्ट्र सचिव आणि राष्ट्रीय सुरक्षा परिषदेचे माजी सदस्य श्याम सरन यांनी काश्मीरमधील घडामोडी म्हणजे केंद्र सरकारतर्फे सुरु असलेला आगीशी खेळ आहे अशा शब्दात या समस्येचे वर्णन केले आहे. काश्मिरी लोक, त्यांचे प्रतिनिधी, संस्था व संघटना यांच्याबरोबर संवाद साधूनच या समस्येवर तोडगा काढावा लागेल असे त्यांचे मत आहे. अन्यथा केंद्र सरकारतर्फे




सध्या ज्या मार्गांचा किंवा उपाययोजनांचा काश्मीरमध्ये अवलंब केला जात आहे त्यातून काश्मिरी लोकांच्या मनातील भारताबद्दलची परात्मतेची किंवा टोकाच्या परकेपणाची भावना निर्माण होत आहे असे मत त्यांनी व्यक्त केले आहे. काश्मीरचा प्रश्न किंवा समस्या ही राजकीय स्वरुपाची आहे आणि ती राजकीय सल्लामसलत व विचारविनिमयानेच सोडविण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले आहे. पंजाबमध्ये ज्यावेळी दहशतवादी कारवाया आणि फुटीर चळवळ सुरु झाली होती त्यावेळी एक वरिष्ठ पोलिस अधिकारी एस.एस.विर्क यांनी फार सूत्ररुपाने या समस्येचे स्वरुप उलगडून दाखविले होते. एखादी चळवळ राजकीय स्वरुपात सुरु होते तेव्हा ती चळवळ असफल किंवा अयशस्वी करण्यासाठी कोणतीही राजसत्ता कायदा व सुव्यवस्थेच्या यंत्रणेमार्फत त्या चळवळीचा मुकाबला करु पहात असते. ही नेहमी घडणारी चूक आहे आणि कोणतेही सरकार ही चूक प्रथम करीत असते. परंतु सुरक्षा दले व पोलिस यंत्रणांच्या जोरावर ही चळवळ दडपण्याचे प्रयत्न सुरु झाल्यावर ती चळवळ हिंसक होते आणि त्याचे दुष्परिणाम वाढू लागतात आणि यातून ही चळवळ जेव्हा खऱ्या अर्थाने कायदा व सुरक्षेला धोकादायक होऊ लागते तेव्हा सरकारी पातळीवर त्यावर राजकीय तोडगा काढण्याची भाषा बोलली जाऊ लागते. थोडक्यात आपल्या सत्तेचा वापर करुन चळवळ किंवा एखाद्या मुद्यावरील व्यापक जनभावना आणि जनआंदोलन दडपण्यातून प्रतिक्रिया तयार होते आणि मग उग्रवादी स्वरुप धारण होऊ लागते. काश्मीरमध्ये हाच प्रकार सुरु आहे. काश्मीरमध्ये तर सरकार राजकीय संवाद साधण्यासही तयार नसल्याचे चित्र आहे आणि त्यामुळेच तेथील परिस्थिती दिवसेंदिवस हाताबाहेर जाऊ लागली आहे.

सारांश ? पुलवामा घडले. त्याच्या प्रत्युत्तरासाठी बालाकोट घडले. त्यानंतर हवाई हल्ल्याचा प्रकार, भारतीय वैमानिकाला पाकिस्तानकडून अटक व सुटका ! पुन्हा परिस्थिती 'जैसे थे' ! पाकिस्तानचा गोळीबार, बाँबफेक व जम्मू-काश्मीरमधील घुसखोरी, दहशतवादी कारवाया सर्व काही नेहमीप्रमाणे चालू ! मग पुढे काय ? पुढे एवढेच की या वातावरणाचा राजकीय लाभ उठविण्याचा प्रयत्न पंतप्रधानांनी सुरु केला आहे आणि लोकसभेच्या निवडणुका या मुद्याच्या आधारेच लढविल्या जाणार हेही स्पष्ट झाले आहे.

वैमानिक अभिनंदन परत भारतात आला त्या दिवशीच पाकिस्तानी सैन्याने सीमेपलीकडून पूंच भागात केलेल्या गोळीबार व तोफांच्या माऱ्यात दोन लहान बाळे व त्यांची आई मृत्युमुखी पडले ! त्यांच्यासाठी या देशाच्या पंतप्रधानाकडे वेळ नाही कारण राजकीय भांडवल करण्याइतके त्यांचे मृत्यु उपयोगी नाहीत ! हे जळजळीत वास्तव मतदारांना कळेल तो सुदिन!

## घंटाकर्ण, नवी दिल्ली
## चव्हाटा

# राज्यपाल देत आहेत डोकेदुखी ?

जम्मू-काश्मीरच्या राज्यपालपदी राजकीय व्यक्तीची नेमणूक करणे, त्यातही भाजपमध्ये असलेल्या नेत्याकडे जबाबदारी दिली म्हणजे सर्व 'आलबेल' होईल अशी ब्रह्मांडनायकांची समजूत होती. त्यात त्यांचे 'जेम्स बाँड' उर्फ 'रासुस' हेच काश्मीर हाताळत असल्याने ते काहीसे बिनधास्त होते. पण राज्यपाल पडले अस्सल आणि मुरलेले राजकारणी ! चौधरी चरणसिंग, विश्वनाथ प्रतापसिंग यांच्यासारख्यांच्या सन्निध्यात राजकारणाचे धडे गिरवत त्यांनी विविध राजकीय पक्षांचे पाणी पीत पीत भाजपमध्ये प्रवेश केलेला होता हे ब्रह्मांडनायक विसरले असावेत. राज्यपालांची समाजवादी पार्श्वभूमि लक्षात घेऊन त्यांना प्रथम बिहारचे राज्यपाल केले आणि तेथून थेट जम्मू-काश्मीरसारख्या अतिशय संवेदनशील राज्यात पाठवणी केली. राज्यपाल नामधारीच असल्याने त्यांच्या भोवतीच्या अधिकाऱ्यांकरवीच सर्व कारभार चालविला जात आहे. उदा. राज्याचे मुख्य सचिव सुब्रह्मणियन हे थेट 'पीएमओ' म्हणजे पंतप्रधान कार्यालयाच्या संपर्कात असतात आणि त्यांच्याकडूनच आदेश घेत असतात व राज्यपालांना केवळ सूचित केले जाते. सुरक्षाविषयक सल्लागार के.विजयकुमार हे तर थेट राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार ए.के.दोभाल यांच्या संपर्कात असतात. राज्यपालांची एवढी नाकेबंदी केल्यानंतर ते फारशी गडबड करणार नाहीत या अपेक्षेने दिल्लीतली मंडळी बिनधास्त राहू लागली. पण राज्यपाल पडले मुरब्बी राजकारणी ! त्यांनी राजकीय विधाने करुन सत्तापक्षाला अडचणीत आणण्यास सुरुवात केल्याने भाजप तसेच भाजपमध्ये जम्मू-काश्मीरची जबाबदारी असलेली मंडळी चांगलीच






राष्ट्रवादी स्वाभिमानी आचार! राष्ट्रवादी विचार !!



खवळली आणि राज्यपालांना 'आवरा' असे त्यांना त्यांच्याच सरकारला सांगण्याची वेळ आली. पुलवामामध्ये सीआरपीएफ जवानांच्या काफिल्यावर हल्ला झाला व त्यात 40 जवान मृत्युमुखी पडल्यावर राज्यपालांनी एकाचवेळी एवढ्या मोठ्या काफिल्यास परवानगी कुणी दिली असा सवाल उपस्थित केला. हा पहिला धक्का! त्यानंतर राज्यपालांनी काफिल्याच्या सुरक्षिततेबाबत प्रश्न उपस्थित करुन दुसरा दणका दिला. सरतेशेवटी त्यांनी 'इंटेलिजन्स फेल्युअर' म्हणजेच हल्ल्याबाबत गुप्तचर विभागाला माहिती मिळविण्यात अपयश आल्याची कबुली त्यांच्यातर्फेच देऊन कळस गाठला. खुद्द राज्यपालांनीच गोपनीय माहिती मिळविण्यात अपयश आल्याने हल्ला रोखणे शक्य झाले नसल्याचे म्हटल्यावर विरोधी पक्षांना आयते खाद्यच मिळाले. आता अशा अतिसंवेदनशील गोष्टींमध्ये राज्यपालांनी सरकारला चांगलेच अडचणीत आणल्याने केंद्र सरकारने कपाळाला हात मारला आहे. त्यांची बदली केली जाणार काय एवढेच आता बघायचे आहे. आणि विशेष म्हणजे राज्यपाल महोदयांनी त्यांना काश्मीरमधून बदलले जाऊ शकते असे भाकितही करुन ठेवल्याने तर सरकारची आणखीनच विचित्र स्थिती झाली आहे. जय हो !

## संरक्षण मंत्रालयाची सुट्टी ?

बालाकोट येथील जैश ए मुहम्मदचा दहशतवादी तळ नष्ट करण्याची मोहिम भारतीय हवाईदलाने फत्ते केली. पहाटे चार वाजेपर्यंत सर्व काही आटोपले होते. 27 फेब्रुवारीला सकाळी नऊ वाजताच पंतप्रधानांनी त्यांच्या निवासस्थानी केंद्रीय मंत्रिमंडळाच्या सुरक्षाविषयक समितीची बैठक बोलावली. या बैठकीला पंतप्रधनाखेरीज संरक्षणमंत्री निर्मला सीतारामन, गृहमंत्री राजनाथसिंग, परराष्ट्रमंत्री सुषमा स्वराज, अर्थमंत्री अरुण जेटली हे समितीचे सदस्यमंत्रीगण हजर होते. उच्चपदस्थ अधिकाऱ्यांमध्ये राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार ए.के.दोभाल, परराष्ट्रसचिव विजय गोखले, गुप्तचर विभागांचे प्रमुख इ. हजर होते. आश्चर्याची बाब म्हणजे ज्या खात्याशी ही बाब निगडित होती तिचे सचिव





म्हणजेच संरक्षणसचिव संजय मित्रा मात्र गैरहजर होते अशी माहिती समजली. यावेळच्या मोहिमेचे वैशिष्ट्य म्हणजे सुरुवातीपासूनच संरक्षण मंत्रालयास काहीसे दूर ठेवण्यात आले.

या मोहिमेची माहिती देण्याची जबाबदारी आश्चर्यकारकपणे परराष्ट्र मंत्रालयाकडे देण्यात आली. परराष्ट्रसचिवांनी पत्रकार परिषद घेऊन एक संक्षिप्त निवेदन वाचून दाखविले आणि या घटनेची माहिती दिली. दुसऱ्या दिवशीही पाकिस्तानी विमानांनी केलेल्या हल्ल्याच्या प्रयत्नाच्या संदर्भातही परराष्ट्र मंत्रालयातच परराष्ट्र प्रवक्त्यांनी निवेदनाद्वारे माहिती दिली. यावेळी हवाईदलाचे उपप्रमुख एअर व्हाइस मार्शल आरजीके कपूर त्यांच्याबरोबर आले होते परंतु परराष्ट्र मंत्रालय प्रवक्ते रवीशकुमार यांनी निवेदन वाचून दाखविल्यानंतर प्रश्नांना मज्जाव केला व कपूर यांना नुसते मूकपणे बसावे लागले.

हा प्रकार सेनादलांना आणि संरक्षण मंत्रालयाला बहुधा










पचनी पडला नसावा. त्यामुळे तिसऱ्या दिवशी मात्र तिन्ही सेनादलांच्या प्रतिनिधींनी पत्रकारांना घडामोडींची माहिती दिली. पाकिस्तानी विमानांनी डागलेल्या क्षेपणास्त्राचे तुकडेही दाखवले. परंतु ही पत्रकार परिषद इतक्या वाईट पध्दतीने आयोजित करण्यात आली होती की पत्रकारांनी त्याबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली.

प्रथम संरक्षण मंत्रालयाच्या परिषदेच्या सभागारात नेहमीप्रमाणे पत्रकार परिषद आयोजित करण्यात येईल असे जाहीर करण्यात आले होते. पत्रकार तेथे पोहोचल्यावर वेळ बदलली कारण तोपर्यंत पाकिस्तानने भारतीय वैमानिकाची सुटका करण्याची घोषणा केलेली होती. मग घाईघाईने पत्रकारांना संरक्षण मंत्रालयाच्या बाहेर चक्क रस्त्यावर जमण्यास सांगण्यात आले. तेथे तिन्ही सेनादलाच्या प्रतिनिधींनी आळीपाळीने माहिती दिली आणि काही प्रश्नही घेतले व त्यांना उत्तरे दिली. भारतीय बाजुने माहिती देण्याबाबत आखडता हात होता तर पाकिस्तानच्या तिन्ही सेनादलांचे संयुक्त प्रवक्ते मात्र तिकडे इस्लामाबादमध्ये पत्रकारांना भेटत होते, त्यांच्या प्रश्नांना मुक्तपणे उत्तरे देत होते. त्यामुळे भारतीय विमान पडणे, पाकिस्तानने एफ-16 विमान वापरल्याची माहिती, भारतीय वैमानिकाचे पकडले जाणे, त्याचे नाव, फोटो ही सर्व माहिती भारतीय पत्रकारांना पाकिस्तानकडून आधी मिळत होती. भारताकडून मात्र माहितीसाठी विलंब होत राहिला. बहुधा पहिल्या उरी सर्जिकल स्ट्राईकच्या वेळी लष्कराच्या प्रवक्त्यांनी काहीशा मुक्तपणे माहिती देऊन काहीसा गोंधळ निर्माण झाला होता व त्याची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी यावेळी ही खबरदारी घेण्यात आली असावी.



# प्रसिध्दीच्या हव्यासापोटी अर्धवटपणाही!

एखाद्याला प्रसिध्दीचा किती हव्यास असावा ? विष्णुअवतारी ब्रह्मांडनायकांचा हात तर याबाबत कुणीच धरु शकणार नाही ! लोकसभेच्या निवडणुका येऊ घातल्याने त्यांनी उद्‌घाटनांचा सपाटा लावला आहे. यामध्ये काही अर्धवट पूर्ण झालेल्या कामांचाही समावेश आहे. तुम्हाला आठवतंय ? उत्तर प्रदेशातल्या कैराना मतदारसंघात काही दिवसांपूर्वी पोटनिवडणूक झाली होती. दिल्ली-मेरठ द्रुतगति मार्ग येथून जातो. या मार्गाचे काम सुरु आहे. परंतु केवळ या पोटनिवडणुकीत भाजपला मदत व्हावी म्हणून या ब्रह्मांडनायकांनी अर्धवट म्हणजे केवळ सात किलोमीटर लांबीच्या पूर्ण झालेल्या रस्त्याचे उद्‌घाटन केले. त्यासाठी भर उन्हाळ्यात लोकांना दुपारच्या कडक उन्हात उभे केले आणि हे महाशय त्यांच्या मोटारीच्या खिडकीतून बाहेर हात काढून लोकांना टा टा करत या रस्त्यावरुन यात्रा करत होते. आता अगदी ताजे उदाहरण ! दिल्लीच्या इंडिया गेट सभोवतीची मोकळी जागा व हिरवळ बहुधा ब्रह्मांडनायकांच्या नजरेला खुपली असावी. त्या जागी युध्दस्मारक उभारण्याचा घाट त्यांनी घातला. खरंतर भारत हा एक शांतिप्रिय देश असताना आणि इंडिया गेटपाशी अमर जवान ज्योति स्मारक असताना युध्दस्मारकाची आवश्यकता नव्हती. परंतु सुमार बुध्दीच्या लोकांना विनाकारण मर्दुमकी दाखवायची खुमखुमी असते. त्यामुळे या मोकळ्या जागेत युध्दस्मारक उभारण्याचे काम सुरु झाले. परंतु एवढे मोठे स्मारक लोकसभा निवडणुकीपूर्वी पूर्ण होणे शक्य नव्हते. मग, त्याचे श्रेय कसे घेता येणार? मग काय, जे काम पूर्ण झाले आहे त्याचेच उद्‌घाटन करण्याचा समारंभ करण्यात आला. अद्याप या ठिकाणी स्मारकाभोवतालच्या जमीनीचे सपाटीकरण आणि अन्य अनेक कामे सुरुच आहेत. पण अट्टाहास ! आता यातून आणकी एक नवा वाद निर्माण झाला. भारतीय सेनादलांचे सर्वोच्च प्रमुख(सुप्रीम कमांडर) हे देशाचे राष्ट्रपति असतात. त्यांना या समारंभात कुठेही स्थान देण्यात आले नव्हते. खरं तर हा राजशिष्टाचाराचाही भंगच आहे. परंतु स्वनामधन्यतेची नशा एवढी स्वार आहे की असल्या 'किरकोळ' गोष्टींकडे लक्ष देण्याचा त्या साहेबांना वेळही नाही. सर्व 'शो' ब्रह्मांडनायकांसाठी होता. यातून स्वतःची जेवढी प्रसिध्दी करता येईल तेवढी त्यांनी करुन घेतली. आणखी एक किस्सा.

संसदेच्या सेंट्रल हॉलमध्ये माजी पंतप्रधान अटलबिहारी





वाजपेयी यांचे तैलचित्र लावण्यात आले. मोठा समारंभ करुन तैलचित्राचे अनावरण करण्यात आले. परंतु दुसऱ्या दिवशी तैलचित्र गायब ! चौकशी करता असे कळले की अनावरण समारंभासाठी घाईघाईत चित्र कसेबसे पूर्ण करण्यात आले होते. परंतु त्यावरुन अंतिम हात फिरविण्याचे काम बाकी राहिले होते. त्यासाठी ते चित्र आता पुन्हा चित्रकाराकडे पाठविण्यात आले आहे. ते आता पुन्हा ठीकठाक होऊन आले की लावण्यात येईल! ब्रह्मांडनायक त्यांच्या भाषणात फुशारकी मारत असतात की आम्ही जी कामे हाती घेतो ती पूर्ण करतो ! त्यात बदल करुन म्हटले पाहिजे, 'आम्ही कामे हाती घेतो आणि पूर्ण होण्यापूर्वीच अर्धवट असतानाच त्याचे उद्‌घाटन करुन लोकांची फसवणूक करतो'!

खरोखर अर्धवट कामांची उद्‌घाटने करीत फिरणारे असे ब्रह्मांडनायक गेल्या सत्तर वर्षात झाले नाहीत ! ही लोकांची शुध्द फसवणूक तर आहेच पण स्वतःला प्रसिध्दी मिळावी यासाठीची पिपासा देखील आहे !

## डॉक्टरसाहेब पुन्हा सक्रिय ?

माजी पंतप्रधान मनमोहनसिंग यांना काँग्रेसवर्तुळात 'डॉक्टरसाब' म्हणून संबोधले जाते. युपीएचे सरकार गेल्यानंतरचे दोन-तीन वर्ष ते सार्वजनिक समारंभात क्वचितच दिसत असत. परंतु गेल्या वर्षभरात ते चांगलेच सक्रिय झालेले आढळतात. त्यांचे वैशिष्ट्य म्हणजे राज्यसभेत ते अतिशय नियमितपणे येतात. संसदेत बसून असतात. अलीकडच्या काळात त्यांनी काही मुद्यांवर संसदेत हस्तक्षेपही केलेला होता. परंतु सार्वजनिक कार्यक्रमातही ते गेल्या वर्ष-दीड वर्षांपासून सक्रिय झाल्याचे आढळून येऊ लागले आहे. आतापर्यंत त्यांनी दिल्लीत अनेक प्रमुख लेखकांच्या पुस्तकांच्या प्रकाशन समारंभात भाग घेतलेला आहे. काही पुस्तकांचे प्रकाशनही त्यांच्या हस्ते झाले पण एखाद्या पुस्तक प्रकाशन समारंभाला ते प्रेक्षक म्हणूनही हजर राहिलेले आढळतात. याखेरीज डॉक्टरसाहेब पंजाबच्याही बऱ्याच वाऱ्या करु लागले आहेत. पंजाब विद्यापीठातून त्यांनी त्यांच्या शैक्षणिक कारकिर्दीला सुरुवात केली होती. त्यामुळे तेथील निमंत्रणही ते चुकवत नाहीत. अमृतसरलाही सुवर्णमंदिराला त्यांनी अलीकडे काही भेटी दिल्या. या त्यांच्या सर्व सक्रियतेचे कारण काय ? डॉक्टरसाहेबांच्या



राज्यसभा सदस्यत्वाची मुदत जूनमध्ये संपत आहे. ते आसामहून राज्यसभेवर निवडून आले आहेत. आता आसाममधून राज्यसभेवर कुणाला पाठविण्याइतके संख्याबळ काँग्रेसकडे विधानसभेत नाही. त्यामुळे डॉक्टरसाहेबांच्या संसदीय भवितव्याबद्दल प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. काहीजण त्यांना मध्य प्रदेश, राजस्थान किंवा छत्तीसगड मधून किंवा कर्नाटकातूनही निवडून आणण्याचे प्रस्ताव करीत आहेत. परंतु आता लगेचच या राज्यांमध्ये ही राज्यसभा





निवडणुकांचा कार्यक्रम नाही. आता काँग्रेसमधीलच काहीजण असे सुचवीत आहेत की मनमोहनसिंग यांना अमृतसर लोकसभा मतदारसंघातून उभे करावे.

कॅप्टन अमरिंदरसिंगही त्यासाठी अनुकूल असल्याचे सांगितले जाते. त्याचप्रमाणे निवडणुकीनंतर खरोखरच त्रिशंकू लोकसभा अस्तित्वात आली तर मग विरोधी पक्षांतर्फे पुन्हा डॉक्टरसाहेबांना सर्वसंमत पंतप्रधानपदाचे उमेदवार म्हणून पसंती मिळू शकेल अशी एक अटकळही बांधली जाते. बहुधा त्यामुळेच डॉक्टरसाहेबांच्या मनातही पुन्हा आशा पल्लवीत झाल्या असाव्यात व ते पुन्हा सार्वजनिक जीवनात सक्रिय झाले असावेत !

डॉक्टरसाहेबांनी आतापर्यंत फक्त एकदाच लोकसभेची निवडणूक लढवली होती. 1996 मध्ये दक्षिण दिल्लीतून. पण यात ते पराभूत झाले होते. पुन्हा त्यांनी लोकसभेची निवडणूक लढवली नाही व ते आसाममधून राज्यसभेवर निवडून आले. आता पंजाबमध्ये काँग्रेसचे सरकार आहे आणि माजी पंतप्रधान या नात्याने त्यांची चांगली प्रतिमाही आहे. त्यामुळे अमृतसरहून त्यांच्या नावाची चर्चा सुरु झाली असावी !

## बदलते पक्षीय घरोबे !!

लोकसभेच्या निवडणुका जवळ आल्या की पक्षापक्षांमधील असंतुष्ट मंडळी पक्षबदल करु लागतात. पूर्वी अशा राजकीय पुढाऱ्यांना 'आयाराम – गयाराम' म्हणून संबोधले जायचे. काँग्रेसचे दिवंगत नेते अर्जुनसिंग यांनी अशा नेत्यांना उद्देशुन 'मायग्रेटरी बर्ड' म्हणजे 'हवा व ऋतुमानाप्रमाणे स्थलांतर करणारे पक्षी' असे वर्णन केले होते. आता लोकसभा निवडणुकीचा हंगाम सुरु झाला आहे. त्यामुळे असे विविध पक्षांमधले 'राजकीय पक्षी' पक्षांतर करु लागले आहेत. नुकताच भाजपच्या विद्यमान खासदार सावित्रीबाई फुले यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. आता महाराष्ट्रातली मंडळी हे नाव ऐकून चकित होतीलच ! परंतु उत्तर प्रदेशातील बहराईच मतदारसंघातल्या या महिला व दलित



खासदार आहेत. त्या गेल्या दीड-दोन वर्षांपासून असंतुष्ट म्हणून ओळखल्या जातात. त्या उत्तर प्रदेशातील व दलित असल्याने बहुधा बहुजन समाज पक्ष किंवा फारतर समाजवादी पक्षात प्रवेश करतील असे मानले जात होते. परंतु त्यांनी उत्तर प्रदेशात फारसे राजकीय स्थान न राहिलेल्या काँग्रेस पक्षात प्रवेश करुन काहीसे चकितच केले. भाजपचे आणखी एक असंतुष्ट नेते व बिहारमधील दरभंगा येथून लोकसभेचे सदस्य असलेले माजी क्रिकेटपटु कीर्ति आझाद यांनीही





सावित्रीबाई फुले




उदित राज

नुकताच काँग्रेसमध्ये प्रवेश केला. कीर्ति आजाद यांचे वडिल भागवत झा आझाद हे काँग्रेसचे बिहारमधले एख वजनदार नेते होते. बिहारचे मुख्यमंत्री होते व केंद्रात देखील मंत्री होते. त्यामुळे कीर्ति आझाद यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश करताना त्यांना काँग्रेस पक्ष नवा नाही किंबहुना आपल्या मूळ कुटुंबात परतल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

नरसिंह राव यांच्या काळात केंद्रीय राज्यमंत्री असलेले आणि काहीकाळ भाजपमध्ये गेलेले उत्तर प्रदेशातील एक मागासवर्गीय नेते रामलाल राही हेही काँग्रेसमध्ये परतले आहेत. दिल्लीतील करोलबाग या राखीव मतदारसंघातून भाजपतर्फे लोकसभेवर निवडून आलेले दलित नेते उदितराज हेही भाजपमधील एक असंतुष्ट असून त्यांच्याही मनात बहिर्गमनाची आंदोलने चालू आहेत. ते कधी बाहेर पडतात त्याचीच प्रतीक्षा आहे !!



कीर्ती आझाद



रामलाल राही

# ममतादीदी आणि साबुदाणे वडे !

ममता बॅनर्जी या ‘फायरब्रँड’ नेत्या आहेत. पण त्यांच्या आवडीनिवडी फार साध्या आहेत. जाहीर सभेत भले त्या आक्रमक आणि जहाल नेत्या म्हणून वावरत असतील पण वैयक्तिक पातळीवर त्या अत्यंत मृदु आहेत. त्याचा अनुभव नुकताच आला. प्रेस क्लब ऑफ इंडिया हे दिल्लीच्या पत्रकारांचे हक्काचे स्थान आहे. कधीही याठिकाणी पाच-पन्नास पत्रकार जमलेले असतातच. ममतादीदींनाही या क्लबचे आकर्षण आहे. दिल्लीत येतात तेव्हा एखादी चक्कर त्या मारतातच !

अलीकडे विरोधी पक्षांच्या बैठकांसाठी त्यांचे येणे होतच असते. जंतरमंतरवर संयुक्त सभा झाली तेव्हा त्या आल्या असता त्यांनी एक दिवस अचानक निरोप पाठवला की मी प्रेस क्लबला येत आहे. त्यांचे येणे म्हणजे झपाटल्यासारखे असते.

प्रेस क्लबच्या व्यवस्थापनाने तातडीने त्यांच्यासाठी काही जुजबी सोयी सुविधा तयार केल्या. ममतादीदी आल्या. सुरुवातीला चहापानावर गप्पा झाल्या. त्यांना कडक टोस्ट आवडतात म्हणून चहाबरोबर टोस्ट दिले पण त्यांनी नवीन एखादा पदार्थ नाही का म्हणून विचारले. त्यावर प्रेस क्लबच्या अध्यक्षांनी त्यांना साबुदाणे वडे नव्याने सुरु करण्यात आल्याची माहिती दिली. त्यावर त्या एकदम खूष होऊन म्हणाल्या की त्यांना साबुदाणे वडे खूप आवडतात. कलकत्त्यात महाराष्ट्र भवन आहे तेथून मी साबुदाणे वडे मागवत असते आणि ते लोकही मला नेहमी पाठवत असतात. मग काय ? ममतादीदींना गरमागरम साबुदाणे वडे सादर करण्यात आले. त्यांनी एक वडा खाल्ला. मग म्हणाल्या, आता तर मी जास्त खाऊ शकणार नाही कारण पोट भरले आहे. मला चार वडे बांधून द्या! त्यावर एकच हंशा पिकला. ममतादीदी त्यावर म्हणाल्या मी एखादा गाडीतून जाताजाता देखील खाईन इतके मला ते आवडतात !

जाताजाता ममतादीदी म्हणाल्या की त्या जागो बांगला या पेपरमध्ये लिहितात व त्याही पत्रकारच आहेत. मलाही तुमच्या प्रेस क्लबचे सदस्य करा ! मग लगेचच त्यांना एक फॉर्म देण्यात आला व त्यावर त्यांनी सही करुन दिली. आता ममतादीदींना प्रेस क्लब ऑफ इंडियाच्या सन्माननीय सदस्य म्हणून सदस्यत्व देण्यात आले आहे ! आणखीही माहिती त्यांनी दिली. त्या म्हणाल्या की संसदसदस्य म्हणून मिळणारे पेन्शन किंवा मुख्यमंत्रीपदाचा पगार त्यांनी सामाजिक कामासाठी दिलेला आहे. त्यांनी लिहिलेली पुस्तके व त्यांची रॉयल्टी आणि पेंटिंग्ज विकून त्यांना वर्षाला सुमारे दहा बारा लाख रुपयांचे उत्पन्न होते व त्यातून त्या वैयक्तिक खर्च चालवतात. ममतादीदी आल्या, खूष होऊन परतल्या. पुन्हा त्यांच्या पुस्तकाचे प्रकाशन प्रेस क्लब येथे करण्याचे आश्वासन देऊन त्या गेल्या!



Best

Compliments

**नांदेड जिल्हा परिषदेचे आणि नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे पहिले अध्यक्ष, माजी राज्य मंत्री, पद्मश्री शामराव कदम यांच्या पुर्णाकृती पुतळ्याचे अनावरण नुकतेच माजी केंदीय कृषी मंत्री व राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष श्री. शरद पवार यांच्या हस्ते झाले. या वेळी पवार साहेबांनी पद्मश्रींच्या जुन्या आठवणी जागवून त्यांच्या कार्याचा उचित गौरव केला. तसेच, माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनीही पद्मश्रींचा आदर्श ठेवून काम करण्याचे आवाहन केले.**



एका कर्तृत्ववान माणसाच्या पुतळ्याच्या अनावरणाच्या निमित्ताने आपण सगळेजण एकत्र आलो आहोत. शामरावजी कदम यांच्या दुसऱ्या पुतळ्याच्या अनावरणासाठी मी नांदेडमध्ये येत आहे. मला आठवतेय 5-7 वर्षांपूर्वी निमगावला मी कमलबाबू व इतरांच्या आग्रहास्तव आलो होतो आणि तिथे शामरावजींचा पूर्णाकृती पुतळा उभा केला. आजच्या या पुतळ्याचे थोडेसे वेगळे स्वरूप आहे. ज्या क्षेत्रात व ज्या संस्थेसाठी शामरावांनी काम केले, ज्या संस्थेच्या स्थापनेपासून उभारणीपर्यंत शामरावांचे योगदान होते, अशा संस्थेच्या प्रांगणात त्यांचा पुतळा उभारला जातोय, त्याबद्दल बँकेचे संचालक मंडळ व अध्यक्षांना मी धन्यवाद देतो.

ज्यांनी कर्तृत्व दाखवले व ज्यांचे ऋण आपणा सगळ्यांच्यावर आहे आणि ज्यांचा आदर्श घेऊन आपण ही संस्था चालवली तर, ही संस्था उर्जितावस्थेत आल्याशिवाय राहणार नाही, अशा महान व्यक्तीचा पुतळा आपण या ठिकाणी बसवला, त्यांचा आदर्श आपण कायम ठेवला पाहिजे.

महाराष्ट्रात विशेषत: द्विभाषक झाल्यानंतर मराठी भाषकांचे राज्य एकत्र आले, मध्य भारतात असलेला विदर्भ हा महाराष्ट्राचा हिस्सा झाला, हैदराबादच्या राजवटीचा भाग म्हणून ओळखला

# पाच राज्यांतील निकाल हे देशातील बदलत्या राजकीय हवेचे द्योतक

## शरद पवार यांचे उद्‌गार



जाणारा मराठवाडा हा महाराष्ट्रात आला आणि या ठिकाणी एक नवीन राज्य प्रस्थापित केले गेले व या नवीन प्रस्थापित राज्याचे नेतृत्व त्या काळात यशवंतराव चव्हाण यांनी केले आणि चव्हाण साहेबांचे एक वैशिष्ट्य होते, ते म्हणजे, सामान्य माणसांबद्दल आस्था असणाऱ्या लोकांना प्रोत्साहित करायचे, त्यांना संधी द्यायची, त्यांना अधिकार द्यायचा व त्यातून त्यांनी अनेक कर्तृत्वसंपन्न लोकांना प्रोत्साहित केले. त्या मालिकेत शामरावजींचा उल्लेख करावा लागेल.

त्या काळचा मराठवाडा हा महाराष्ट्रात आल्यानंतर, नेतृत्वाची एक नवीन फळी तयार झाली. त्याच्यामध्ये शंकरराव चव्हाण होते. महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळात ते आले. मला आठवतेय, त्यांच्याकडे पहिल्यांदा पाटबंधारे विभागाचे काम दिले गेले. त्या कामात त्यांनी महाराष्ट्राला एक वेगळी दिशा द्यायचा प्रयत्न केला आणि शेती संपन्न करण्यासाठी या सगळ्या क्षेत्राला अधिक गती द्यायची, हे सूत्र त्यांनी त्या काळात नजरेसमोर ठेवले होते. यशवंतराव चव्हाण साहेबांचे आणखी एक मोठे योगदान होते, ते म्हणजे, सत्तेचे विकेन्द्रीकरण करण्याचे सूत्र त्यांनी मांडले. त्यामधून पंचायत राज्य तयार झाले व पंचायत राज्यांमधून जिल्हा परिषदा

तयार झाल्या आणि जिल्हा परिषदा म्हणजे, महाराष्ट्रात नवीन नेतृत्व निर्माण करणारी शाळा होती, खाण होती, ही स्थिती निर्माण झाली होती. मला आठवतेय 1962 ला औरंगाबादला सखारामपंत पाटील हे जिल्हा परिषदेचे अध्यक्ष होते. 1962 च्या पहिल्याच जिल्हा परिषदेत नांदेडला ही जबाबदारी शामरावजींच्याकडे दिली गेली. त्यात त्यांची हीच भूमिका होती की, ग्रामीण भागाच्या विकासासाठी सत्तेचा वापर करायचा आणि ती करायची असेल तर, शंकरराव चव्हाण साहेब हे मंत्रिमंडळात आहेत, राज्यामध्ये, जिल्ह्यामध्ये त्याच विचारांने काम करण्याची आवश्यकता आहे आणि ही सगळी जबाबदारी शामरावांनी आपल्या खांद्यावर घेतली होती.

मला आठवतेय, मी त्या वेळेला काँग्रेस पक्षाचा एक लहानसा पदाधिकारी होतो आणि महाबळेश्वरला 'उद्याचे महाराष्ट्राचे धोरण काय असावे?' या वर शिबिर आयोजित केले होते. त्या वेळी चव्हाणांनी 'कृषी-औद्योगिक समाजाची मांडणी' ही राज्याची व देशाची गरज आहे, हे सूत्र मांडले. आणि त्या सभेत पहिल्यांदा मी शामरावजींचे भाषण ऐकले आणि शामरावजी कृषी-औद्योगिक समाजासाठी काय पावले टाकली पाहिजेत, हे चांगल्या रीतीने मांडत होते. आम्ही बघायला लागलो की, कोण हे गृहस्थ आहेत? आम्हाला माहिती नव्हती. आम्ही जेव्हा माहिती घेतली, त्या वेळी या सगळ्या क्षेत्रातले त्यांचे विचार काय आहे व त्यांचे योगदान काय आहे, हे कळले.

1960 साली शामरावजी महाराष्ट्राच्या विधान परिषदेचे सदस्य झाले. मला आठवतेय, 1962 साली महाराष्ट्र विधानसभेसाठी उमेदवारांच्या निवडीसाठी काँग्रेसची बैठक होती. माझ्याकडे महाराष्ट्रातल्या तरुणांचे नेतृत्व होते. त्या बैठकीला त्यांचा प्रतिनिधी म्हणून मीही हजर होतो. प्रथम नांदेड जिल्हा आला. नांदेड जिल्ह्याचे नाव आल्यावर उमेदवार म्हणून नाव आले ते शामरावजींचे! शामरावजींना यशवंतराव म्हणाले, "शामरावजी, महाराष्ट्राच्या निधिमंडळात तुम्ही पुन्हा यावे अशी पक्षाची इच्छा आहे." त्यावर शामरावजींनी सांगितले, "आत्ता मला विधानसभेत जाण्याची इच्छा नाही. तिथे शंकररावजी चव्हाण आहेत. मला जिल्ह्यात काम करण्याची संधी द्या. मी तर अशी व्यक्ती पाहिली नाही की, ज्याला तुला आमदार करतो असे सांगितल्यावर मला आमदारकी नको, मी जिल्हा परिषदेत, जिल्ह्यात काम करण्याची संधी द्या, असे म्हणत आहे. पण, ती व्यक्ती शामरावजी होते. त्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे, नांदेड जिल्ह्यातल्या खेड्यापाड्यातल्या लोकांच्या जीवनात बदल झाला पाहिजे, परिवर्तन झाले पाहिजे


शरद पवार बटन दाबून पद्मश्री शामराव कदम यांच्या पुतळ्याचे अनावरण करताना, शेजारी शिवाजीराव पाटील निलंगेकर, अशोक चव्हाण, धनंजय मुंडे, डॉ. सुनील कदम व इतर मान्यवर.




व त्यासाठी आपल्या ज्ञानाचा, अनुभवाचा उपयोग झाला पाहिजे, जिल्ह्यात त्याचा उपयोग झाला पाहिजे. शंकरराव चव्हाण तिकडे राज्यात आहेत, मी जिल्ह्यात काम केले पाहिजे, ही भूमिका त्यांनी मांडली. आणि महाराष्ट्रात जिल्हा परिषदांचा उगम जेव्हा झाला, तेव्हा नांदेड जिल्हा परिषदेच्या पहिल्या अध्यक्षपदाची जबाबदारी शामरावजींनी आपल्या खांद्यावर घेतली.

कधी कधी गंमत वाटते, अनेक महत्त्वाच्या पहिल्या जबाबदाऱ्या या जिल्ह्यात शामरावजींनी घेतल्या. नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, पहिले अध्यक्ष शामराव!, नांदेड जिल्हा परिषदेचे पहिले अध्यक्ष शामराव!, नांदेड जिल्ह्यात संघ आला. त्या संघाचे पहिले अध्यक्ष शामराव!, सहकारी साखर कारखाना काढण्याचा निर्णय झाला. त्याची जबाबदारी शामरावांनी आपल्या खांद्यावर घेतली. शारदा शिक्षण संस्था त्यांनी स्थापन केली आणि नव्या पिढीत ज्ञानाचा प्रसार झाला पाहिजे, ही भूमिका शामरावांनी मांडली. त्या संस्थेच्या उभारणीची सगळी जबाबदारी शामरावांनी घेतली. शंकररावांना अध्यक्ष केले व संस्थेच्या इतर कामाची जबाबदारी शामरावांनी घेतली. म्हणजे, या जिल्ह्याच्या विकासात योगदान देणाऱ्या ज्या ज्या संस्था आहेत, सगळ्या संस्थांच्या उभारणीत व त्याला दिशा देण्यामध्ये सगळ्यात महत्त्वाचे काम हे शामरावजींनी केले आहे.

म्हणून, ज्यांनी कर्तृत्व दाखवले, ज्यांनी असमान्य धैर्य दाखवले, अशांचे स्मरण अशा पुतळ्याच्यारूपाने आपण करत असतो, याचा मला मनापासून आनंद आहे.

शामराव व मी शंकरराव चव्हाण यांच्या मंत्रिमंडळात एकत्र होतो. ते राज्य मंत्री होते व मी शेती खात्याचा मंत्री होतो आणि मला आठवतेय, शंकरराव थोडे कडक स्वभावाचे होते. मंत्रिमंडळाच्या बैठकीत शामरावांच्या हातात पानाचा डबा असायचा व तो पानाचा डबा, कधी बोलायचे असेल तर, तोंडात पान टाकायचे. म्हणजे, त्यांच्याशी जास्त काही बोलायला नको. आणि चर्चा जरा गरम व्हायला लागली की, शामरावांना डबा पास करा म्हणून आम्ही खुणवायचो. पाठीमागून डबा आल्यावर पानाचा तोबरा भरला की, काम झाले. त्यामुळे त्या बैठकीत शामरावजींची उपस्थिती आम्हा लोकांना कायम लक्षात राहण्यासारखी होती.

पण, दुसरी गोष्ट त्यात सांगतो, राज्य सरकारच्या धोरणात्मक निकाल घेण्याच्यामध्ये एखादा विषय शेतकऱ्यांच्या हिताची जपणूक करणारा नाही, हे लक्षात येताच त्या वेळी शामराव आपले मौनव्रत एकदम सोडायचे आणि शंकरराव चव्हाणांनासुद्धा स्पष्टपणे सांगणारा मंत्रिमंडळातला एकमेव मंत्री म्हणजे शामराव होते. ते स्पष्टपणे सांगायचे, चव्हाण साहेब, हे करून चालणार नाही, इथे हे केले पाहिजे. आणि शंकररावांनीसुद्धा त्यांचा कायम सन्मान ठेवला आहे. त्यांची बांधिलकी ही लोकांच्यासाठी होती, शेतकऱ्यांसाठी होती, शिक्षणाच्या क्षेत्रातून नवीन पिढी तयार

करण्यासंबंधीची होती. म्हणून, अशा प्रकारचे ते एक आगळेवेगळे व्यक्तिमत्व होते. अशा व्यक्तींच्यामुळेच हे जिल्हे उभे राहिले. मराठवाडा प्रगतीच्या रस्त्याने येऊ शकला. ही गोष्ट आपण कायम लक्षात ठेवली पाहिजे.

दिवस बदललेत. आज आपल्यापुढे अनेक समस्या आहेत. शेतीच्या समस्या आहेत. शेतीमालाच्या किंमतीचा प्रश्न आहे. बेरोजगारीचा प्रश्न आहे. नव्या पिढीत अस्वस्थता आहे आणि या सगळ्यातून बाहेर निघायचे असेल तर, शामरावजींचा रस्ता हा विकासाचा रस्ता असून त्याच्याशी आपल्याला बांधिलकी ठेवावी लागेल.

सत्ता येते-जाते. या ठिकाणी आम्ही तीन माजी मुख्यमंत्री आहोत. होती आमच्याकडे सत्ता. कधी आली, कधी गेली. माझ्याबाबतीत तर, मी अनेकदा सत्तेत होतो, अनेकदा सत्तेत नव्हतो. सत्ता असो वा नसो, लोकांशी बांधिलकी असली, विचारात स्पष्टता असली की, आपण राज्यासाठी व देशासाठी कायम काम करू शकतो, याच्याबाबतीत माझ्या मनात कोणत्याही प्रकारची शंका नाही आणि आज या दृष्टीने पावले टाकायची गरज आहे.

देशावर संकटे आली. दोन दिवसांपूर्वी पुलवामा येथे जवानांच्यावर हल्ला झाला. 40-41 जवानांची त्या ठिकाणी शहीद झाले, जबरदस्त किंमत आपल्याला द्यावी लागली. अशा वेळेला आपण बाकीचे सर्व मतभेद सोडून, सैन्याच्या व देशाच्या पाठिशी एकत्रितरीत्या ठामपणे उभे राहण्याची आवश्यकता आहे आणि ती भूमिका आम्हाला केन्द्राने निमंत्रित केल्यावर आम्ही आमची





सगळी कामे सोडली व केंद्र सरकारच्या बैठकीला दिल्लीला हजर राहिलो. त्या ठिकाणी आम्ही ठराव केला, राजकारणात आमचे मतभेद होतील, निवडणुकीचे दिवस आहेत, संघर्ष होतील. पण, देशाच्या रक्षणासाठी स्वत:च्या प्राणांची आहुती देणाऱ्या जवानांच्या पाठिशी व जे जवान देशाच्या रक्षणाची खबरदारी घेत आहेत, त्यांच्यासाठी आज आम्ही मतभेद दूर ठेवून एकत्र आलो आहोत, सरकारच्या बरोबर आहोत, हे सूत्र आम्ही त्या ठिकाणी स्वीकारले व त्याबद्दलची भूमिका आम्ही एकमताने घेतली.

माझ्या मनात एकच अस्वस्थता होती. एवढे मोठे संकट आले. सर्वानी हजर राहायला हवे होते. अनेक लोक हजर नव्हते. राजकीय पक्ष सगळे हजर होते. पण, सत्ताधारी पक्ष त्या ठिकाणी हजर नव्हता. केंद्रीय गृह मंत्री त्या ठिकाणी हजर होते. ते देशाचे गृह मंत्री म्हणून होते, सत्ताधारी पक्षाचे प्रतिनिधी म्हणून नव्हते. म्हणून देशावर संकट आल्यावर सर्वांनी एकत्र आले पाहिजे.

काल आपण बघितले. शेजारच्या देशाच्या पंतप्रधानांनी काही वक्तव्ये केली. त्या वक्तव्याच्या माध्यमातून पुन्हा एकदा चिथावणी देण्याचे काम केले जात आहे का, अशी शंकेची शक्यता निर्माण झाली आणि हे जर चित्र असेल तर आपण एकजुटीची शक्ती दाखवावी लागेल. तिथे राजकारण आणायचे नाही, ही भूमिका घेऊन आज पुढची पावले टाकायची गरज आहे, याबाबत माझ्या मनात कोणतीही शंका नाही.

निवडणुका आल्या. निवडणुका येतील त्या वेळी जे बोलायचे ते आपण बोलू. ज्याच्याबद्दलचा उल्लेख केला, माझे सहकारी भास्करराव खतगावकर त्यांच्या भाषणात माझ्यावरच जास्त बोलले. त्यामुळे मला प्रश्न पडला, कोणाच्या पुतळ्याचे अनावरण आहे. माझी प्रकृती ठणठणीत आहे. अर्थात, त्यांच्या त्या माझ्याबद्दलच्या सद्भावना आहेत. त्याबद्दल माझे काही म्हणणे नाही. ते म्हणाले, पंतप्रधानांनी माझा काय उल्लेख केला? तुम्ही त्या पक्षाचे उपाध्यक्ष आहात. त्याच्याबद्दल मला काही म्हणायचे नाही. राजकारणात प्रत्येकाचा निर्णय असतो. तुम्ही तुमचा निर्णय घेतलेला आहे. त्यावर मला काही भाष्य करायचे नाही. त्यांनी माझ्याबद्दलच्या दोन गोष्टींचा उल्लेख केला. एक म्हणजे, मोदी साहेबांनी बारामतीत सांगितले की, मी शरद पवारांचे बोट धरून







राजकारणात आलो. त्यांनी सांगून टाकले. संसदेतही मी टीका करू लागताच बाकीचे सहकारी म्हणतात, अहो टीका कसली करता? तुमचेच बोट धरून ते राजकारणात आले आहेत. भास्कररावांनी दुसरी गोष्ट सांगितली, पंतप्रधान म्हणाले की, शरद पवारांना राजकारणाची हवा कळते. भास्कररावांनी सांगितलेली ही गोष्ट मात्र खरी आहे. राजकारणाची हवा मला कळते. भास्करराव त्या हवेची नोंद घ्यायची वेळ आलेली आहे. हवा बदलते, याच्याबद्दल माझ्या मनात शंका नाही. या हवेने सबंध देशाचेसुद्धा चित्र बदलू शकते. ही काही वावटळ नाही. ही हवा बदलतेय. जनमानसातले चित्र बदलतेय. लोकांच्या ज्या अपेक्षा असते, त्याच्या पूर्ततेची भावना त्यातून व्यक्त होत असते. त्याचा निर्णय अलिकडे काही राज्यांत झालेल्या निवडणूक निकालातून दिसून आला. मग ते राजस्थान असेल, मध्य प्रदेश असेल, उत्तराखंड असेल, तेथील निकाल हे बदलत्या हवेचे द्योतक आहे, असे मी म्हटल्यास त्यात अतिशयोक्ती होणार नाही. पण, तो काही विषय या ठिकाणी काढायचा नाही. एकच सांगतो, अशा सगळ्या काळामध्ये, बाकीचे काही मतभेद असले तरी, महाराष्ट्रात आपण काही गोष्टीसाठी आपण एकत्र येतो. आज हे व्यासपीठ बघा. या ठिकाणी वेगवेगळ्या राजकीय पक्षाचे लोक आले आहेत. एकमेकांच्याविरुद्ध निवडणुका लढणारे लोक आहेत. उद्याही लढतील. पण, ज्यांनी समाजासाठी कार्य केले, समाजाला दिशा देण्याचे काम केले, त्याच्याबद्दलचे ऋण व्यक्त करण्याची भावना ही महाराष्ट्राची परंपरा आहे आणि ती परंपरा विशेषत: मराठवाड्यात अधिक प्रमाणात दिसते. त्याचे कारण, वारकरी संप्रदाय व अन्य मार्गाद्वारे संस्कार पिढ्यापिढ्यांतून व्यक्त झाले आहेत. त्या संस्कारामधून वाढलेली जी पिढी आहे, सत्प्रवृत्तीचे समर्थन करणारी पिढी आहे, त्यामुळे आज या ठिकाणच्या व्यासपीठावरही शामरावजींच्याबद्दल आस्था व्यक्त करण्यासाठी ही सगळी मांदियाळी या ठिकाणी उपस्थित आहे. हे त्याचे द्योतक आहे, असे म्हटल्यास अतिशयोक्तीचे नाही.

आज शामरावजी नाहीत. त्यांच्या कुटुंबीयांनी हा आदर्श समोर ठेवलेला आहे. आम्ही बघतो, डॉ. सुनील कदम असतील, कमलबाबू असतील, त्यांच्या कुटुंबातील अन्य असतील, या सगळ्यांची दृष्टी विकासाला प्रोत्साहित करण्याची आहे. शेवटच्या माणसाच्या हिताची जपणूक करण्याची असते, त्याच पद्धतीने हा परिवार पुढे चाललेला आहे. त्याची उपयुक्तता आपल्यासाठी निश्चित असेल, अशी अपेक्षा व्यक्त करतो व आपणा सर्वांच्या साक्षीने या पुतळ्याचे अनावरण झाल्याचे जाहीर करतो.





# सहकार क्षेत्राला पवार साहेबांमुळे संजीवनी



**अशोक चव्हाण यांचे उद्‌गार**

कुठल्याही चांगल्या प्रसंगाला चांगलेच बोलावे लागते. इथे राजकारणात चढउतार होत असतात. राजकारणातील खरा मालक कोण असेल तर, ही जनता. ती ठरवते, राज्याचे नेतृत्व कोणी करायचे? जिल्ह्याचे कोणी करायचे? तालुक्याचे कोणी करायचे? शेवटची गोष्ट नशिबाचा भाग असतो. कोणाच्या नशिबात काय आहे, हे कोणाला सांगता येत नाही. मला वाटते, नशीब बुलंद असल्याने अनेकांना अनेक संध्या मिळाल्या. कोणाला कमी मिळाल्या, कोणाला जास्त. पण, मिळाल्या. पवार साहेबांच्या बाबतीत मला सांगायचेय, कोणाला मंत्री करायचे, कोणाला नाही, हा मुख्यमंत्र्यांच्या अधिकारातला विषय आहे. त्यामुळे मी या ठिकाणी पवार साहेबांचे जाहीर आभार मानतो की, त्यांच्यामुळे मी आज राजकारणात आहे. सुधाकरराव नाईक साहेबांनी मला 92 ते 98 मध्ये विधान परिषदेवर घेतले. त्या नंतर पवार साहेब आले. त्यांनी मला मंत्रिमंडळात स्थान दिले. त्यानंतर, मंत्री, राज्य मंत्री, मुख्यमंत्री होण्याची संधी मला माझ्या पक्षाचे नेते सोनिया गांधी, राहुल गांधी यांच्यामुळे मिळाल्या, हे मी नाकारत नाही. ही जी आपल्याला संधी मिळते, त्या संधीचे सोने करण्याचे काम झाले पाहिजे व त्याचा जिल्ह्याच्या विकासासाठी ज्या प्रमाणे त्या वेळच्या काळात शंकररावांनी किंवा पद्मश्रींनी काम केले, त्या पद्धतीने काम झाले तर, मला वाटते काहीच हरकत नाही.

आज आम्ही विरोधी पक्षात आहोत. विरोधी पक्षाची भूमिका आम्ही जाहीरपणे बजावत आहोत आणि मला आनंद या गोष्टीचा आहे की, नरेन्द्र मोदी साहेबांनीसुद्धा पवार साहेबांची तारिफ केली. म्हणून, आमची आघाडी राज्यात यशस्वी होणार आहे, याबद्दल माझ्या मनात बिल्कुल शंका नाही. कारण, पवार साहेबांच्या राष्ट्रवादी काँग्रेस व काँग्रेस पक्षाची आघाडी आता होऊ घातली आहे आणि जागेचे वाटप सर्वांनीच मान्य

केलेले आहे. पवार साहेब आजच नव्हे तर, पवार साहेबांची राजकीय कारकीर्द जी काही आजपर्यंत झालेली आहे, त्या काळात त्यांनी सर्व राजकीय पक्षांना जोडण्याचे काम केले. सर्व पक्षांतील लोकांशी त्यांचे चांगले संबंध आहेत. राजकीय पातळीवर राहुल गांधी त्यांना भेटतात. ते राहुल गांधींना भेटतात. त्यामुळे राहुल गांधी व त्यांच्यात संवाद चांगला आहे. आणि विरोधी पक्षांनी त्यांना सर्टिफिकेट दिले आहे, त्यामुळे आमची अडचण संपलेली आहे. नांदेड जिल्ह्यात आम्हाला विरोधी पक्षांसहित सर्वांची साथ मिळणार आहे, अशा प्रकारची अपेक्षा आज करायला हरकत नाही, असे मला वाटते.

आजचा प्रसंग हा पद्मश्रींच्या कारकीर्दीतला असला तरी आतापर्यंत पुलाखालून बरेच पाणी वाहून गेलेले आहे. या सगळ्या कामामध्ये जुनी जी काही मंडळी होती, त्यात केशवराव धोंडगे साहेबांचे नाव निश्चित घेतले पाहिजेत. विधानसभेत ते ज्या पद्धतीने बोलायचे त्यामुळे एक प्रभावी विरोधी पक्ष नेता म्हणून त्यांची प्रतिमा निर्माण झाली आहे. कदम साहेबांचा, पद्मश्रींचा दरारा होता. आम्ही त्यांना भेटायला जायचो. त्यांचा शब्द प्रमाण असायचा. शंकरराव चव्हाण साहेबांनाही ते अधिकाराने बोलू शकत होते.

आज आपण सहकार क्षेत्राची चर्चा करीत असताना, जरुर काही गोष्टींचा उल्लेख या ठिकाणी केला पाहिजे. सहकार क्षेत्र किती अडचणीत आहे, याची पवार साहेबांना चांगली कल्पना आहे. कारण, त्यांचा पुढाकार नेहमी असतो. कारखाना असो, बँका असो हे सगळेच विषय पाहात असताना, पवार साहेबांना चिंता असते. मुख्यमंत्री, पंतप्रधान कोणत्याही पक्षाचा असो, पवार साहेब हे असे व्यक्तिमत्व आहे, त्यांनी सहकार क्षेत्राला संजीवनी देण्याचे काम केले आहे. खरं म्हणजे, आज स्वर्गीय वसंतदादा पाटलांची आठवण येते. वसंतदादांनी या सहकार चळवळीला राज्यात खूप मेहनतीने उभे केले. चांगल्या संस्था राज्यात उभ्या केल्या. सहकारी सूत गिरणी असो, कारखाने असो, ह्यांना दादांच्या काळात भरपूर मदत केली गेली. ज्या ठिकाणी व्यवस्थापन चांगले होते, काम चांगले झाले, त्या ठिकाणी कारखाने उत्कृष्ट चालले. अशा कारखान्यांतून आज हजारो लोकांना रोजगार मिळत आहे, ही गोष्ट नाकारता येणार नाही. आजची ही चळवळ मोडीत निघत आहे का? हा प्रश्न चर्चेला घेतला तर वावगे ठरणार नाही.

पद्मश्रींच्या नावाने आपण सहकारी संस्था चालवत आहोत, ज्या पद्मश्रींना संस्था चालवल्या, त्यांच्या तोडीची संस्था अन्य कोणी जिल्ह्यात चालवली असेल असे मला वाटत नाही. त्यांनी त्यांच्या काळात बँक जितकी चांगल्या पद्धतीने चालवली, तितक्या चांगल्या पद्धतीने कोणी चांलवली असेल, असे मला वाटत नाही. पवार साहेबांनी मला विचारले, बँकेचा एन.पी. 37 टक्के? मी म्हटले, पद्मश्री असते तर शून्य टक्क्यांवर एन.पी. आला असता, एवढी क्षमता त्यांच्यात होती. संस्थेचे आपण विश्वस्त आहोत, ही गोष्ट विसरून चालणार नाही. सहकार क्षेत्रात काम करीत असताना, या बँकेत गुंतवणूक करणारे भागधारक आहेत, हितचिंतक आहेत, गुंतवणूकदार आहेत, शेतकरी आहेत, या



सगळ्यांचा हा पैसा आहे. मधल्या काळात बँकेतून लोकांनी धडाधड पैसे काढायला सुरुवात केली, त्या वेळी पद्मश्रींची आठवण सर्वांना झाली की, त्यांच्या काळात असे काही घडले नव्हते. आज नेमके काय असे घडते, ज्यामुळे बँकेचा एन.पी. 37 टक्क्यांवर गेला आहे, अशा प्रकारची भीती सर्वसामान्य गुंतवणूकदारांमध्ये आहे.

मी सुनील कदमांचे आभार मानेन. त्यांनी एका गोष्टीचा उल्लेख केला, की बँक जेव्हा बंद होण्याच्या मार्गावर होती, बँक जर बंद झाली असती, बाकीच्यांचे काय व्हायचे ते होऊ द्या. पण, लोकांचे पैसे बुडाले असते. त्या वेळी विलासरावांशी आमचा वाद झाला. मंत्रिमंडळ बैठकीचा तो दिवस अजून मला आठवतो. त्या वेळी मी मंत्रिमंडळात महसूल मंत्री होतो. त्या वेळी एकटा अशोक चव्हाण बँकेची बाजू घेऊन लढत होता. 90 टक्के मंत्रिमंडळ विरुद्ध होते. ते म्हणायचे तुम्ही कोणत्या आधारावर बँकेला मदत करा असे म्हणता? पण, विलासरावांनी साथ दिली. ते म्हणाले, मराठवाड्यातली बँक आहे. मदत केली पाहिजे आणि विलासरावजींनी 100 कोटी रुपयांचे कर्ज बँकेला मिळवून दिले आणि मी मुख्यमंत्री झाल्यानंतर, सगळे लोक मला भेटले व म्हणाले, सर बँकेचे हे कर्ज आम्ही पेलू शकत नाही. त्यामुळे शंभर कोटीचे कर्ज अनुदानामध्ये घेण्याचा निर्णय मी मुख्यमंत्री असताना घेतला. हा टाळी वाजवण्याचा प्रसंग नाही. त्या वेळी मी ते केले नसते तर, आज बँक टिकली नसती.

पद्मश्रींनी ती बँक स्वत:च्या मुलाप्रमाणे सांभाळली, जोपासली, बँकेत कोठेही अगाऊ खर्च केला नाही. बँक राजकारणाचा अड्डा पद्मश्रींनी होऊ दिला नाही, हे मला आवर्जून सांगितले पाहिजे. त्यांचा स्वभाव इतका कडक होता, कोणाला आवडो न आवडो, संस्था म्हणजे संस्था अशा प्रकारची भूमिका त्यांनी बजावली. आज एक गोष्ट पवार साहेबांना आवर्जून सांगितली पाहिजे. सहकार क्षेत्र आज अडचणीत आले आहे. शासनाचा अवास्तव हस्तक्षेप वाढला आहे. आज कारखाने अडचणीत का चालले आहेत? जो भाव बसत नाही, तो देण्याची मागणी होत आहे. आम्ही शासनास म्हणतो, भाव देण्यास हरकत नाही. शेतकऱ्यांना भाव दिलाच पाहिजे. पण, साखरेच्या किंमतीतील फरक व तुम्हाला वजा जाता जो फरक राहणार आहे, तो थेट तुमच्या बँक खात्यात जमा केला तरी आमची काही हरकत नाही. पण, तसे होत नसेल तर, कारखाने बंद होणार. आपल्याला कारखानदारी चालवायची आहे की, बंद करायची आहे, यावर चर्चा होण्याची गरज आहे.

पवार साहेब, आपल्याला माहिती आहे. आपण साखरेलाही किमान आधारभूत किंमत वेळोवेळी दिली आहे. त्यामुळे साखरेचे भाव टिकले. साखरेचे भाव टिकले तर, कारखाने चालणार आहेत. अन्यथा नाहीत. बँकेतही अशाच प्रकारची परिस्थिती आहे. बँकेनेही एन.पी.ए. कमी करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. रिझर्व बँकेच्या काही नियमांमुळे त्याच्यात अडचणी आल्या असतील. पण, त्याला सांभाळून घेत काही जिल्हा बँका चांगल्या चालल्या आहेत. लातूरची बँक चांगली चालली आहे. पुण्याची बँक चांगली चालली आहे. जर, लातूर व पुण्याची जिल्हा बँक चांगली चालत असेल तर, नांदेडची जिल्हा बँकही चांगली चालली पाहिजे. लोकांच्या ठेवी स्वत:हून बँकेत आल्या पाहिजेत. लोकांचा विश्वास संपादन केला पाहिजे.

आज पद्मश्रींचा पुतळा सर्वांना मार्गदर्शक ठरेल असा आहे. केवळ त्यांचा पुतळा उभारुन चालणार नाही. तर, त्यांच्या कार्याचा आदर्श घेऊन आपण बँक प्रगतीपथावर नेली पाहिजे. ही काळाची गरज आहे. तरच लोकांचा विश्वास संपादन होईल. सहकार क्षेत्रातले खरे गुरू हे शामराव कदम होते. त्यांनीच आपल्याला या सगळ्या कामासाठी एक वेगळी ऊर्जा दिली. पद्मश्रींची ग्रामीण भागाशी नाळ जोडली गेली होती. ज्यांच्या हाती सत्ता आहे, त्यांनी जिल्हा पुढे नेण्याचा प्रयत्न करावा. आमची काही तक्रार नाही. आज जिल्हा-जिल्ह्यात स्पर्धा आहे, विभागाविभागांत स्पर्धा आहे. या स्पर्धेत आपण टिकलो व पुढे राहिलो तर, त्यात काय गैर आहे? मी अधिक न बोलता, पवार साहेब नांदेडला आल्याबद्दल त्यांचे आभार मानतो.



कै. शामराव कदम यांच्या जीवनकार्यावर प्रसिद्ध करण्यात आलेल्या स्मृतिग्रंथाचे शरद पवार व अशोक चव्हाण प्रकाशन करताना. शेजारी धनंजय मुंडे, कमलकिशोर कदम, जयप्रकाश दांडेगावकर, सुनील कदम.

# अवलोकितेश्वर





# विरोधी पक्षांच्या रणनीतीची फेरआखणी

पुलवामामध्ये झालेला सीआरपीएफ जवानांच्या काफिल्यावरील हल्ला व चाळीस जवानांचा मृत्यु, त्यानंतर पध्दतशीरपणे त्याआधारे देशात वातावरण तापविण्याचा झालेला प्रकार, पाकिस्तानला धडा शिकविण्याबाबत तयार झालेला उन्माद या सर्वाची परिणिती बालाकोट या पाकिस्तानातील दहशतवादी प्रशिक्षण केंद्रावरील भारतीय हवाई हल्ल्यात झाली. भारतीय हवाईदलाच्या शूरवीरांनी पाकिस्तानी हद्दीत खोलवर घुसून जैश ए मुहम्मद या दहशतवादी संघटनेचा तळ नष्ट केला. या संघटनेने पुलवामा घटनेची जबाबदारी स्वीकारली होती. या घटनाक्रमानंतर देशात देशभक्ती आणि राष्ट्रवादाचे उन्मादी वातावरण निर्माण करण्यात आले. साहजिकच केंद्र सरकारला विविध अपयशांच्या मुद्यावर घेरण्यासाठी एकजूट झालेल्या विरोधी पक्षांमध्ये रणनीतीबाबत फेरविचार सुरु झाला. त्यादृष्टीने आता राणनीतीची फेरआखणी सुरु करण्यात येत आहे. याठिकाणी एक गोष्ट नमूद करावी लागेल की केंद्र सरकारतर्फे सध्या देशाची सुरक्षितता आणि पाकिस्तानविरोधी वातावरण तयार केले जात आहे ते राजकीय निरीक्षकांना आणि विरोधी पक्षांनाही अपेक्षित होते. कारण अनेक स्तंभलेखकांनी याबाबत भाकितही केलेले होते. वर्तमान राज्यकर्त्यांना आर्थिक प्रगती व विकास या मुद्यावर आगामी लोकसभा निवडणूक जिंकता येणार नाही हे कळून चुकले होते. त्याचप्रमाणे सत्तारूढ पक्षाच्या विरोधात विरोधी पक्षांची

एकजूट दिवसेंदिवस घट्ट होताना दिसू लागली होती. त्यामुळे त्यांनी प्रथम अयोध्या व राममंदिर, त्यानंतर काश्मीर यांच्या आधारे देशात धार्मिक ध्रुवीकरण करण्याचा प्रयत्न चालविला होता. परंतु त्यात त्यांना अपेक्षित यश मिळाले नाही. त्यामुळे त्यांनी शेवटचा हुकमी पत्ता पाकिस्तानचा खेळणार हेच भाकित अनेकांनी केलेले होते व ते खरे ठरले असे म्हणण्याची पाळी आता आली आहे.



केंद्रातील भाजपचे सरकार विविध आघाड्यांवर अपयशी ठरत असल्याचे स्पष्ट झालेले होते. विशेषतः आर्थिक आघाडीवर या सरकारची असफलता दिवसेंदिवस गंभीर होत चालली होती. बेकारीचा प्रश्न गंभीर होत चालला होता. औद्योगिक उत्पादन घटत आहे, नवीन गुंतवणूक देखील आढळेनाशी झाली आहे. तर जागतिक अर्थव्यवस्था देखील पुन्हा मंदीच्या चक्रात प्रवेश करण्याचे चित्र असल्याने देशाच्या निर्यातीवरही अत्यंत प्रतिकूल परिणाम झालेला आहे. सरकारी महसुल किंवा प्राप्ती कमी आणि खर्च अधिक झाल्याने वित्तीय किंवा राजकोषीय तूट वाढत चालली आहे. अशा परिस्थितीत कुणीही सामान्य माणूस हा बाजारात जाऊन खरेदी करण्याची शक्यता कमी होते व अशा परिस्थितीत मंदावलेल्या बाजारात महागाई किंवा चलनवाढीचा निर्देशांकही खालवतो. सरकार त्याच्यातच खूष होऊन महागाई निर्देशांक कमी झाला म्हणून दवंडी पिटू लागले. परंतु लोक बाजारात जाऊन खरेदी करीत नसतील तर अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने ते लक्षण चांगले नसते. वर्तमान राज्यकर्त्यांना सरळ मार्गाने राज्यकारभार करता येणे अशक्य





झाल्यानेच त्यांनी खैरातीचे राजकारण सुरु केले. शेतकऱ्यांना वार्षिक सहा हजार रुपये थेट त्यांच्या खात्यात जमा करण्याची घोषणा करण्यात आली. एकीकडे महत्वाच्या अशा सामाजिक



मंत्रालयांची अनुदाने किंवा अर्थसंकल्पीय साह्यात सरकार कपात करीत सुटले आणि दुसरीकडे खैरात वाटण्यास सुरुवात करणे यातून सरकारी तिजोरीवर(राजकोष) ताण पडण्यास सुरुवात होणे ओघाने आलेच आणि त्यामुळेच वित्तीय तूट म्हणजेच राजकोषीय तूट(जमा व खर्चातील तफावत) वाढू लागली. अर्थसंकल्पीय उद्दिष्टाच्या पुढे टक्केवारीने धाव घेतली. परंतु या सरकारला त्याचे सोयरसुतक नव्हते. पैसा वाटून मते खरेदी करण्याच्या वेडाने या सरकारला झपाटून टाकले. यामुळे भावी काळात कोणते गंभीर आर्थिक संकट येणार आहे याची कल्पना बहुधा नेतृत्वाला नसावी किंवा तेवढी परिपक्वताही नेतृत्वात नसावी. अशा तंगीच्या आर्थिक परिस्थितीत नवीन नोकऱ्या व रोजगाराची निर्मिती होणे

अशक्यच असते. शेतीच्या क्षेत्राकडे या सरकारने सुरुवातीपासून दुर्लक्ष करुन केवळ उद्योगक्षेत्राला झुकते माप देण्याचा प्रकार केला. परंतु एवढे सारे करुनही उद्योगक्षेत्राला उठाव येताना दिसेना तेव्हा या राज्यकर्त्यांनी त्यांच्या पाच वर्षांच्या कारकिर्दीच्या अखेरीला शेतकरी आणि शेतीच्या क्षेत्रातील तणावाची जाणीव झाली. परंतु तोपर्यंत उशीर झालेला होता आणि त्यासाठी खैरातीचा मार्ग अवलंबिण्यात आला.

आर्थिक आघाडीवर फारसे कर्तृत्व गाजविण्यात राज्यकर्त्यांना फारसे यश येऊ शकत नाही कारण नोटाबंदी आणि जीएसटीची घाईघाईने सदोष अंमलबजावणी या दोन आघातातून अद्याप अर्थव्यवस्था पूर्णपणे सावरलेली नाही. त्यामुळेच दुसऱ्या







बाजुला राज्यकर्ते ज्या विचारसरणीचे प्रतिनिधित्व करतात आणि त्यांच्या असलेल्या पारिवारिक संघटना यांनी सामाजिक आघाडीवर ध्रुवीकरणाचा खेळ सुरु केला. या देशात धार्मिक ध्रुवीकरण केल्यास त्याचा राजकीय लाभ मिळू शकतो हे या विचारसरणीचे हुकमी अस्त्र आहे. त्याचा वापरही वेळोवेळी झालेला आहे. त्यादृष्टीने या विचारसरणीच्या पोतडीत असलेल्या मुद्यांमध्ये अयोध्या-राममंदिर उभारणी, काश्मीरला विशेष दर्जा देणाऱ्या घटनात्मक तरतुदी रद्द करणे, समान नागरी कायदा, तत्काळ तिहेरी तलाक यांचा समावेश होतो. याखेरीज या विचारसरणीच्या मंडळींनी गोरक्षणाचा नवा मुद्दा सत्तेत आल्यानंतर जोडला आहे. या मुद्याच्या आधारे काही निरपराध मुस्लिम नागरिकांच्या केवळ संशयावरुन हत्या करण्यात आल्या. हे सर्व पत्ते या मंडळींनी खेळण्यास सुरुवात केली कारण त्यांना कळून चुकले होते की निव्वळ प्रगती व विकासाच्या आधारे त्यांना आगामी लोकसभा निवडणुकीत बहुमत मिळणे अवघड होणार आहे.

दुसरीकडे उत्तर प्रदेशात सामाजिक न्यायाच्या शक्तींची झालेली एकजूट व त्यामुळे तीन लोकसभा पोटनिवडणुकांमध्ये सत्तापक्षाचा झालेला पराभव हा एक प्रकारे त्यांच्यावर आघात होता. त्यानंतर तीन हिंदी भाषक राज्यांमध्ये सत्तापक्षाला पराभव स्वीकारावा लागला. मध्य प्रदेशात निसटता विजय मिळाला पण सरकार स्थापन करण्यात किंवा आमदारांना फोडण्यात सत्तापक्षाला अपयश आले. परिणामी तेथेही काँग्रेस पक्षाचे सरकार स्थापन झाले. ही बाब लक्षात घेता आपल्या हमखास विजय मिळवून देणाऱ्या राज्यांमधील परिस्थिती प्रतिकूल होत चालल्याचे पाहिल्यानंतरच सत्तापक्षात अस्वस्थता वाढायला लागली.

आता काही आकडेवारीवर नजर टाकावी लागेल. उत्तर प्रदेश, उत्तराखंड, बिहार, हिमाचल प्रदेश, राजस्थान, हरयाणा, दिल्ली, मध्य प्रदेश, छत्तीसगढ, गुजरात व महाराष्ट्र या राज्यांच्या आधारे सत्तापक्षाने 2014च्या लोकसभा निवडणुकीत 282ची मजल मारलेली होती. परंतु या राज्यांमध्येच सत्तापक्षाला स्वतःची पीछेहाट नजरेस येऊ लागली होती. या 11 राज्यांमध्ये लोकसभेच्या 285 जागा आहेत आणि 2014च्या निवडणुकीत सत्तापक्षाला

म्हणजेच भाजपला यापैकी 227 जागा मिळाल्या होत्या. म्हणजेच या 11 राज्यांनीच एकप्रकारे या पक्षाला सत्तेत येण्यास भरीव मदत केली होती. विरोधी पक्षांनी मोर्चेबांधणी सुरु केल्यानंतर आणि एका मागून एक नवनवे मुद्दे व विशेषतः शेतीशी निगडित समस्यांचे मुद्दे तीव्र होऊ लागले तसतसा या राज्यांमधील भाजपचा जनाधार खालावू लागला. यानंतर 2019च्या लोकसभा निवडणुकीबाबत अध्ययन सुरु झाल्यानंतर या 11 राज्यांमध्ये भाजपला किमान 80 ते 100 जागांचे नुकसान होईल असे अंदाज व्यक्त होऊ लागले होते. या जागांची भरपाई इतर कोणत्या राज्यांमधून भरुन काढणार हा खरा प्रश्न होता. कारण दक्षिणेतील राज्यांमध्ये किंवा पूर्वेकडील राज्यांमधून भाजपला अपेक्षित यश मिळणे अवघड दिसून येऊ लागले होते. त्यामुळे पुन्हा सत्तेत येण्याच्या मनसुब्यांना सुरुंग लागण्याची पाळी आलेली होती.







दुसऱ्यांदा सत्तेत येण्यासाठी आगतिक झालेल्या भाजपला पुलवामाची घटना आयती हाताशी मिळाली व त्यांनी त्या घटनेच्या मदतीने प्रतिकूल वातावरण आणि देशामध्ये वाढीस लागलेला भाजपविरोधी असंतोष याला रोखण्याचे काम सुरु केले.


पुलवामा घटनेच्या आधीपर्यंत बहुतेक विरोधी पक्षांनी मोर्चेबांधणीची दिशा पक्की केली होती. यामध्ये राष्ट्रीय पातळीवर आघाडी तयार करण्यात शक्ति व वेळ वाया घालवत बसण्यापेक्षा राज्यनिहाय आघाड्या करण्याच्या कल्पनेस प्राधान्य देण्यात आले होते. विरोधी पक्षांच्या मोर्चेबांधणीच्या प्रक्रियेत राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार हे केंद्रस्थानी राहिले. एकाबाजुला काँग्रेसच्या नेत्यांबरोबर ते संपर्क राखून आहेत तर दुसरीकडे बिगर काँग्रेसी पक्षाचे नेते त्यांच्या सतत संपर्कात आहेत. या






जावे लागेल असेही पवार यांनी सर्व नेत्यांना सांगितल्यावर बैठकीत एक हायसे वाटल्याचे वातावरण तयार झाले. त्याचबरोबर तूर्तास कुणाही विरोधी पक्षांनी सरकारच्या थेट विरोधात भूमिका न घेता राष्ट्रीय सुरक्षेच्या मुद्यावर विरोधी पक्षांचा सरकारला पाठिंबा राहील एवढी मर्यादित भूमिका घेण्याची सूचनाही केली व ती सर्वांनीच मान्य केली. त्यानुसारच विरोधी पक्षांनी सरकारला राष्ट्रीय सुरक्षेच्या मुद्यावर पाठिंबा देणारा ठराव केला आणि तशी निवेदनेही दिली. यामुळे










सर्व प्रयत्नांचे संयोजन, समन्वय हे पवार यांच्यामार्फतच होऊ लागले. त्यातूनच वर उल्लेखित राज्यनिहाय आघाड्यांची कल्पना अस्तित्वात आली.

पुलवामा घटनेने सुरुझालेल्या घटनाक्रमामुळे विरोधी पक्षांच्या गटात काहीसे पीछेहाट झाल्याचे वातावरण निर्माण होणे स्वाभाविक होते. त्यामुळे फेब्रुवारी महिन्याच्या अखेरीला झालेल्या बैठकीत काही नेत्यांनी या घटनेचा संभाव्य यशावर प्रतिकूल परिणाम होण्याची शक्यताही व्यक्त केली. परंतु माहीतगार गोटातून मिळालेल्या माहितीनुसार पवार यांनी यावेळी सर्वांना मनोधैर्य राखण्याचे आवाहन केले. किंबहुना एक तात्कालिक किंवा तात्पुरती अशी ही पीछेहाट असल्याचे चित्र निर्माण झालेले असले तरी त्याचा परिणाम फारकाळ टिकणार नाही असे त्यांना समजावले. त्याचबरोबर या घटनेतील त्रुटी जशा बाहेर येऊ लागतील तसे सरकारला पुन्हा बचावाच्या पवित्र्यात

सरकारचीही अडचण झाली आणि या मुद्यावर विरोधी पक्षांना लोकांच्या नजरेत देशद्रोही करण्याचे सत्तापक्षाचे व विशेषतः नेतृत्वाचे प्रयत्न ढिले पडले. काही नेत्यांनी कारवाईचे तपशील मागितले त्यावरही भाजपनेत्यांनी विरोधी पक्षांना बदनाम करण्याचा आणि देशविरोधी असल्याचे दाखविण्याचा प्रयत्न केला पण तो फारसा यशस्वी होताना आढळत नाही.





या कारवाईतील त्रुटींबाबतचे तपशील आपोआपच उघडकीस येतील आणि त्यावेळी विरोधी पक्षांना सरकारला जाब विचारण्याची संधी मिळेल व तोपर्यंत वाट पाहण्याचे धोरण पवार यांनी आखले आणि त्यांचा अंदाज अचूक ठरला. या कारवाईत किती दहशतवादी मारले गेले याचे तपशील देण्यात सरकारने असमर्थता दाखवून पहिली पीछेहाट अनुभवली. आता या कारवाईची आणखी निष्फळता समोर येऊ लागली आहे. कारण एवढी कारवाई करुनही काश्मीरमधील दहशतवादी हल्ले, घुसखोरी कमी होताना आढळत नाही. किंवा सीमारेषेवरील पाकिस्तानी बाजुकडून शस्त्रबंदीचे होणारे उल्लंघनही थांबलेले नाही. या दोन्ही घटनांमध्ये जीवितहानी होतच आहे. त्यामुळेच एवढी मोठी कारवाई करुन त्याचे फलित काय हा प्रश्न आता विरोधी पक्षांनी सरकारला विचारण्यास सुरुवात केली आहे. आता सरकारची अवस्था पिंजऱ्यात सापडल्यासारखी होत चालली आहे. दिवसेंदिवस हे सरकार त्यांनी तयार केलेल्या जाळ्यात स्वतःच अडकताना दिसू लागले आहे. त्यामुळे विरोधी पक्षांनी संयम दाखविण्याची भूमिका घेतल्याचा फायदा समोर आलेला आहे.

पवार यांनी किमान समान कार्यक्रमाच्या संदर्भातही लवचिक भूमिका घेण्याची सूचना केली आहे. कारण विरोधी पक्षांमध्येही अनेक पक्ष वैचारिकदृष्ट्या भिन्न विचारसरणी असलेले आहेत. परंतु धर्मनिरपेक्षता, संसदीय लोकशाही, लोकशाही संस्थांचे रक्षण व जतन, रोजगार निर्मिती व बेकारी निर्मूलन, संघराज्य पध्दती व राज्यांची स्वायत्तता अशा मूलभूत मुद्यांवर सर्व पक्ष एकजूट आहेत आणि या मूलभूत मुद्यांवर सध्याच्या राज्यकर्त्यांनी हल्ले करण्याचे अवलंबिलेले धोरण अमान्य करुन त्याचा प्रतिकार करण्यासाठी एकत्र आल्याची भूमिका या पक्षांतर्फे मांडली जाणे अपेक्षित आहे. येत्या काही दिवसातच त्यासंबंधीचे एक निवेदन तयार करण्यात येत आहे. या निवेदनातच निवडणुकीनंतर सरकारस्थापनेच्या वेळी सरकारचा किमानसमान कार्यक्रम तयार करण्यात येईल असेही नमूद करण्यात येणार आहे. यासाठी काही निवडक विरोधी पक्षनेत्यांना एकत्र बसून मूलभूत मुद्यांचे निवेदन तयार करण्यास सांगण्यात आले आहे.

थोडक्यात पुलवामा व बालाकोट घटनांच्या आधारे सत्तापक्षाने देशापुढील खऱ्या व मूलभूत समस्यांवरुन लोकांचे लक्ष उडविण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यातून निर्माण झालेली प्रक्षुब्धता कमी होऊ लागली आहे आणि पुन्हा लोकांना दैनंदिन जीवनाशी निगडित मुद्यांचे भान येईल अशी अपेक्षा करुन विरोधी पक्षांनी आपली रणनीती आखली आहे. तसेच एवढ्या मोठ्या कारवाईचे फलित काय यावर सरकारला प्रश्न करुन त्यांना 'बॅकफुट'वर नेण्याचा मुद्दाही या रणनीतीच्या केंद्रस्थानी असेल. सत्तापक्षाला व नेतृत्वाला त्याची जाणीव होऊ लागल्यानेच विरोधी पक्षांच्या नावाने आदळआपट आणि बोटे मोडणे, त्यांना विनाकारण देशविरोधी, सेनाविरोधी म्हणण्याचे आगतिक प्रकार सत्तारूढ नेत्यांनी सुरु केले आहेत. विरोधी पक्षांतर्फे उपस्थित केलेल्या तर्कसंगत प्रश्नांना उत्तरे न दिल्यास सत्तापक्षाला त्याची किंमत मोजावी लागणार आहे. त्याच्यातली ती घबराट स्पष्ट होऊ लागली आहे.




Nanded City, Pune
Sinhagad Road, Pune
A 700 Acre Mega Township on Sinhagad Road, Pune.
प्रत्येक घराला एक मन असतं.
प्रत्येक शहराला एक व्यक्तिमत्त्व असतं.
CBSE व ICSE शाळा
A project by
MAGARPATTA CITY
The pride of Pune
Call: 020-67275800 / 1 / 2
www.nandedcitypune.com
info@nandedcitypune.com

# युध्द हवे की पाकिस्तानला




## पाकिस्तानचे विमान एफ-१६

**पाकिस्तानी हवाईदलाने भारतीय लष्करी ठाण्यावर हल्ला करण्याचा प्रयत्न केला. तेव्हा त्यात पाकिस्तानचे वरील एफ-16 विमान नष्ट केल्याचा दावा भारततर्फे करण्यात आला.**

बालाकोट हवाई मोहिमेनंतर दुसऱ्या दिवशी पाकिस्तानी हवाईदलाने भारतीय लष्करी ठाण्यावर हल्ला करण्याचा प्रयत्न केला. त्यात पाकिस्तानचे एक एफ-16 विमान नष्ट केल्याचा दावा भारततर्फे करण्यात आला. परंतु त्यावेळी झालेल्या हवाई झटापटीत भारतालाही एक मिग-21 विमान गमवावे लागले आणि भारतीय वैमानिक पाकिस्तानच्या हाती पडला. पाकिस्तानी सेनेने त्याला ताब्यात घेतले.त्या दिवशी परराष्ट्रमंत्री सुषमा स्वराज चीनमध्ये होत्या. भारत-रशिया-चीन(रिक) त्रिपक्षीय राष्ट्रसमूहाच्या बैठकीला त्या गेल्या होत्या. पुलवामा आणि बालाकोटच्या पार्श्वभूमीवर त्या गेल्या होत्या. त्यामुळे

# एकाकी पाडायचे?

गहिनीनाथ




## भारताचे विमान मिग–२१

**भारताने पाकिस्तानच्या बालाकोट येथील दहशतवादी स्थानावर हल्ला केल्यानंतर पाकिस्तानी विमानांनी भारताच्या हद्दीत घुसण्याचा प्रयत्न केला. तेव्हा त्यांचा पाठलाग करताना भारताला आपले मिग–२१ विमान गमवावे लागले.**

त्या घटनांची छाया तेथील विचारविनिमयांवर पडणे अपेक्षितच होते. या त्रिपक्षीय परिषदेनंतर जारी करण्यात आलेल्या संयुक्त निवेदनात दोन परिच्छेदांमध्ये(क्र.9 व 10) जगभरात धुमाकूळ घालत असलेल्या दहशतवादी कारवायांचा तीव्र निषेध करण्यात आला. या दहशतवादाचा आंतरराष्ट्रीय पातळीवर आणि संयुक्तपणे मुकाबला करण्याच्या मुद्दाशी या देशांनी बांधिलकी व्यक्त केली. संयुक्त राष्ट्रसंघातर्फे या समस्येचे निराकरण आणि प्रतिकार करण्यासाठी जी मोहिम आखण्यात आलेली आहे त्यात सर्व देशांच्या सहभाग व सहकार्याची मागणी यामध्ये करण्यात आली. संयुक्त राष्ट्रसंघाने दहशतवादाच्या विरोधात केलेल्या ठरावांच्या



रिक बैठक

अंमलबजावणीसाठी परस्पर सहकार्य करण्याचा प्रस्तावही या निवेदनात करण्यात आला. या ठरावात पाकिस्तानचा नावाने उल्लेख करण्यात आला नाही. परंतु जे देश दहशतवाद्यांना आश्रय, प्रोत्साहन, सहकार्य व मदत करतात त्यांना त्या दहशतवाद्यांच्या कृत्यांबद्दल जबाबदार धरण्यात यावे आणि त्या दहशवाद्यांविरुध्द कारवाई केली गेली पाहिजे तसेच अशा देशांच्या विरुध्द संयुक्त राष्ट्रसंघाच्या विविध ठरावांखाली तसेच दहशतवाद प्रतिबंधक आर्थिक कारवाईही करण्यात यावी अशी मागणी करण्यात आली.या संयुक्त निवेदनाचे स्वरुप सर्वसाधारण आणि आंतरराष्ट्रीय स्वरुपाचे होते. त्यामुळे त्यात पाकिस्तानचा नेमका उल्लेख नव्हता. अर्थात पाकिस्तानचा मित्रदेश असलेला चीन या समूहात असूनही संयुक्त निवेदनातील या भाषेला व उल्लेखाला त्यांनी मान्यता दिली हे काहीसे महत्वपूर्ण मानले जाते.

पुलवामा व बालाकोटनंतर चीनने भारत-पाकिस्तान दरम्यान वाढत चाललेल्या तणावाबद्दल चिंता व्यक्त करुन सबुरीचा सल्ला दिला होता. भारताने पुलवामा हल्ल्याबद्दल पाकिस्तान व जैश ए मुहम्मद संघटनेला जबाबदार धरले होते. चीनने सातत्याने आंतरराष्ट्रीय व्यासपीठांवर जैश आणि त्याचा म्होरक्या मौलाना



संयुक्त राष्ट्रसंघाच्या बैठकीत एकमताने दहशतवाद विरोधी ठरव संमत करण्यात आला.





मसूद अजहर याची पाठराखण केली होती आणि त्याला दहशतवादी म्हणून घोषित करण्याचे संयुक्त राष्ट्रसंघातील प्रयत्न हाणून पाडले होते. तरीही त्यांनी काहीशा कडक शब्दांचा उपयोग करुन तयार केलल्या या परिच्छेदांना मंजुरी दिली हे त्यांच्या किंचितशा बदलत्या भूमिकेचे चिन्ह मानले गेले. पुलवामा व बालाकोटनंतर ज्या परदेशी राजदूतांना विशेष पाचारण करुन भारताने आपली भूमिका स्पष्ट केलेली होती त्यामध्ये चीनच्या दिल्लीस्थित राजदूतांचाही समावेश होता आणि त्यामध्ये भारताने पुलवामा हल्ल्यास सर्वस्वी जैश ए मुहम्मद जबाबदार असल्याचे सांगून बालाकोट येथील हल्ला हा जैशच्या तळावरच असल्याची माहितीही दिली होती. चीनने त्यावर प्रतिक्रिया दिली नव्हती. परंतु पाकिस्तानला पाठिंबाही दिलेला नव्हता. हा जो किंचितसा बदल होता त्याची ही सुरुवात होती.

यानंतर लगेचच परराष्ट्रमंत्री 1 व 2 मार्च रोजी अबुधाबी येथे होणाऱ्या 'ऑर्गनायझेशन ऑफ इस्लामिक कोऑपरेशन' - 'ओआयसी' या इस्लामी राष्ट्रसमूहाच्या परिषदेला गेल्या. पन्नास वर्षांनंतर या संघटनेने भारतीय परराष्ट्रमंत्र्यांना उद्‌घाटनाचे सन्माननीय अतिथि म्हणून निमंत्रित केलेले होते. या गोष्टीचा विशेष गवगवा नेहमीप्रमाणे भारत सरकारकडून करण्यात आला होता. यामध्ये मोदी राजवटीच्या परराष्ट्र धोरणाला जगात कशी मान्यता मिळत आहे याचे हे चिन्ह असल्याचे मोठ्या फुशारकीने सांगण्यात आले. भारताला निमंत्रित केलेले असल्याने या संघटनेचा प्रमुख सदस्य देश किंवा एक प्रकारे नेतृत्व करणारा देश



आपली भूमिका स्पष्टपणे मांडली हे चांगले झाले. परंतु काश्मीरबाबतचा ठराव रोखण्यात भारताला यश येऊ शकले नाही. पाकिस्तानचा या राष्ट्रसमूहावर असलेला प्रभाव आणखी एकदा स्पष्ट झाला. या ठरावावर भारताने प्रतिक्रिया देताना काश्मीरचा प्रश्न हा भारताची अंतर्गत बाब आहे आणि जम्मू-काश्मीर हा



म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पाकिस्तानने या परिषदेवर बहिष्कार टाकला. परंतु राजकीय निरीक्षकांना हा केवळ देखावा आहे याची खात्री होती. कारण परिषदेच्या अखेरीला या राष्ट्रसमूहाने काश्मीरबाबत ठराव करुन नेहमीप्रमाणे भारताच्या नावे बोटे मोडलेली होती. 'काश्मीरमधील मानवाधिकार भंग आणि अत्याचाराबद्दल भारताची निंदा' करणारा ठराव या परिषदेने संमत केला. या ठरावात पेलेट(छर्रे)च्या माऱ्याने काश्मिरी नागरिकांना 'सामूहिक अंध'(मास ब्लाइंडिंग) करण्याच्या प्रकाराचाही धिक्कार करण्यात आला होता. तर या राज्यात 'भारतीय दहशतवाद' असल्याचा उल्लेखही करण्यात येऊन इस्लामी राष्ट्रांनी मानवता साह्यासाठी आर्थिक निधि गोळा करण्याचे आवाहनही ठरावात करण्यात आले. हे सर्व अपेक्षित असूनही भारताने परिषदेत जाऊन भारताचा अभिन्न भाग असल्याच्या भूमिकेचा पुनरुच्चार केला. याचा सारांश एवढाच की पाकिस्तानला आंतरराष्ट्रीय पातळीवर एकाकी पाडण्याच्या भारताच्या प्रयत्नांना कितपत यश येत होते याची यावरुन कल्पना यावी.

आता आणखी थोडे मागे जाऊ. पुलवामा हल्ल्याची घटना 14 फेब्रुवारीला घडली. सौदी अरेबियाचे राजपुत्र आणि सध्याच्या राजाचे वारसदार महंमद बिन सलमान हे 19 फेब्रुवारीला भारताच्या भेटीवर आले. या भेटीपूर्वी त्यांनी 17 फेब्रुवारीला पाकिस्तानला भेट दिली. 18 तारखेला पाकिस्तानहूनच ते भारताला येणार होते. परंतु भारताला ती कल्पना मान्य नव्हती. त्यामुळे ते परत सौदी अरेबियाची राजधानी रियाधला परतले आणि तेथून पुन्हा थेट दिल्लीला आले. परंतु पाकिस्तानभेटीत त्यांनी पाकिस्तानला वीस अब्ज डॉलर्स मदतीचे आश्वासन दिल्याची माहिती प्रसिध्द झाली. भारत-भेटीवर आल्यानंतर राजपुत्रांनी भारताबरोबर चार ते पाच करार केले त्यात काही गुंतवणुकीबाबतही होते परंतु फार काही महत्वपूर्ण अशा करारांचा त्यात समावेश नव्हता. दहशतवादाच्या विरोधात नेहमीच्या




**महंमद बिन सलमान यांनी दिल्लीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली.**


भाषेचा वापर करण्यात आला होता. भारताने पाकिस्तानचे नाव न घेता जे देश दहशतवादी व त्यांच्या कारवायांना मदत देतात, पाठिंबा देतात आणि आश्रय देतात त्यांच्या विरोधात भूमिका घेण्याचा नेहमीचा उल्लेख होता. संयुक्त निवेदन करुन राजपुत्र सौदी अरेबियाला निघून गेले. भारताच्या पदरात काय पडले या प्रश्नाचे उत्तर शोधायचा प्रयत्न केल्यास 'काहीही नाही' असे उत्तर मिळते.

पाकिस्तानस्थित, पाकिस्तान पुरस्कृत व पाकिस्तानचे संपूर्ण सहकार्य असलेल्या दहशतवादी संघटनांकडून भारतात सतत कारवाया चालू असूनही पाकिस्तानचा बंदोबस्त करणे अशक्य किंवा अडचणीचे व अवघड का होते हा यातील मुख्य प्रश्न आहे. यासाठी पाकिस्तानचे आंतरराष्ट्रीय जगतातील वैशिष्ट्यपूर्ण स्थान काय आहे याची कारणे तपासावी लागतील. प्रथम म्हणजे इस्लामी राष्ट्रांचे नेतृत्व अघोषितपणे सौदी अरेबिया करीत असला तरी पाकिस्तानही इस्लामी राष्ट्रांमधील मोठी शक्ति मानली जाते. सर्वाधिक लोकसंख्येचा देश असल्याने आणि सर्वात महत्वाचे म्हणजे एक लष्करी शक्ति म्हणूनही इस्लामी जगतात पाकिस्तानची गणना होते. सौदी अरेबियाच्या राजघराण्याच्या अगदी निकटतम वर्तुळातील (इनरमोस्ट रिंग) सुरक्षा व्यवस्था पाकिस्तानी कमांडोंच्या नियंत्रणाखाली आहे असे सांगण्यात येते आणि त्या कारणामुळे सौदी अरेबिया पाकिस्तानची साथ सोडू शकत नाही किंवा पाकिस्तानला एकाकी पाडणे त्यांना परवडणारे नाही. त्याचप्रमाणे इस्लामी राष्ट्रांमधील पाकिस्तान ही अण्विक शक्ति असल्यानेही त्यांचे स्थान वैशिष्ट्यपूर्ण झालेले आहे. थोडक्यात पाकिस्तानला आंतरराष्ट्रीय पातळीवर एकाकी पाडणे वाटते तेवढे सोपे राहिलेले नाही.

अर्थात 'फिनान्शियल ॲक्शन टास्क फोर्स'(एफएटीएफ) या आंतरराष्ट्रीय संघटनेतर्फे पाकिस्तानला काळ्या यादीत टाकणे आणि 'सार्क' परिषद पाकिस्तानात आयोजित होऊ न देणे या दोन मुद्यांवर भारताला यश मिळाले आहे. अर्थात 'सार्क' राष्ट्रसमूहाचे महत्व तसेही फारसे राहिलेले नाही. 'एफएटीएफ'चे महत्व असे आहे की दहशतवादी कारवायांना आर्थिक मदत, सहकार्य करणाऱ्या राष्ट्रांची आर्थिक नाकेबंदी करण्याबाबत या राष्ट्रसमूहाचा उपयोग केला जातो. सध्या या राष्ट्रसमूहाचे उपाध्यक्षपद चीनकडे आहे आणि येत्या जुलैमध्ये अध्यक्षपद चीनला मिळणार आहे.









या उपाध्यक्षपदासाठी भारताने चीनला मदत केली होती. परंतु त्यावेळी भारताने न्युक्लिअर सप्लायर्स ग्रूपमध्ये समावेश होण्याच्या हिशोबाने चीनला मदत केली होती. परंतु आता जैश आणि मसूद अजहर यांना दहशतवादी म्हणून आंतरराष्ट्रीय पातळीवर घोषित करण्यासाठी भारत या मदतीच्या बदल्यात चीनवर दबाव आणू पहात आहे. बहुधा त्यामुळे जैश आणि मसूद अजहर यांच्याबाबत चीनने सध्या जी काहीशी तटस्थ भूमिका घेतली आहे त्यामागे हे कारण असल्याचे मानले जाते.



अमेरिकेने पाकिस्तानला मदत देण्याचे थांबविले आहे. तरीही सौदी अरेबियातर्फे पाकिस्तानला मदत चालूच आहे. सौदी अरेबिया हा अमेरिकेचा पश्चिम आशियातील विश्वासू साथीदार देश आहे. त्यामुळे पाकिस्तानबाबत अमेरिकेच्या नेतृत्वाला टोकाची भूमिका घेता येणे वाटते तेवढे शक्य नाही. त्याचबरोबर डोनाल्ड ट्रंप यांनी अफगाणिस्तानमधून माघार घेण्याचे धोरण जाहीर केल्यानंतर अमेरिकेला पाकिस्तानची पूर्वीपेक्षा काहीशी अधिकच गरज भासणार आहे आणि त्यामुळेच राजकीय निरीक्षकांच्या म्हणण्यानुसार अमेरिकेतर्फे पाकिस्तानच्या विरोधात घेतली जाणारी भूमिका हा केवळ देखावा आहे.

पुलवामा घटनेच्या सहा दिवस आधी 7 ते 12 फेब्रुवारी दरम्यान कराची बंदराजवळच्या समुद्रात 46 देशांच्या नौदलाच्या संयुक्त सरावाचा कार्यक्रम पार पडला. 'अमन-2019' असे या सरावाचे नामकरण होते. याचा अर्थ समजणे अवघड नाही. एवढेच नव्हे 41 सदस्य देश असलेल्या 'इस्लामिक मिलिटरी काउंटर टेररिझम कोॲलिशन' या राष्ट्रसमूहाचे नेतृत्व पाकिस्तानकडे आहे. त्यामुळेच पुलवामा हल्ल्याचा निषेध बहुतेक देशांनी केला पण त्यातही सावधगिरीचा मुद्दा मांडूनच ! तसेच या हल्ल्यानंतर भारताला प्रत्युत्तराचा अधिकार मान्य करुनही सर्व राष्ट्रांनी दोन्ही देशांना सबुरीचा सल्ला दिला कारण दोन्ही देश अण्वस्त्रसज्ज मानले जातात.

मग पाकिस्तानचा प्रतिकार करायचा कसा ? पाकिस्तानची अर्थव्यवस्था मोडकळीस आलेली आहे. देश कर्जबाजारी आहे आणि प्रत्येक खरेदीसाठी त्यांना परकी मदतीची याचना करावी लागत आहे. यातूनच दहशतवाद बोकाळत चालला आहे कारण पाकिस्तानी सेनादले जे उघड आणि अधिकृतपणे करु शकत नाहीत ते दहशतवादी संघटनांकरवी केले जाते. भारतावर हल्ला करणे शक्य नसल्यानेच पाकिस्तानने काश्मीर आणि अन्यत्र दहशतवादी कारवाया व घुसखोरीच्या माध्यमातून भारताला सतत त्रास देण्याचे धोरण अवलंबिले आहे. त्यामुळेच पाकिस्तानवर सतत दबाव ठेवून त्यांची अर्थव्यवस्था तणावाखाली ठेवणे आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरुन होणारी आर्थिक मदत कमीतकमी कशी राहील यासाठी प्रयत्नशील राहणे हे उपाय भारताकडे राहतात. त्याचबरोबर भारतीय राज्यकर्त्यांनी आपले घर म्हणजेच काश्मीरी लोकांना राष्ट्रीय प्रवाहात सामील करुन पाकिस्तानचा प्रभाव नष्ट करण्यासाठी प्राधान्य देणेही तेवढेच महत्वाचे आहे. तरच पाकिस्तानची नाकेबंदी शक्य होईल आणि हा देश एकाकी होऊ शकेल ! केवळ धडा शिकविण्याची नाटकी भाषा व युध्दाची खुमखुमी दाखवून हे उद्दिष्ट साध्य होणार नाही !!



# विधीमंडळातील राष्ट्रवादीची कामगिरी

**विधानमंडळाचे छोटेसे अर्थसंकल्पीय अधिवेशन नुकतेच पार पडले. राज्यपाल नि:पक्षपाती काम करीत नसल्यामुळे सर्व विरोधी पक्षांनी त्यांच्या अभिभाषणावर बहिष्कार घातला. भारतीय जवानांवर पुलवामा येथे पाकिस्तानी दहशतवाद्यांनी जो हल्ला केला त्या पार्श्वभूमीवर विधान मंडळाचे अधिवेशन एकमताने स्थगित करण्यात आले. या अधिवेशनातच अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी अर्थसंकल्प सादर केला. राष्ट्रवादी काँग्रेसच्या आमदारांनी जी कामगिरी सभागृहात केली ती थोडक्यात येथे दिली आहे.**



# विधानभवनाच्या पायऱ्यांवर येत सरकारविरोधात राष्ट्रवादी काँग्रेसची जोरदार घोषणाबाजी...

मुंबई – छावण्या बंद... लावण्या सुरु... शेतकऱ्यांना मदत न करणाऱ्या सरकारचा धिक्कार असो... मेगाभरती रद्द करणाऱ्या सरकारचा निषेध असो...छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाचं काम थांबणाऱ्या सरकारचा धिक्कार असो... मोदी हटाव... देश बचाव... अशा घोषणा देत राष्ट्रवादी काँग्रेस आणि आघाडीतील पक्षाच्या आमदारांनी विधानभवनाचा परिसर दणाणून सोडला. अर्थसंकल्प अधिवेशनाच्या तिसऱ्या दिवशीही विरोधकांनी विधानभवनाच्या पायऱ्यांवर येत जोरदार घोषणाबाजी केली. जवळपास निम्म्याहून अधिक महाराष्ट्र यंदा दुष्काळाच्या छायेत सापडला आहे. पिण्याच्या पाण्याची भीषण समस्या आहे. मराठवाड्यात आजही शंभर ते सव्वाशे किमीवरून टँकरने पिण्याचे पाणी आणावे लागते आहे. माणसांना पिण्याचे पाणी मिळणे जिथे दुर्मिळ झाले आहे. तिथे जनावरांना पाणी कसे व कोठून द्यायचे, हा प्रश्न 'आ' वासून उभा आहे. रब्बी पिकांची पेरणी झालेली नसल्यामुळे ज्वारीची कडबा यावेळी जनावरांसाठी उपलब्ध नाही. शिवाय पाऊसही झालेला नसल्यामुळे गवताचा चाराही निर्माण झालेला नाही. त्यामुळे जनावरांच्या चाऱ्याचीही गंभीर समस्या निर्माण झालेली आहे. सरकारने जनावरांच्या छावण्या तयार करण्यासाठी अनेक जाचक अटी घातल्या असून शक्यतो छावण्या उभ्याच राहू नये, असा सरकारचा प्रयत्न आहे. आता छावणीसाठी तीन हजार जनावरांची अट घालण्यात आलेली आहे. ती अत्यंत चुकीची आहे. यावेळी विधीमंडळ पक्षनेते अजितदादा पवार, प्रदेशाध्यक्ष आमदार जयंतराव पाटील, विधानसभेतील मुख्य प्रतोद आमदार शशिकांत शिंदे उपस्थित होते.

## शेतकऱ्यांच्या रक्कमा बँकांनी परत घेतल्याने धनंजय मुंडे संतापले

# शेतकऱ्यांची चेष्टा लावलीय का?



मुंबई- प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेअतंर्गत शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झालेली रक्कम बँकेने खात्यातून परत घेतल्याने विरोधी पक्षनेते धनंजय मुंडे सभागृहात चांगलेच संतापले... शेतकऱ्यांची चेष्टा लावलीय का? असा सवाल त्यांनी सरकारला केला.

स्थगन प्रस्तावाद्वारे शेतकऱ्यांच्या खात्यातील रकमा परत घेतल्याचा मुद्दा उपस्थित करुन या गंभीर विषयावर सभागृहात चर्चा करावी अशी मागणी केली. प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेतंर्गत शेतकऱ्यांच्या खात्यावर प्रत्येकी अवघे दोन हजार रुपये जमा झाले आहे. परंतु ही रक्कमही जमा होताच ती काही वेळातच काढून घेतल्याची बाब नांदेड, परभणी, हिंगोली, नागपूर, नाशिक, अहमदनगर जिल्हयात उघडकीस आल्याची बाब धनंजय मुंडे यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिली. केंद्रसरकारने मोठा गाजावाजा करुन ही रक्कम जमा झाल्याचा संदेश बँकांच्या सर्व्हर मार्फत मोबाईल वर देण्यात आलेली आहे. ती रक्कम काढण्यासाठी गेलेल्या शेतकऱ्यांना पैसे लगेच परत गेल्याचे बँका अधिकाऱ्यांनी सांगितले असेही धनंजय मुंडे म्हणाले. शेतकऱ्यांना मेसेज आल्यामुळे शेतकरी रक्कम काढू शकत नाहीत. ही रक्कम परत का गेली याचं उत्तर प्रशासनाकडे नाही. त्यामुळे यामध्ये नेमकं काय आहे याचा शोध घ्यावा अशी मागणीही धनंजय मुंडे यांनी केली.

## मुकबधीर विदयार्थ्यांना मारहाण करणाऱ्या सरकारचे 'बधिर' तेचे क्रूर दर्शन

मुंबई-मुकबधीर विद्यार्थ्यांवर अमानुष लाठीमार करुन सरकारने आपल्या 'बधिर' तेचे क्रूर दर्शन घडवले असून अशा असंवेदनशील सरकारला सत्तेवर राहण्याचा अधिकार नाही अशा शब्दात विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते धनंजय मुंडे यांनी सभागृहात सरकारचा निषेध व्यक्त केला. सभागृहात धनंजय मुंडे यांनी मुकबधीर विद्यार्थांना झालेल्या अमानुष लाठीमाराचा प्रश्न नियम २८९ अन्वये उपस्थित केला. मुकबधीर विद्यार्थ्यांच्या मोर्चावर पोलिसांनी केलेल्या अमानुष लाठीमाराचा धनंजय मुंडे यांनी तीव्र शब्दात निषेध व्यक्त केला. पोलिस आणि सरकार मुकबधीर विद्यार्थी काय सांगत होते ते आम्हाला कळत नव्हते आणि आम्ही काय सांगतोय ते त्यांना कळत नव्हते. जर सरकारला जनतेची भाषा समजत नसेल आणि जनतेशी संवाद साधण्यात अडचण येत असेल तर या सरकारने सत्तेवरून पायउतार व्हावे अशी जोरदार टिकाही सरकारवर केली. दरम्यान या घटनेत विदयार्थांवर लाठीमार करणाऱ्या आणि तसे आदेश देणाऱ्या सर्व पोलिस अधिकाऱ्यांवर तातडीने निलंबनाची कारवाई करावी अशी मागणीही धनंजय मुंडे यांनी केली.





राष्ट्रवादी स्वाभिमानी आचार! राष्ट्रवादी विचार !!

# राज्यपालांच्या अभिभाषणावर विरोधकांचा बहिष्कार...




मुंबई-गांधी हम शर्मिंदा है तेरे कातिल जिंदा है... आरएसएसचं समर्थन करणाऱ्या राज्यपालांचा धिक्कार असो... अशा घोषणा देत राष्ट्रवादी काँग्रेस आणि आघाडीतील पक्षाच्या आमदारांनी विधानभवनाचा परिसर दणाणून सोडला. आजपासून अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू झाले. पहिल्याच दिवशी राज्यपालांच्या अभिभाषणावर विरोधकांनी बहिष्कार टाकतानाच सरकारविरोधात विधानभवन परिसरात जोरदार घोषणाबाजी करत परिसर दणाणून सोडला. यावेळी विधीमंडळ पक्षनेते अजितदादा पवार,विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते धनंजय मुंडे, प्रदेशाध्यक्ष आमदार जयंतराव पाटील, विधानसभेतील मुख्य प्रतोद आमदार शशिकांत शिंदे, विधान परिषदेतील मुख्य प्रतोद आमदार हेमंत टकले, आमदार जितेंद्र आव्हाड, आमदार विक्रम काळे, आमदार विद्या चव्हाण, आमदार ख्वाजा बेग, आमदार प्रकाश गजभिये, आमदार बाबाजानी दुर्राणी, आमदार गणपतराव देशमुख, आमदार अनिकेत तटकरे, आमदार जोगेंद्र कवाडे, आमदार हसन मुश्रीफ, आमदार ज्योती कलानी, आमदार श्रीमती सुमनताई पाटील, आमदार श्रीमती संध्याताई कुपेकर आदींसह काँग्रेस, व मित्र पक्षाचे आमदार उपस्थित होते. विरोधी पक्ष सरकारविरोधात पहिल्याच दिवशी आक्रमकपणे लढा देणार असल्याचे आपल्या कृतीतून दाखवून दिले असल्याने अधिवेशनामध्ये वेगळीच रंगत मिळाली.

# पाकला धडा शिकवायची भारताला संधी : जयंत पाटील

मुंबई दि. २६ फेब्रुवारी -इंदिरा गांधींनी बांग्लादेश स्वतंत्र करुन पाकिस्तानला धडा शिकवला. तीच संधी पुन्हा एकदा आपल्या देशाला आली आहे. पाकव्याप्त काश्मीर जो आहे तो पुन्हा एकसंघ काश्मीर भारताच्या संघराज्यात पुन्हा एकसंघ करण्याची जबाबदारी आहे असे सांगतानाच आज भारतीय वायुसेनेने पाकव्याप्त काश्मीरमध्ये आतंकवादयांच्या अड्ड्यावर केलेल्या बॉम्ब हल्ल्याबद्दल वायुसेनेचे राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष आमदार जयंतराव पाटील यांनी अभिनंदन केले. वायुसेनेने पहाटे पाकव्याप्त काश्मीर भागात बॉम्ब हल्ला करून आतंकवादयांना खतपाणी घालणारे तळ उध्वस्त केले.पाकिस्तान नेहमीच काश्मीरचा प्रश्न हा जिवंत ठेवण्याचा प्रयत्न करतो आहे.काश्मीरमध्ये जी अशांतता आहे त्याला कारण पाकिस्तान आहे यात शंका नाही असेही आमदार जयंतराव पाटील म्हणाले. काश्मीरचा प्रश्न सतत येतो तो पुर्णपणे संपेल त्यासाठी भारतीय सेना समर्थ आहे. वायुदलाने जो हल्ला केला त्या भारतीय वायुदलाचे आमदार जयंतराव पाटील यांनी अभिनंदन केले.

भारत सरकारने पाकिस्तानला जो धडा शिकवण्याचे ठरवले आहे ते स्वागतार्ह आहे असेही प्रदेशाध्यक्ष आमदार जयंतराव पाटील म्हणाले. कधीतरी पाकिस्तानला धडा शिकवण्याची गरज होती. आणि आता पाकव्याप्त काश्मीर पुर्णपणे जोडण्याची संधी साधली पाहिजे असा सल्लाही आमदार जयंतराव पाटील यांनी सरकारला दिला.

# सिद्ध झाला भाजप-सेनेतला खोटा कलगीतुरा

(पान ५ वरून) आपल्याला तो सवत निर्माण होऊ देणार नाही. शिवसेनेचे उमेदवार जास्तीचे निवडून येऊ नयेत यासाठी भाजपचे कार्यकर्ते आटोकाट प्रयत्न करणार. कारण त्यांना माहिती आहे शिवसेनेचा डोळा मुख्यमंत्रीपदावर आहे. भाजप शिवसेनेला कधीच मुख्यमंत्रीपद मिळू देणार नाही. आत्ता लोकसभा निवडणुक होईपर्यंत त्यांचे सगळे चोचले, लाड पुरवतील. सगळ्या मागण्या मान्य, मंजूर म्हणून पायघड्या घालतील. निवडणुका संपल्या की सेनेला वाऱ्यावर सोडून देतील. महाराष्ट्रात सरकार स्थापन करताना 2014 मध्ये देवेंद्रजींनी असाच इंगा उद्धवजींना दाखविला होता. गरज सरो अन् वैद्य मरो ही भाजपची जुनी रीत आहे. अनेकदा तोंड पोळले तरी सेना त्यापासून काही बोध घेत नाही. शिवाय सेनेला सत्तेत सहभागी करुन घेतल्यावर अत्यंत फालतू, बिन महत्त्वाची आणि वाईटपणा येणारी खाती सेनेला द्यायचे धोरण भाजपाने राबविले हे आपण सगळ्यांनी अनुभवले व डोळ्यांनी बघितले आहे.

मंत्रीमंडळाच्या बैठकीत सेनेच्या सगळ्या वाघांची शेळी व्हायची. प्रत्येक निर्णयाला सेनेचा होकार असायचा. तेव्हा काहीही न बोलता मूकसंमती द्यायचे आणि बैठक संपवून बाहेर आले की निर्णयाच्या विरुद्ध बोंबाबोंब व जाहीर टीकेचे नगारे वाजवायचे. जणू काही निर्णयात आमचा सहभाग नाही. सगळा भाजपाचा एकतर्फी कारभार चालू आहे, अशी शिवसेनेची भूमिका असायची. 'सौ चुँहे खाँके बिल्ली निकली हज को' असे शिवसेनेचे जे वागणे आहे ते जनतेला कळत नाही अशातला भाग नाही. जनतेला फार काळ बावळट समजून मूर्ख बनविण्याचा प्रयत्न भाजपा आणि शिवसेना या दोघांनीही केला. पण जनता आता शहाणी झाली आहे. तिला सत्य कळाले आहे. सत्तेतल्या मलिद्यासाठी सेना-भाजपा किती हपापलेली आहे आणि त्यासाठी दोघेही कोणत्या थराला जाऊ शकतात याची जाणीव जनतेला झालेली आहे. शेतकऱ्याचा संपूर्ण सातबारा कोरा झाला पाहिजे. त्याला पूर्ण कर्जमाफी मिळाली पाहिजे. अयोध्येत राम मंदीराची अगोदर उभारणी झाली पाहिजे. पहिले मंदीर, मग सत्ता. अन्यथा सत्ता गेली चुलीत असे मोठमोठ्याने जाहीर सभातून टाहो फोटणारे उद्धवजी आता का एकदम बोलती बंद करुन मौनीबाबाच्या भूमिकेत गेले आहेत? का त्यांनाही देवेंद्रजींनी सज्जड दम भरला आहे? वस्तुस्थिती काहीही असो. सेना-भाजपचे खायचे आणि दाखवायचे दात वेगवेगळे आहेत हे सूर्यप्रकाशाइतके स्वच्छपणे सिद्ध झाले आहे.

खरं तर मा. बाळासाहेबांचे स्मारक उभारण्याची हिंमत शिवसैनिकांमध्ये आजही आहे. महापौर बंगल्याची जागा व स्मारकाच्या खर्चाची रक्कम सरकारकडून मिळविण्यासाठी आणि नाणारचा प्रकल्प रद्द करण्यासाठी उद्धवजींनी देवेंद्रांपुढे लोटांगण घालण्याची आणि कमरेत वाकून वाकून कुर्निसात करण्याची




काहीही गरज नव्हती. आपले परमपूज्य पिताजी ज्या टेचात, शानमध्ये व रूबाबात राहिले तो सगळा आब उद्धवजींनी क्षुल्लक कारणांसाठी घालविला आहे. नेतृत्त्वाची मोहोर कर्तृत्त्वातून उमटते. स्वकर्तृत्व दाखविण्याची संधी गमावून धुनष्यबाणाने कमळाबाईचा जो पदर धरला आहे त्यातून कर्तृत्वाचे बाण आता न सुटता ते फुसके होत जाणार आहेत. त्यामुळे सेनेची अवस्था आता ना घरका ना घाटका अशीच होणार आहे. दोघांच्या या खोट्या कलगीतुऱ्यातून जनता मात्र सावध व शहाणी झाली आहे. ते या निवडणुकीतून दिसेलच !

# अर्थसंकल्पातून जनतेला वाटाण्याच्या अक्षता

**(पान ४ वरून)** आपले एजंट म्हणून काम करावे अशी अपेक्षा सरकारातल्या लोकांनी ठेवली. अगोदरच्या अधिकाऱ्यांचे झालेले हाल, चौकशीचा मागे लागलेला ससेमिरा आणि न्यायालयाकडून बेल मिळताना झालेला प्रचंड त्रास व त्यासाठी कराव्या लागलेल्या अनेक खटपटी विद्यमान अधिकाऱ्यांनी पाहिलेल्या असल्यामुळे ताकही त्यांनी फुंकूनच पिण्याचा निर्णय घेतला. जलसंपदा विभागाच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने तर बैठकीतच मुख्यमंत्र्यांना सुनावले, ''तुम्ही आमच्यावर दबाव आणून घाई करु नका. सगळ्या कायदेशीर प्रक्रिया पूर्ण झाल्याशिवाय आम्ही प्रकल्पाचे काम सुरु करणार नाही. नंतर जेलमधून आम्हाला सोडवायला कोणी येत नाही.'' परिणामी बऱ्याच प्रकल्पांना सुप्रमा लवकर मिळाल्या नाहीत. कामे अर्धवट पडून राहिली. प्रकल्पांचे खर्च वाढतच गेले. सिंचन घोटाळ्याचे जे भूत भाजपच्या नेत्यांनी उभे केले त्यामुळे महाराष्ट्राचे प्रचंड नुकसान झाले. पंतप्रधान सिंचाई योजना आणून महाराष्ट्राचे भाजप सरकारने पूर्ण वाटोळे केले. या योजनेत महाराष्ट्रातले फक्त 26 प्रकल्प निवडले. परंतु त्यांना केंद्रातून निधी न देता नाबार्डकडून कर्ज घ्यायला सांगितले. नाबार्डने घातलेल्या जाचक अटींमुळे कर्ज मिळालेच नाही. गेली चार-पाच वर्षे सिंचनाचे काम सरकारच्या चुकीच्या धोरणांमुळे बंद पडले असून शेतकरी पूर्ण उद्धवस्त झाला आहे. शेतकऱ्याच्या आत्महत्यांचे प्रमाण प्रचंड वाढले आहे. अर्थसंकल्पात योजना प्रस्तावित करणे अपेक्षित असते मात्र सुधीर मुनगंटीवार यांनी भाषणाचा सारा वेळ केवळ सरकारने केलेल्या कामांची यादी वाचण्यात घालवला. एकंदरच हा अर्थसंकल्प न राहता जनतेच्या नजरेत पुन्हा एकदा येण्याची एक केविलवाणी कृती होती असे दिसत होते. जलयुक्त शिवार हे सरकारचे यश असल्याचे मुनगंटीवार यांनी सांगितले मात्र राज्याच्या वीस हजार गावात भूजलपातळी घटल्याचे कारणे मात्र ते सांगू शकले नाहीत. हा अर्थसंकल्प युवक, शेतकरी, मध्यमवर्गीय, ज्येष्ठ नागरिक, दलित अशा साऱ्याच घटकांची निराशा करणारा होता. खरं तर निवडणुकीपूर्वीचा अर्थसंकल्प म्हणून राज्यातील जनतेला या अर्थसंकल्पाकडून मोठ्या अपेक्षा होत्या. मात्र सरसकट सर्व जनतेची निराशा या सरकारने केली आहे.

राज्यात सध्या भयावह दुष्काळ पडलेला असताना हे सरकार शेतकऱ्यांना दिलासा देणाऱ्या योजना जाहीर करेल असे अपेक्षित होते, मात्र शेतकऱ्यांसाठी कोणतीही ठोस योजना या सरकारने जाहीर केलेली नाही. विविध महत्वाच्या योजनांसाठी केलेल्या तरतुदी अत्यंत अपुऱ्या असून त्यातूनही काहीही साध्य होणार नाही. राज्यावरील कर्जाने चार लाख चौदा हजार कोटींचा आकडा गाठला आहे. अनुसूचित जाती उपयोजनेसाठी केलेली 9208 कोटी रुपयांची तरतूद अत्यंत अपुरी आहे, यापूर्वी अनुसूचित जाती उपयोजनेत तरतूद करून तो निधी दुसऱ्याच कारणांसाठी वापरण्याचे प्रकार झाले आहेत, यावर्षीही तसेच घडण्याची दाट शक्यता आहे. महात्मा फुले, संत रोहिदास व अपंग कल्याण महामंडळासाठी केलेली तरतूद अत्यंत अपुरी आहे. अल्पसंख्यांकांच्या विकासासाठी केलेली 465 कोटींची तरतूद केली आहे. तर राज्यातील लोकसंख्येचा प्रचंड मोठा हिस्सा असलेल्या भटके विमुक्त व इतर मागासवर्गासाठी निव्वळ 2892 कोटींची नाममात्र तरतूद केलेली आहे. राज्यातील अंगणवाड्यांची अवस्था अत्यंत खराब असताना वीज, पाण्यासारख्या मूलभूत सुविधा तिथे नसताना या सरकारने राणा भीमदेवी थाटात 5 हजार आदर्श अंगणवाड्या करण्याची हवेत घोषणा केली आहे. न्यायाधीशांच्या इमारती आणि घरांसाठी 725 कोटींची तरतूद जरी करण्यात आली असली तरी ती अत्यंत अपुरी आहे. महिला व बालविकास विभाग हा राज्यातील सर्वाधिक महत्वाचा विभाग आहे, मात्र या विभागासाठी फक्त 2921 कोटींची नाममात्र तरतूद केली आहे. युवकांना रोजगार देण्याचे गाजर दाखवून सत्तेत आलेल्या या सरकारने युवकांच्या रोजगारासाठी या अर्थसंकल्पात भरीव कोणतीही योजना सादर केलेली नाही. राज्यातील सरकारच्या यशाचा टेंभा मिरवताना अर्थमंत्र्यांनी राज्यातील 18 ते 35 वयोगटातील किती व्यक्तींना रोजगार मिळाला हे जाहीर करणे अपेक्षित होते, मात्र त्यावर मुनगंटीवार काहीही बोलले नाहीत.

मुंबई, पुणे, पिंपरी - चिंचवड, सोलापूर या शहरांना स्मार्ट सिटीसाठी केवळ 2400 कोटी रुपये दिले आहेत. सागरमाला सारख्या नितीन गडकरी यांच्या ड्रीम प्रोजेक्टसाठी या सरकारने केवळ 26 कोटींची तरतूद केली आहे. राज्यातील विमानतळांच्या विविध सुविधांसाठी केवळ 65 कोटी रुपयात काय होणार आहे?

राज्यात एकूण 592 एसटी स्थानके आहेत.या स्थानकांच्या नूतनीकरणासाठी तरतूद केलेल्या 101 कोटी रुपयात 592 पैकी दहा स्थानकांचे सुद्धा व्यवस्थित नूतनीकरण होवू शकणार नाही.

मराठा आरक्षण व सवर्ण आरक्षण याचा उल्लेख अर्थमंत्र्यांनी आपल्या भाषणात केला. मात्र यामुळे निर्माण होवू शकणारा संविधानात्मक पेच हे सरकार कसा सोडवणार आहे यावर मात्र कोणतेही भाष्य केले नाही. प्रमोद महाजन कौशल्य विकास योजनेचे अपयश आम्ही वारंवार अधोरेखित केले असूनही या योजनेसाठी सरकारने 90 कोटी रुपये प्रस्तावित केले आहेत. छत्रपती शिवाजी महाराज यांचे नाव घेवून सत्तेत आलेल्या या सरकारने छत्रपती शिवराय व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाची एक विटही रचलेली नाही. घोषणा केलेला एकही महत्वाचा प्रकल्प या सरकारने पूर्ण केलेला नाही.



राष्ट्रवादी स्वाभिमानी आवाज! राष्ट्रवादी विचार !!

# संवेदनाशून्य हुकुमशहा

सन २०१९ च्या लोकसभा निवडणुका आता उंबरठ्यावर आल्या आहेत. तारखा जाहिर होण्याअगोदर केंद्रातील आणि राज्यातील सत्ताधाऱ्यांनी घोषणा आणि आर्थिक प्रलोभनांची लालूच मतदारांना दाखविण्याचा एक नवा विक्रम प्रस्थापित केला आहे. त्यातच भर पडली पुलवामावर अतिरेक्यांचा हल्ला, त्याला आपल्या हवाई दलाने दिलेल चोख प्रत्युत्तर आणि शत्रुचा नायनाट करण्याची क्षमता असल्याची झलक हे सर्व काही एका व्यक्तीमुळे



घडू शकले असा जबरदस्त प्रचार सर्व माध्यमातून अतिरेकाने दुमदुमत आहे. ६० वर्षात पूर्वीच्या सरकारांनी काहीच केले नाही ते आम्ही ६० महिन्यात करुन दाखविले (ह्यामध्ये पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी ह्यांची वर्ष सुध्दा आहेत.) अशी उग्र दर्पोक्ती ही सामान्य माणसांवर आदळत आहे. देशाचे प्रमुख म्हणून पंतप्रधान तर घराणेशाही बद्दल अत्यंत हीन दर्जाची टीका सकाळ, संध्याकाळ करत आहेत. सध्या सकाळी कुठलेही वर्तमानपत्र उघडा जर ते वृत्तपत्र १६ पानी असेल तर त्यात किमान १० पानांवर पंतप्रधानांची छबी झळकतांना दिसेल. स्वर्गीय पंडीत जवाहरलाल नेहरु, इंदिरा गांधी, लालबहाद्दूर शास्त्री व राजीव गांधी हे जणू काही ह्या देशाचे आणि सामान्यांचे शत्रू होते असे चित्र रंगवण्यात सत्ताधारी मशगूल आहेत. त्याग, बलिदान, देशासाठी तुरुंगवास ह्याला हि संघाच्या मुशीत तयार झालेली पिढी किती असंस्कृत आणि उध्दट आहे ह्याचा अनुभव आपण सर्वजण घेत आहोत. राजकीय पक्ष म्हणून विरोध समजू शकतो पण ज्या पक्षाचे माजी पंतप्रधान अटलजी ह्यांनी सत्तेत असतांनाही विरोधकांचा सन्मान ठेवला हे आत्ताच्या मग्रूर सत्ताधीशांच्या गावीही नाही. पण सर्वसामान्य जनता ही सत्ताधाऱ्यांपेक्षा अधिक शहाणी असते हे ह्या पूर्वीही मतदानांच्या माध्यमातून समोर आले आहे. ह्या सत्तांध आणि व्देषावर आधारित लोकांना जनताच पायउतार करेल. हे सर्व लिहित असतांना मला स्वर्गीय इंदिरा गांधींच्या बाबतची काही व्यक्तिगत माहिती एक आंतरराष्ट्रीय मासिकातून नुकतीच सापडली. आपल्या पैकी अनेकांना कशाची तरी ॲलर्जी असते. कुणाला झाडांची, कुठल्या अन्न पदाथाची, वासाची असे असंख्य प्रकार आहेत. **इंदिराजींना ॲलर्जी होती झेंडूच्या फुलांची.** आता पंतप्रधान म्हटल्यावर स्वाभाविकच दिवसागणिक असंख्य हारतुरे स्विकारणे आले आणि त्यामधला फुलांचा राजा म्हणजे झेंडूची फुले. पण त्यांच्या सेवेतील कर्मचारी सतत ही फुले त्यांच्यापर्यंत पोहचणार नाहीत ह्याची दक्षता घ्यायचे. कारण त्याचा स्पर्श इंदिराजींना झाला तर खुप त्रास होत असे. त्यापासून त्यांनी आयुष्यभर स्वत:चा बचाव केला. पण अखेरीला त्यांच्याच अंगरक्षकांनी



गोळ्या झाडून त्यांची हत्या केली. केवढे मोठे दुर्दैव आणि मग इंदिराजींचे पार्थिव दर्शनासाठी ठेवण्यात आले. त्या भोवती प्रचंड आरास मांडली होती झेंडूच्या फुलांची. केवढे हे विलक्षण. ज्या फुलांना त्यांनी आयुष्यभर दुर ठेवले अखेरीला सोबतीला होती तीच झेंडूची फुले हे अस काही जर ह्या सत्तांध पंतप्रधानांनी वाचल आणि खरच जर त्यांच्या ५६ इंच छातीत हृदय नावाच काही असेल तर कदाचित त्यांच्या वागण्यात फरक पडू शकतो. पण ते होणे नाही. कारण टोकाच्या हुकुमशाहीकडे जाणार हे नेतृत्व संवेदनाशून्य आहे एवढेच खरे.

## शेवटचे पान

